# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026

YEAR : 49) 15th March 2024 ( No. of Pages 28 ) ( No : 05


*जुन्या पेन्शन योजनेचा प्रश्न हा सरळ सरळ शासन स्वामित्वाधिकारित धनाच्या वहन वळणाचा प्रश्न आहे : २*

# 'भांडवली बाजारातील खेळाडू'

**एका बाजूला व दुसऱ्या बाजूला**

# 'आपले स्वत:चे कर्मचारी व शिक्षक'


**- प्रा.बी.टी.देशमुख**

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*


**५१. "जुन्या पेन्शन योजनेचा प्रश्न हा सरळ सरळ शासन स्वामित्वाधिकारित धनाच्या वहन वळणाचा प्रश्न आहे"** या विषयावर ५० परिच्छेदांचा लेखांक क्रमांक १ नुटा बुलेटीनच्या दिनांक १ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या अंकामध्ये (सन २०२३ चा दुसरा अंक) प्रकाशित करण्यात (पृष्ठ ९ ते २०) आला आहे. यामध्ये भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांच्या प्रकरणामध्ये याबाबतीत करण्यात आलेले मार्गदर्शन नमूद करून हा संघर्ष अति श्रीमंत असे १ टक्के लोक विरुद्ध उर्वरित ९९ टक्के लोक यांच्यामध्ये आहे असे प्रतिपादन केलेले आहे. आता शासन स्वामित्वाधिकारित धनाचा हा प्रवाह निश्चित कोणत्या दिशेने वाहतो आहे याचे तपशील पुढील परिच्छेदातून नमूद केलेले आहेत. जुन्या पेन्शन योजनेचे स्वरूप काय आहे हे नमूद करून नव्या पेन्शन योजनेमुळे राजस्थानमध्ये काय परिस्थिती निर्माण झाली होती याबाबतचे तपशील नमूद करून राजस्थान सरकारने घेतलेल्या निर्णयापूर्वीची आणि निर्णयानंतरची परिस्थिती यांचे तपशील त्या लेखात नमूद करण्यात आलेले आहेत. याबाबतीत केंद्रशासनाने केलेला कायदा (The Pension Fund Regulatory and Development Authority Act) व त्याचे होणारे दुष्परिणाम याची तपशीलवार माहिती त्याच लेखात नमूद केलेली आहे. आज आता नवीन पेन्शन योजनेचे समर्थन करणाऱ्या केंद्रशासनातील विचारवंतांनी केलेला युक्तिवाद किती भ्रामक व दिशाभूल करणारा आहे याबाबतची तपशीलवार माहिती देण्याचे ठरविले आहे. अर्थात अशी माहिती नमूद करण्यापूर्वी एक म्हणजे जुन्या पेन्शन योजनेचा प्रवास कसा झालेला आहे? व दुसरे म्हणजे नवीन पेन्शन योजना कोणताही विचार न करता एकाएकी कशी लादण्यात आली? या दोन मुद्यांबाबताचे तपशील प्रथम नमूद करण्याचे ठरविले आहे.

**५२.** आज 'जुनी पेन्शन योजना' म्हणून ज्या व्यवस्थेला आपण ओळखतो ती निवृत्तीवेतनाची व्यवस्था ही ब्रिटिश काळापासून भारतामध्ये अस्तित्वात असल्याचे दिसून येते. १६०-१७० वर्षापूर्वी पासून अस्तित्वात असलेली ही व्यवस्था आहे. त्यावेळच्या शासनाने सेवानिवृत्त झालेल्या आपल्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतरच्या काळामध्ये समाधानकारकपणे जीवन जगता यावे म्हणून 'The Indian Pension Act, 1871' हा कायदा केला. त्यानुसार निवृत्तीवेतनाची व्यवस्था अस्तित्वात आली. या व्यवस्थेप्रमाणे सेवानिवृत्तीवेतन मंजूर करण्याचे अधिकार केंद्रस्तरावर व्हाईसरॉय व राज्यस्तरावर गव्हर्नर यांना देण्यात आले होते आणि त्यांच्या मर्जीवर ही निवृत्तीवेतन व्यवस्था बांधलेली असायची. सन १८८१ मध्ये स्थापन झालेल्या 'Royal Commission on Civil Establishment' या आयोगाने शासकीय कर्मचाऱ्यांसाठी निवृत्तीवेतनाचे लाभ देण्याबाबतच्या व्यवस्थेची शिफारस केली होती.

**५३.** चलनवाढीमुळे होणारा परिणाम निष्प्रभावित करण्यासाठी मधून मधून त्याबाबतची प्रतिपूर्ती करण्याची उपाययोजना केली जात असे. सेवानिवृत्तीचे हे लाभ शासनाकडून देण्यात येत असले तरी सुरुवातीच्या काळामध्ये कोणत्याही आधारभूत नियमांचा त्याला आधार नव्हता. अशा प्रकारचे नियम १ जानेवारी १९२२ पासून अस्तित्वात आले. भारत शासन अधिनियम १९१९ आणि १९३५ यामध्ये सुद्धा निवृत्तिवेतनाबाबतच्या काही तरतुदी करण्यात आल्याचे दिसून येते. त्या काळात अस्तित्वात असलेल्या या योजनेप्रमाणे A Pay-as-you-go तत्वावर ही योजना आधारित होती. शासकीय सेवकांना कोणताही सहभाग द्यावा लागत नसे. पेन्शन योजनेवर होणारा संपूर्ण खर्च अंदाजपत्रित केल्या जात असे.

**५४.** स्वातंत्र्य मिळाल्यानंतर केंद्रशासनाने केलेल्या Central Civil Services (Pension) Rules, 1972 आणि Regulations governing pension for Civil Services and Armed Force Personnel या नियमांचा आधार या योजनेला मिळाला. दिनांक २५ मे १९७९ च्या एका ज्ञापनान्वये १९७२ च्या नियमांमध्ये काही बदल करण्यात आले. त्यानंतर सप्टेंबर १९७९ अन्वये त्यात आणखी काही सुधारणा करण्यात आल्या. विशिष्ट तारखेपूर्वी निवृत्त झालेले व त्या तारखेनंतर निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना भेदभावपूर्ण वागणूक देण्याचा प्रकार हा या व्यवस्थेचा महत्त्वपूर्ण दोष होता.

**५५.** केंद्रीय संरक्षण मंत्रालयामध्ये आर्थिक सल्लागार म्हणून काम करणारे एक अधिकारी श्री.डी.एस.नकारा यांनी निवृत्तीनंतर सर्वोच्च न्यायालयात केलेल्या याचिकेमुळे व त्यातून उपलब्ध झालेल्या न्यायनिर्णयामुळे सेवानिवृत्ती वेतन व्यवस्थेला बराच मोठा व मजबूत आधार मिळाला. श्री.डी.एस.नकारा विरुद्ध केंद्रशासन या प्रकरणामध्ये दिनांक १७ डिसेंबर १९८२ रोजी पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने दिलेला या प्रकरणातील महत्त्वपूर्ण निर्णय हा सेवानिवृत्तीवेतन व्यवस्थेसाठी एक मैलाचा दगड ठरला. मा.मुख्य न्यायमूर्ती श्री.वाय.व्ही.चंद्रचूड, मा.न्यायमूर्ती श्री.डी.ए.देसाई, मा.न्यायमूर्ती श्री.व्ही.डी.तुळजापूरकर, मा.न्यायमूर्ती श्री.ओ.सी.रेड्डी आणि मा.न्यायमूर्ती श्री.बहरुल इस्लाम या पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने दिनांक १७ डिसेंबर १९८२ रोजी दिलेल्या या निर्णयामध्ये यासंदर्भात काही महत्त्वपूर्ण धोरणात्मक तत्त्वे नमूद केली ती पुढीलप्रमाणे :-

**(1)** Pension is a vested right which is Statutory in character.

***नव्या पेन्शन योजनेबाबत सांगावयाचे झाल्यास ''भांडवली बाजारातील खेळाडू'' एका बाजूला व ''खुद्द शासनाचे कर्मचारी व शिक्षक'' दुसऱ्या बाजूला. या दोन पैकी भांडवली बाजारातील खेळाडूंच्या पदरी फार मोठे लाभ ओतण्याच्या निर्णयापोटी नव्या पेन्शन योजनेला जन्म देण्यात आला. या साऱ्या प्रकरणाचा एकंदर अभ्यास केला तर असे दिसून येते की, भांडवली बाजारातील खेळाडूंना लाभ आणि फक्त लाभच होणार असल्यामुळे त्यांनी यामध्ये तक्रार करण्यासारखे काहीच नव्हते.***

*(परिच्छेद ६६ पहा)*

***संबंधित कर्मचाऱ्यांच्या संघटनांशी कोणतीही चर्चा न करण्यात आल्यामुळे अत्यंत दोषपूर्ण योजनेचा जन्म झाला व त्यामुळे त्या योजनेमध्ये वारंवार सुधारणा करण्याची वेळ उभय शासनावर आली आणि या गोष्टीला आता जवळ जवळ २० वर्षे होत आली तरी त्यात सुधारणा करण्याचा उद्योग सुरूच आहे. इतक्या सुधारणा करण्याची वेळ येणे हाच मुळात पुरेसा विचार न करताच ही योजना जन्माला घालण्यात आली होती याचा पुरावा म्हणून नमूद करता येईल.***

*(परिच्छेद ६७ पहा)*

**(2)** All pensioners form one class irrespective of date of their retirement.

**(3)** Pension is not a bounty nor it is a matter of grace depending upon the sweet will of the employer.

**(4)** Pension is not ex-gratia payment but it is a payment for past services rendered.

**(5)** Pension is a right and payment of it does not depend upon the discretion of employer but it is governed by the Rules Regulations and employees coming within the rules is entitled to claim pension.

**(6)** Grant of pension does not depend upon any one's discretion. It is only for the purpose of quantifying the amount of pension having regard to service and other allied matters that it may be necessary for the authority to pass an order to that effect but the right to receive pension flows to the employee not because of any such order but by virtue of Rules.

**(7)** Pension is a term applied to the periodic money payment to a person who retires at a certain age which is considered as the age of disability and its payment usually continues to the rest of the life of the recipient.

**(8)** Pension payable to employee is earned by rendering long and efficient service and can be said as a deferred portion of compensation for the services rendered.

**(9)** Pension as a retirement benefit is in consonance with the furtherance of the goal of the Constitution which is paid to give a fillip and push to the policy of setting up a welfare state.

**(10)** The pension scheme consistence with available resources must provide that pensioner would be able to live a life (a) Free from want, with decency, independent and with self respect and (b) At a standard equivalent to pre-retirement level.

**५६.** देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा प्रशासन आणि प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी हा विषय अतिशय महत्त्वाचा समजल्या गेला. भारतीय संविधानाची निर्मिती करीत असतांना घटना समितीमध्ये याबाबत तपशीलवार चर्चा झाली. अशा चर्चेनंतर अस्तित्वात आलेल्या भारतीय संविधानाचा १४ वा भाग हा स्वतंत्रपणे "केंद्रशासन व राज्यशासन यांच्या अंतर्गत असलेल्या सेवा" या विषयावरच योजिला आहे. या भागामध्ये खंड ३०९ चा मथळा **"Recruitment and conditions of service of persons serving the Union or a State."** असा असून त्यात पुढीलप्रमाणे तरतूद आहे.

"309. Subject to the provisions of this Constitution, Acts of the appropriate Legislature may regulate the recruitment, and **conditions of service** of persons appointed, to public services and posts in connection with the affairs of the Union or of any State:"

शासकीय कर्मचारी व त्यांच्या सेवाशर्ती याबाबत तपशीलवार विधिनियम, नियम वा उपनियम करण्याचा संसदेला व त्या त्या राज्याच्या विधानमंडळाला या कलमान्वये अधिकार देण्यात आलेला आहे.

**५७.** प्रशासन आणि प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांच्याबाबत घटनेच्या या चौदाव्या भागात तपशीलवार तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. या सेवकांची भरती आणि त्यांच्या सेवाशर्ती, नियुक्त केलेल्या व्यक्तीला बडतर्फ करणे, पदावरून दूर करणे किंवा पदावनत करणे याबाबतच्या तरतुदी इतकेच नव्हे तर लोकसेवकांची निवड ही गुणवत्तेच्या आधारावरच व्हावी या दृष्टीने संघ लोकसेवा आयोग व राज्यस्तरावर राज्य लोकसेवा आयोग यांची तरतूद सुद्धा या भागात करण्यात आलेली आहे. अखिल भारतीय सेवेची सुद्धा निर्मिती या विभागाने केलेली आहे. लोकसेवक म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तीच्या भरती संदर्भात किंवा सेवाशर्तीच्या संदर्भात तंटे किंवा तक्रारी उद्‌भवल्यास याबाबतीत प्रशासकीय न्यायाधिकरण स्थापन करण्याची तरतूद सुद्धा याच भागामध्ये समाविष्ट आहे.

**५८.** स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये अस्तित्वात असलेली सेवानिवृत्ती वेतनव्यवस्था ही फक्त शासकीय कर्मचाऱ्यांना लागू होती. त्यामुळे ती शासकीय विद्यालयातून किंवा महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षकांनासुद्धा लागू होती. अशासकीय विद्यालयातून किंवा महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षकांना अशा प्रकारची काही व्यवस्था लागू करणे हे आपल्या कामाचा भाग आहे असे स्वातंत्र्यपूर्व काळातील राज्यकर्त्यांना वाटत नव्हते. स्वातंत्र्योत्तर काळातील राज्यकर्त्यांची या प्रश्नाबाबत सहानुभूती असली तरी सर्व विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षकांनी व त्यांच्या संघटनांनी चळवळी व आंदोलनाच्या माध्यमातून सेवानिवृत्ती वेतनाचे लाभ आपल्या पदरी पाडून घेतले असा याबाबतचा इतिहास आहे.

**५९.** महाराष्ट्रापुरतेच बोलायचे झाल्यास शिक्षणाच्या बाबतीत प्रबोधन परंपरेचा फार मोठा वारसा या राज्याला लाभला आहे. महात्मा ज्योतिबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगे महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या सारख्या थोरामोठ्यांनी समृद्ध प्रबोधनाच्या माध्यमातून शिक्षणाचा विचार मांडला. हंटर कमिशन समोर महात्मा ज्योतिबा फुले यांनी १९ ऑक्टोबर १८८२ रोजी जे निवेदन सादर केले, त्या निवेदनामध्ये ते म्हणतात, **"सध्याच्या परिस्थितीत उच्च शिक्षणासाठी करीत असलेली मदत सरकारने तोडावी, असे कोणीही देशहितेशु म्हणणार नाही. हिंदुस्थानचे शिक्षण सध्या बाल्यावस्थेत आहे. उच्च शिक्षणार्थ दिले जाणारे अनुदान थांबविल्यास, तेही एकंदर शिक्षण प्रसाराच्या दृष्टीने विघातकच ठरेल."** १ जुलै १९८७ च्या लोकराज्यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांचा एक लेख प्रसिद्ध झाला असून त्यामध्ये ते म्हणतात, **"स्वतंत्र राष्ट्रामध्ये शिक्षणाची जबाबदारी राज्याची ठरते.**

***निर्देशांकामध्ये प्रदान करण्यात आलेले १०० गुण लक्षात घेता नेदरलँडला ८२.६ गुण आणि डेन्मार्क या देशाला ८१.४ गुण मिळालेले आहेत. सन २०२० चे मोजमाप करतांना भारतातील नव्या पेन्शन योजनेस सुद्धा हिशेबात धरल्यामुळे भारताच्या पेन्शन योजनेला ४५.७ गुण मिळालेले आहे. या जागतिक निवृत्तिवेतन निर्देशांकामध्ये मिळालेले गुण लक्षात घेऊन या ३९ देशांची वर्गवारी A, B, C, D अशा चार वर्गांमध्ये करण्यात आलेली आहे. त्यात भारत हा "D" वर्गवारीमध्ये आहे. अशी ही जागतिक निवृत्तिवेतन निर्देशांकातील स्थिती आहे.***

*(परिच्छेद ८५ पहा)*

***रिझर्व्ह बँकेच्या याच बुलेटीनच्या पृष्ठ ८४ वर कोणत्या देशामध्ये कोणत्या प्रकारची निवृत्तिवेतन योजना उपलब्ध आहे याविषयी निरनिराळ्या तेरा देशांची माहिती नमूद केलेली आहे. या माहिती प्रमाणे केंद्रशासनाच्या कर्मचाऱ्यांना तसेच राज्यशासनाच्या कर्मचाऱ्यांना नेदरलॅन्ड मध्ये Funded DB pension plan लागू आहे. स्वित्झर्लंड मध्येसुद्धा या दोनही स्तरावरच्या कर्मचाऱ्यांना Funded DB pension plan लागू आहे.***

*(परिच्छेद ८७ (b) पहा)*

**परंतु परतंत्र राष्ट्रामध्ये समाज धुरिणांनी समाजाच्या मदतीने सार्वजनिक शिक्षणाची सोय केली पाहिजे कारण शिक्षण ही समाजाची जबाबदारी आहे.**" डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी असे विचार मांडले की, "**शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा.**" **परंतु शिक्षणाशिवाय नंतरच्या दोन गोष्टी करता येत नाहीत, शिक्षणाशिवाय संघटीत होता येत नाही आणि संघटीत झाल्याशिवाय संघर्ष करता येत नाही.** "**वेळ आला तर उपाशी रहा, बायकोला फाटकं लुगडं नेसू द्या, फुटक्या ताटात जेवा, परंतु मुलाला शिकविल्याशिवाय राहू नका**" असे विचार संत गाडगे महाराजांनी मांडले. "**बायकोला फाटकं लुगडं नेसू द्या, एक वेळ उपाशी रहा, पाहुण्यांना पाहुणचार करु नका, धकू द्या, परंतु मुलाला शिकविल्याशिवाय राहू नका.**" हे विचार त्यांनी जीव तोडून मांडले. डॉ.पंजाबराव देशमुखांनी '**ज्यांना शिक्षण मिळणार नाही त्यांना स्वातंत्र्याची फळे चाखता येणार नाही**' असा विचार ठामपणे मांडला.

**६०.** वेतन अनुदानाची व्यवस्था व सेवानिवृत्तीवेतनाची व्यवस्था यांच्यामध्ये एक निश्चित असा संबंध आहे. शाळा महाविद्यालयातून वेतन अनुदानाची संपूर्ण जबाबदारी शासनाने स्वीकारलेली नसेल तर निवृत्तीवेतन व्यवस्था लागू करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. नुकत्याच मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक ३१ जुलै २०२३ रोजी W.P. No. 328 of 2023 या प्रकरणामध्ये दिलेल्या निर्णयातसुद्धा हा विचार पुढील शब्दात नमूद केलेला आहे. :-

"4. From the aforesaid, what is relevant is receipt of 100% grant by the educational institution prior to 01.11.2005 irrespective of the fact that a particular post on which the employee is serving is aided or not."

या दृष्टिकोनातून याबाबतच्या महाराष्ट्रातील घडामोडींचा व प्रवासाचा विचार करणे आवश्यक आहे. जुन्या मुंबई राज्यात १८५९ मध्ये त्यावेळच्या शासनाने माध्यमिक विद्यालयांना सहायक अनुदानाची एक तुटपुंजी व्यवस्था अस्तित्वात आणली होती. शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना त्यांच्या कामामध्ये थोडीफार मदत करणे एवढाच त्या व्यवस्थेचा हेतू होता.

**६१.** मुंबई राज्यामध्ये १९५६ मध्ये सुधारित सहायक अनुदान संहिता (Revised Grant-in-Aid Code, 1956) अस्तित्वात येण्यापूर्वीच राज्य पुनर्रचना होऊन द्विभाषिक मुंबई राज्य अस्तित्वात आले आणि त्यामुळे त्या राज्यात माध्यमिक शाळांना वेगवेगळ्या भागांसाठी वेगवेगळी सहायक अनुदानाची व्यवस्था लागू झाली. मध्यप्रदेशातून द्विभाषिकामध्ये सामील झालेल्या विदर्भामध्ये त्यावेळच्या मध्यप्रदेश शासनाच्या अनुदान सूत्राचे नियम चालू राहिले. जुन्या हैदराबाद राज्यातून द्विभाषिकामध्ये सामील झालेल्या मराठवाड्यातील विद्यालयांना हैदराबाद राज्याचे नियम लागू राहिले. सौराष्ट्र आणि कच्छ हे भाग द्विभाषिकामध्ये सामील झाले त्यांना त्यांचे त्यावेळेला तेथे अस्तित्वात असलेले नियम लागू राहिले. अशासकीय अनुदानित माध्यमिक विद्यालयांना लागू असलेली सहायक अनुदानाची ही व्यवस्था द्वीभाषिक राज्यामध्ये वेगवेगळ्या भागांसाठी वेगवेगळी होती. यामध्ये एकवाक्यता आणली जावी अशा प्रकारची मागणी जोर धरू लागली.

**६२.** तत्कालीन मुंबई शासनाने जानेवारी १९५८ मध्ये "Integration Committee for Secondary Education" या नावाची एक समिती नेमली आणि या समितीकडे अनुदानाच्या बाबतीत व प्रशासनाच्या बाबतीत माध्यमिक स्तरापर्यंत एकवाक्यता आणण्याचे प्रस्ताव सुचविण्याचे काम सोपविले. या समितीने आपला अहवाल १९५९ मध्ये सादर केला. हा अहवाल आल्यानंतर त्या आधारावर राज्यात एकसारखे निर्णय घेण्याचे काम सुरू झाले व तसे आदेश निघू लागले. उदाहरण म्हणून दिनांक २४ डिसेंबर १९५९ रोजी शिक्षण विभागाने "Integration Committee for Secondary Education. Government decisions on the recommendations of the......." या विषयावर काढलेल्या परिपत्रकाचे (No.2/7-C (N) Poona 1, 24th December 1959) नमूद करता येईल. या परिपत्रकामध्ये सुरुवातीलाच पुढीलप्रमाणे प्रस्तावना आहे. :- "Government had appointed an Integration Committee for Secondary Education in January 1958 to consider the question of evolving a uniform but flexible system of Secondary Education including pay scales, fee rates, rates of grants-in-aid, etc. and to make recommendations in that connection. Government have since received the report of the Integration Committee and have taken certain decisions on some of the recommendations of the Integration Committee for Secondary Education as shown below." व मग त्यानंतर निर्णय नमूद केलेले आहेत.

**६३.** दरम्यान महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली व महाराष्ट्र शासनाने डिसेंबर १९६० मध्ये शासकीय अधिकारी व अशासकीय पदाधिकारी यांची एक समिती नेमली आणि त्या समितीकडे सहायक अनुदान संहिता तयार करण्याचे काम सोपविले. या समितीने आपला अहवाल ऑगस्ट १९६१ मध्ये सादर केला आणि त्या आधारावरच माध्यमिक शाळा संहिता (Secondary School Code) ही महाराष्ट्र राज्यासाठी तयार झाली. सन १९६३-६४ पासून सहायक अनुदानाची व्यवस्था अंतर्भूत असलेल्या माध्यमिक शाळा संहितेची (Secondary School Code) अंमलबजावणी सुरू झाली. या माध्यमिक शाळा संहितेमध्ये असलेले सहायक अनुदानाबाबतचे परिच्छेद ८७ व ८८.१ पुढीलप्रमाणे आहेत. :-

"87. Recognised schools are eligible for the following kinds of grants which may be paid at the discretion of the sanctioning authority subject to availability of funds and subject to the condition that the Societies running these schools are registered under the Bombay Public Trust Act, 1950, as amended from time to time :-

(1) Salary grant;

(2) Non-Salary grant;

(3) Building grant; and

(4) Such other grants as may be sanctioned by Government from time to time.

88.1. Subject to funds being available, all recognised,

*आशियातील देशांमध्ये अस्तित्वात असलेल्या पेन्शन योजनांची माहिती* "Public Pension System in Asian Countries" *या मथळ्याखाली रिझर्व्ह बँकेच्या याच बुलेटीनच्या पृष्ठ ८५ वर पुढील शब्दात नमूद आहे.:-* **"Further, the national pension provision in Asia is very diverse. While Philippines, Thailand, Vietnam and Pakistan have DB schemes, countries like China, Indonesia, Malaysia, Singapore, India and Sri Lanka have operationalised DC schemes."**

*(परिच्छेद ८७ (c) पहा)*

***अनेक देशांमध्ये फार मोठे कर्ज काढून व्याजाच्या रकमा वाढविल्या जातात व व्याज खूप वाढले आहे असे सांगून DB Pension Plan हे DC Pension Plan मध्ये बदलविण्यासाठी एक कारण किंवा निमित्त म्हणून व्याजाच्या रकमा पुढे केल्या जातात. इतकेच नव्हे तर फार मोठे कर्ज काढण्याच्या विद्यमान शासनाच्या कृतीमुळे DB Plan ला आधार देण्याच्या भविष्यकालीन सरकारांच्या शक्तीवर कुठाराघात केला जातो ही गोष्ट जागतिक निवृत्तिवेतन निर्देशांक प्रकाशित करतांना डॉ.डेव्हिड नॉक्स यांनी प्रस्तावनेतच पुढील शब्दात नमूद केलेली आहे. :-***

*(परिच्छेद ९५ पहा)*

secondary schools including vocational secondary schools having commercial, agricultural bias, etc., which are under the control of the Directorate of Education (excluding Vocational Secondary Schools and Technical High Schools which are governed by Rule 92), and Night High Schools recognised in the previous academic year, will be eligible for grant during a year as per the following formula :-

**(A) (i) Entire enticipated expenditure on "Staff salaries and allowances" vide item (i) with sub-items (a) to (n) thereunder, of Schedule A at sanctioned rates, in respect of its teaching and non-teaching staff as per approved scales."**

**६४.** एकदा १०० टक्के वेतन अनुदानाची तरतूद लागू झाल्यानंतर स्वाभाविकपणे सेवानिवृत्ती वेतन व्यवस्थेसाठी शिक्षक संघटनांनी आग्रह सुरू केला व दिनांक ४ नोव्हेंबर १९६८ रोजीच्या शासननिर्णयान्वये (No. SSN 3365-G Bombay) ही व्यवस्था माध्यमिक शाळांच्या स्तरावर अंमलात आली. त्या शासननिर्णयाचा पहिलाच परिच्छेद पुढीलप्रमाणे :-

"Resolution : 1. The question of application of pension, gratuity and other retirement benefits to the teaching staff in recognised and aided non-Govt. secondary schools in Maharashtra, was under the consideration of Government for some time past. **Government is now pleased to direct that the pension, gratuity and other retirement benefits admissible to the Maharashtra State Government Servants under the Revised Pension Rules 1950, contained in Appendix-IXV-C of Bombay Civil Service Rules Volume-II, as amended from time to time,** the Family Pension Scheme sanctioned in Government Resolution, Finance Deptt. No. PEN-1464/3-64-X, dated 8th May 1964, as amended from time to time should be made applicable to the full time teaching staff in recongnised and aided non Govt. Secondary Schools in the State who retire on or after 1st April 1966."

**६५.** महाविद्यालय स्तरावर १०० टक्के वेतन अनुदानाची व्यवस्था अस्तित्वात नव्हती व त्यामुळे सेवानिवृत्ती वेतन व्यवस्था अस्तित्वात असण्याचा प्रश्न तर दूरच राहिला पण याबाबतची साधी मागणीसुद्धा केली जात नव्हती. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली त्यावेळेला विदर्भात महाविद्यालयांना जुन्या मध्यप्रदेश शासनाचे वेतन अनुदान सूत्र लागू होते.

**६६. नव्या पेन्शन योजनेबाबत सांगावयाचे झाल्यास "भांडवली बाजारातील खेळाडू" एका बाजूला व "खुद्द शासनाचे कर्मचारी व शिक्षक" दुसऱ्या बाजूला. या दोन पैकी भांडवली बाजारातील खेळाडूंच्या पदरी फार मोठे लाभ ओतण्याच्या निर्णयापोटी नव्या पेन्शन योजनेला जन्म देण्यात आला. या साऱ्या प्रकरणाचा एकंदर अभ्यास केला तर असे दिसून येते की, भांडवली बाजारातील खेळाडूंना लाभ आणि फक्त लाभच होणार असल्यामुळे त्यांनी यामध्ये तक्रार करण्यासारखे काहीच नव्हते.** याउलट ज्यांच्यावर घातक परिणाम होणार आहेत त्या कर्मचारी व शिक्षकांना ही योजना अंमलात आली तेव्हा अजिबात विश्वासात घेण्यात आले नाही. कारण ही योजना भावी प्रभावाने लागू होणार होती त्यामुळे विपरितरीत्या प्रभावित होणारा वर्ग उदयालाच आलेला नव्हता. असे असले तरी कर्मचारी व शिक्षकांच्या कार्यरत संघटनांशी चर्चा किंवा सल्ला मसलत न करताच नवीन पेन्शन योजनेचे दुकान मांडण्यात आले.

**६७.** केंद्रशासनाने दिनांक २२ डिसेंबर २००३ व ३० डिसेंबर २००३ च्या अधिसूचनेद्वारे १ जानेवारी २००४ रोजी किंवा त्यानंतर भरती झालेल्या (recruited) कर्मचाऱ्यांना DCPS योजना लागू केली. महाराष्ट्र शासनाने ३० ऑक्टोबर २००५ च्या शासन निर्णयाने १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर भरती झालेल्या (recruited) कर्मचाऱ्यांना केंद्राच्या धर्तीवर DCPS योजना लागू केली. अशी योजना लागू करतांना **संबंधित कर्मचाऱ्यांच्या संघटनांशी कोणतीही चर्चा न करण्यात आल्यामुळे अत्यंत दोषपूर्ण योजनेचा जन्म झाला व त्यामुळे त्या योजनेमध्ये वारंवार सुधारणा करण्याची वेळ उभय शासनावर आली आणि या गोष्टीला आता जवळ जवळ २० वर्षे होत आली तरी त्यात सुधारणा करण्याचा उद्योग सुरूच आहे. इतक्या सुधारणा करण्याची वेळ येणे हाच मुळात पुरेसा विचार न करताच ही योजना जन्माला घालण्यात आली होती याचा पुरावा म्हणून नमूद करता येईल.**

**६८.** महाराष्ट्र राज्यशासनाने केलेल्या कृतीचा विचार केला तर घटनेच्या कलम ३०९ अन्वये राज्यशासनावर पुढील जबाबदारी सोपविली आहे. :- "309. Subject to the provisions of this Constitution, Acts of the appropriate Legislature may regulate the recruitment, and **conditions of service** of persons appointed, to public services and posts in connection with the affairs of the Union or of any State:" राज्यस्तरावर कोणताही विचार किंवा विचारविनिमय न करता महाराष्ट्र शासनाने केंद्राच्या योजनेची 'झेरॉक्स प्रत' काढली हे स्पष्टपणे दिसून येते. आपल्या कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती ठरविण्याचा अधिकार या देशाच्या घटनेने पूर्णपणे राज्यशासनाला दिलेला असतांना अन्यवेळी आपल्या हक्कांसाठी लढणारे राज्यसरकार कोणताही विचार न करता याबाबतचे आपले सारे अधिकार केंद्राच्या सुपूर्त करण्यास राजी झाले व तेथूनच केंद्राच्या योजनेची छायाप्रत महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ रोजीच्या शासननिर्णयान्वये

***फार मोठ्या प्रमाणात शासन ज्यावेळेला कर्ज उभे करते त्यावेळेला भविष्यकाळातील शासनाच्या DB Pension Plan ला उभारी देण्याच्या शक्तीवर विद्यमान शासन कुठाराघात करीत असते. त्यामुळेच कमी कर्ज काढणारी शासन यंत्रणा ही DB Pension Plan ला मजबूत आर्थिक पाठिंबा देण्याच्या स्थितीत असते ही गोष्ट सुद्धा जागतिक निवृत्तिवेतन निर्देशांकामध्ये पृष्ठ १६ वर पुढील शब्दात नमूद करण्यात आलेली आहे. :-* "Higher government debt is likely to limit the ability of future governments to support their older populations with pension payments and other services. Hence, governments with lower levels of debt are in a stronger financial position to be able to sustain their current level of pension and other payments."**

*(परिच्छेद ९८.१ पहा)*

**"Higher government debt is likely to limit the ability of future governments to support their older populations with pension payments and other services. Hence, governments with lower levels of debt are in a stronger financial position to be able to sustain their current level of pension and other payments."** *(परिच्छेद १०० पहा)*

काढण्यात आली. घटनेने हा अधिकार आपल्याला दिलेला आहे तेव्हा **केंद्राच्या योजनेमध्ये काही दोष आहेत काय? त्यात काही सुधारणा करणे आवश्यक आहे काय? याचा सुद्धा विचार करण्याची राज्यशासनाला गरज वाटली नाही आणि त्यामुळेच राज्यशासकीय कर्मचाऱ्यांच्या किंवा शिक्षकांच्या कोणत्याही संघटनांशी चर्चा न करता ही अधिसूचना काढण्यात आली.**

**६९.** सुरुवातीला कर्मचाऱ्यांच्या वेतनातून १० टक्के आणि शासनातर्फे १० टक्के एवढी रक्कम भांडवली बाजारात वळती करण्याचा प्रस्ताव या योजनेमध्ये अंतर्भूत होता. अर्थात हे सुद्धा विचारपूर्वक ठरविण्यात आलेले नव्हते. काही दिवसांनी हा साराच प्रकार भांडवली बाजारातील खेळाडूंच्या बाजूने पाहिजे तेवढा एकतर्फी होत नाही असे लक्षात आल्यानंतर शासनाचा हिस्सा १० टक्क्यांवरून १४ टक्के करण्यात आला. मुळात तो १० टक्के का ठेवण्यात आला होता? नंतर तो १४ टक्के का म्हणून करण्यात आला? **याबाबत विचार केला तर असे दिसून येते की, भांडवली बाजारातील खेळाडूंना शासनावरील ४ टक्के बोजा वाढवूनसुद्धा खूश करण्याच्या धोरणाशिवाय त्यात दुसरे काही दिसून येत नाही.**

**७०.** देशाच्या मा.वित्तमंत्र्यांनी दिनांक २४ मार्च २०२३ रोजी लोकसभेमध्ये यासंदर्भात एक महत्त्वपूर्ण घोषणा केली. नव्या पेन्शन योजनेच्या संदर्भात अधिकारी व कर्मचारी यांनी ज्या काही तक्रारी व अडचणी व्यक्त केलेल्या आहेत त्या लक्षात घेऊन मार्ग काढण्यासाठी एक समिती नेमण्यात येईल अशा अर्थाची ही घोषणा होती. लक्षात घेण्यासारखी बाब अशी की, नवीन पेन्शन योजना अस्तित्वात आल्यानंतर २० वर्षांनी सुद्धा "कर्मचाऱ्यांच्या हिताच्या सर्व बाबी लक्षात घेऊन आम्ही ही योजना अंमलात आणली आहे त्यामुळे आता समिती वगैरे नेमण्याची काही आवश्यकता नाही" **असे मा.वित्तमंत्री घोषित करू शकले नाही यातच अपराधीपणाचा कबुलीजबाब आहे.** (DCPS to NPS)

**७१.** अजून गर्भाशयात असलेल्या व जन्मसुद्धा न घेतलेल्या भावी कर्मचाऱ्यांच्या बोडख्यावर DCPS बसविण्यात आली. जसजशी नव्याने भरती झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढू लागली आणि नव्या पेन्शन योजनेचे भयानक स्वरूप दिसायला लागले त्यावेळेला त्याबाबतचा आक्रोश ऐकून केंद्रशासनाने दिनांक ६ एप्रिल २०२३ रोजी एक कार्यालयीन ज्ञापन (Office Memorandum) अधिसूचित केले. या ज्ञापनाचा विषय "Setting up of a Committee to review the Pension System for Government Employees" असा असून त्यानुसार वित्त सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समितीच्या कार्यकक्षा ह्या पुढील शब्दात ठरवून देण्यात आलेल्या आहेत. :-

"3. The Terms of Reference of the Committee shall be as under:

(i) Whether in the light of the existing framework and structure of the National Pension System, as applicable to Government employees, any changes therein are warranted;

(ii) If so, to suggest such measures as are appropriate to modify the same with a view to improving upon the pensionary benefits of Government employees covered under the National Pension System, keeping in view the fiscal implications and impact on overall budgetary space, so that fiscal prudence is maintained to protect the common citizens."

या अधिसूचनेचा सरळ सरळ अर्थ असा आहे की, मुळात ही नवीन पेन्शन योजना विचारपूर्वक तयार करण्यात आलेली नव्हती. भांडवली बाजारातील खेळाडूंचे घर भरण्याचा कार्यक्रम हा पक्का कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीनंतरच्या आयुष्याचा त्याबाबतीत कोणताही विचार करण्यात आलेला नव्हता हेच त्यातून स्पष्ट होते. **त्याबाबतचा विचार जर पूर्वीच केला असता तर २० वर्षानंतर अशी समिती नेमण्याची वेळ येण्याचे कोणतेही कारण नव्हते.**

**७२.** जी स्थिती केंद्रशासनाची तीच स्थिती याबाबतीत राज्यशासनाची आपल्याला दिसून येते. घटनेने आपल्या कर्मचाऱ्यांविषयी दिलेला अधिकार आपला आपण न वापरता राज्यशासनाने यापूर्वी केंद्रशासनाच्या निर्णयाची झेरॉक्स कॉपी काढल्यामुळे आता याबाबतीत सुद्धा त्यांना तसेच करणे भाग पडले. "राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली व जुनी निवृत्तिवेतन योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करणेबाबत" या विषयावर महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दिनांक १४ मार्च २०२३ रोजी एक शासननिर्णय निर्गमित केला असून एक समिती गठीत केलेली आहे. ती समिती कशासाठी गठीत केलेली आहे याचा या शासननिर्णयातील उल्लेख पुढीलप्रमाणे आहे. :-

"राज्यशासनाच्या सेवेत दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली (NPS) (पूर्वीची परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना DCPS ) लागू करण्यात आली आहे. राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली व जुनी निवृत्तिवेतन योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे." या शासननिर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये पुढीलप्रमाणे समितीची कार्यकक्षा नमूद करण्यात आलेली आहे. :-

"२. सदर समितीने राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली व जुनी निवृत्तिवेतन योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करून दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीअंती खात्रीशीर आर्थिक व सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजनेबाबतची शिफारस/अहवाल शासनास ३ महिन्यात सादर करावा."

महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाचा हा शासननिर्णय काळजीपूर्वक वाचला तर असे चटकन लक्षात येते की, **नवीन पेन्शन योजना लागू करण्याचा राज्यशासनाचा मूळ निर्णय हा विचारपूर्वक घेण्यात आलेला नव्हता. कारण तसा तो घेण्यात आला असता तर राज्यस्तरावर सुद्धा अशी समिती नेमण्याचे कोणतेही कारण नव्हते.**

**७३.** सेवानिवृत्तीनंतर शासकीय कर्मचाऱ्यांच्या किंवा शिक्षकांच्या भवितव्याची चिंता हा नवीन पेन्शन योजनेचा मुख्य हेतू नसून भांडवली बाजारातील खेळाडूंना त्यांच्या खेळासाठी मोठ्या प्रमाणात भांडवल उपलब्ध करून देणे हाच मुख्य हेतू आहे, ही गोष्ट स्पष्ट आहे. या प्रतिपादनामध्ये भांडवली बाजाराचा व त्यामधील

***खाजगी भांडवलदारांच्या वर्तनाचा आकृतिबंध : खाजगी कंपन्या किंवा खाजगी भांडवलदार हे कर्मचाऱ्यांचे भले करण्यासाठी भांडवली बाजारात उतरलेले नसतात. जास्तीत जास्त नफा (profit) मिळविणे हे त्यांचे एकमेव उद्दिष्ट असते. त्यामुळे ते आपले महत्तम नफा कमाविण्याचे काम सोडून शासनाने झटकलेली निवृत्ती वेतनाची जबाबदारी जुन्या पेन्शन योजनेच्या समतूल्य पार पाडतील असे गृहीत धरणे हे संपूर्णपणे चुकीचे आहे.*** *(परिच्छेद १०५ पहा)*

***भांडवली बाजारात सतत चालू असलेल्या या खेळामध्ये जेव्हा एका पक्षाला फार मोठा लाभ होतो तेव्हा दुसऱ्या कोणाला तरी तेवढाच तोटा होत असतो. हा तोटा भोगणारे कोण असतात? साधारणपणे भांडवली बाजारात चालणाऱ्या खेळाविषयी अनभिज्ञ असलेल्या सामान्य गुंतवणूकदाराला याचा फार मोठा फटका बसतो व तेवढाच जोरदार दुसरा फटका हा सामान्य लोकांची गुंतवणूक असलेल्या शासननियंत्रित कंपन्या व उपकंपन्या यातील गुंतवणुकीला बसतो. इतरत्र 'बड्या' लोकांना झालेले नुकसान भरून काढण्यासाठी शासननियंत्रित कंपन्या व उपकंपन्या यांचा हुकूमी एक्का म्हणून वापर केला गेल्याची ऐतिहासिक उदाहरणे उपलब्ध आहेत.*** *(परिच्छेद १०६ पहा)*

खेळाडूंचा वारंवार उल्लेख असल्यामुळे त्यांची ओळख करून घेणे आवश्यक आहे. "The Great Indian Fraud" या पुस्तकाचे लेखक श्री.स्मारक स्वेन यांनी या भांडवली बाजाराचे व खेळाचे स्वरूप पुढीलप्रमाणे विशद केलेले आहे.:-

"Any paper traded for value in anticipation of profits is a security. The paper is a contract and can be in physical or electronic form. **Thus, shares, scrips, stocks, bonds, debentures, derivatives and mutual fund units are securities.** Securities are an important source of capital for running business. A market for acquiring and/or trading securities increases the availability of capital for running businesses." (*Page 54*)

**७४.** सर्व प्रकारच्या सूचिबद्ध प्रतिभूतींची खरेदी-विक्री करण्याचे हे ठिकाण. हा बाजार मुख्यत्वे शेअर बाजार म्हणून ओळखला जातो. Bombay Stock Exchange व National Stock Exchange ही या बाजाराची मुख्य ठिकाणे आहेत. या बाजारातील प्रत्येक खेळाडूचा उद्देश महत्तम फायदा (Profit) मिळविणे हा असतो. मागणी पुरवठ्याच्या आधारावर या बाजारातील व्यवहार चालतात. केवळ नफा मिळविणे हाच हेतू असल्यामुळे कृत्रिमरीत्या भाव वाढविणे किंवा पाडणे हा भांडवली बाजारातील खेळाडूंचा आवडता छंद असतो. अशा प्रकारचे खेळ या बाजारात सतत सुरू असतात.

**७५.** या बाजाराचा इतिहास पाहिल्यास काही मोजक्या प्रसंगी यातील काही खेळाडूंच्या करामतींनी एवढे राक्षसी स्वरूप धारण केले की, त्यामुळे हा बाजारच नव्हे तर संपूर्ण देशसुद्धा हादरून गेल्याचे दिसून येते. अशा काही प्रसंगांची माहिती या लेखातून पुढे दिलेली आहे. भांडवली बाजारातील खेळाडू या खेळातून लक्षावधी रुपयांचा नफा कमवित असतात. कोणाला तरी नफा होतो तेव्हा कोणाला तरी तोटा होत असतो. या खेळाविषयी अनभिज्ञ असलेल्या लक्षावधी सामान्य लोकांना या असामान्य खेळात फार मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागते. त्या शिवाय नुकसानीचा फार मोठा भार मोठ्या प्रमाणात एलआयसी, बँका किंवा अन्य वित्तीय संस्थांनी चालविलेल्या मुच्युअल फंडामध्ये सहभागी असलेल्या सामान्य लोकांना सहन करावा लागतो. **त्याची काही राष्ट्रीय स्तरावरील उदाहरणे या लेखात पुढे नमूद केलेली आहेत.**

**७६.** "The fight is between 1% and remaining 99%" असा हा संघर्ष आहे हे मी यापूर्वीच या लेखाच्या परिच्छेद २३ मध्ये स्पष्ट केलेले आहे. हा संघर्ष मुख्यत्वे वैचारिक स्वरूपाचा आहे. जुनी पेन्शन योजना विरुद्ध नवीन पेन्शन योजना यांच्यातील या संघर्षामध्ये जुन्या पेन्शन योजनेच्या विरोधात कोणकोणते मुद्दे मांडल्या गेले आहेत, जात आहेत ते लक्षात घेऊन शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांना उत्तर देण्याचा या लेखामध्ये प्रयत्न केलेला आहे. मुळात जुन्या पेन्शन योजनेला विरोध करणारे लिखाण हे केंद्रशासनाच्या सेवेत असलेले काही अधिकारी, पदाधिकारी वृत्तपत्रीय लिखाणातून करीत आहेत. मा.पंतप्रधानांचे अत्यंत विश्वासू समजले जाणारे श्री.अरविंद पंगारिया यांनी लिहिलेला एक लेख दिनांक १४ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या इंडियन एक्स्प्रेस मध्ये प्रसिद्ध झालेला असून त्यामध्ये त्यांनी "It was sin to promise the OPS because the future State Government will have to bear the burden when those who were appointed in 2004 retired in 2034." असे मत व्यक्त केलेले आहे. जुन्या पेन्शन योजनेच्या विरोधात व नवीन पेन्शन योजनेच्या समर्थनात त्यांच्यासारख्या अनेक तज्ज्ञांनी लिखाण केलेले आहे.

**७७.** रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर श्री. मायकेल पात्रा यांच्या नेतृत्त्वाखाली त्याच बँकेच्या संशोधन विभागात काम करणारे सर्वश्री रचित सोलंकी, सोमनाथ शर्मा, आर.के.सिन्हा, समीर रंजन बेहरा आणि आत्रि मुखर्जी या अधिकाऱ्यांनी तयार केलेले एक टिपण *(यापुढे उल्लेख "रिझर्व्ह बँकेच्या पाच अधिकाऱ्यांनी तयार केलेले टिपण" असा)* रिझर्व्ह बँकेच्या सप्टेंबर २०२३ च्या बुलेटीनमध्ये प्रकाशित करण्यात आलेले आहे. याबाबतचा तपशीलवार वृत्तांत इकॉनॉमिक टाईम्समध्ये दिनांक १९ सप्टेंबर २०२३ रोजी प्रकाशित करण्यात आलेला आहे. या वृत्तांताचा मथळाच मुळात "Old Pension Scheme could put severe strain on States' Finances" असा आहे आणि नंतर या मथळ्याचे समर्थन करणारे तपशील या वृत्तांतामध्ये नमूद केलेले आहेत. विशेष आश्चर्याची गोष्ट अशी की, इकॉनॉमिक टाईम्समध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या या वृत्तांतातील शेवटचा परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे.:- "The NPS was introduced by the Central Government in 2004. Subsequently, most States switched to the NPS, with only **West Bengal and TamilNadu continuing with the OPS, the article said."**

**७८. "सन २००४ मध्ये पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू या दोन राज्यांनी नवीन पेन्शन योजना स्वीकारली नाही आणि अत्यंत समाधानकारकपणे जुनी पेन्शन योजना या राज्यांमध्ये आजही चालू आहे."** हा या वृत्तांतातील शेवटच्या परिच्छेदातील मजकूर या टिपणात उपस्थित करण्यात आलेल्या सर्व मुद्यांना उत्तरे देणारा आहे. श्री.अरविंद पंगारिया यांच्या युक्तिवादाला सुद्धा त्यामध्ये उत्तर देण्यात आलेले आहे. पुढील २० वर्षानंतर राज्य सरकारांना हा

***एका बाजूला १९५७ च्या केंद्रीय अंदाजपत्रकात बसविलेल्या एक्सपेंडिचर टॅक्समुळे व दुसऱ्या बाजूला श्री.मुंदडा यांनी फार मोठ्या प्रमाणात आपल्याच कंपन्यांची नकली समभागपत्रे बँकांकडे गहाण ठेवली अशी अफवा पसरल्यामुळे श्री.मुंदडा यांच्या कंपन्यांचे भाव धडाधड पडायला लागले. त्याचबरोबर बाजारातील तेजीही कोसळली. श्री.हरिदास मुंदडा यांनी दिनांक २१ जून १९५७ रोजी केंद्रशासनातील वित्त सचिव श्री.एच.एम.पटेल (ICS) यांची भेट घेतली व भारतीय आयुर्विमा निगमने (LIC) माझ्या कंपन्यांचे समभाग मोठ्या प्रमाणात खरेदी करावे अशी त्यांना विनंती केली. श्री.पटेल यांनी एलआयसीचे चेअरमन श्री.जी.आर.कामत (दुसरे ICS) आणि एलआयसीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री.एल.एस.वैद्यनाथन यांच्याशी चर्चा केली. मार्च-एप्रिल १९५७ मध्ये एलआयसीने तीन व्यवहारांमध्ये मुंदडा यांच्या कंपन्यांचे जवळ जवळ १.५२ कोटी रुपये किमतीचे समभाग खरेदी केले.*** *(परिच्छेद १०७ पहा)*

**Within weeks of this statement, the stock market scam broke. The scam was run by a group of brokers who illegally accessed funds from banks - Indian as well as foreign - to finance speculation on an enormous scale. The loss to the banking system alone was estimated at over Rs. 4,000 crore. The operation allegedly involved individuals from banks, financial institutions, public sector organizations, the central bank, the finance ministry as well as other economic ministries - to varying degrees. The stock market panicked and fell, before correcting itself, but not before thousands of small investors were wiped out.** *(परिच्छेद ११३ पहा)*

भार कसा सहन होईल? याची चिंता करणाऱ्या पंगारिया यांना गेली २० वर्षे तो 'भार' सोसणाऱ्या या दोन राज्यांनी प्रत्यक्ष कृतीने उत्तम उत्तर दिलेले आहे. याशिवाय राजस्थान, छत्तीसगड, झारखंड, पंजाब आणि हिमाचल प्रदेश यासारख्या राज्यांनी जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू केली असून त्या योजनेच्या पोषणार्थ साधनसामुग्रीची सुद्धा जुळवाजुळव केलेली आहे. सिक्कीम या राज्याने सुद्धा जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. **सारांश काय तर आपल्या कर्मचाऱ्यांची अनेक वर्षे उत्तमरीतीने चालू असलेली योजना उद्ध्वस्त करून शासन स्वामित्वाधिकारित धनाचा प्रवाह हा भांडवली बाजारातील खेळाडूंकडे वळता करावयाचा काय? हाच यातील खरा प्रश्न आहे.**

७९. नवीन पेन्शन योजनेच्या समर्थनार्थ व जुन्या पेन्शन योजनेच्या विरोधात अनेक विचारवंतांनी विचार मांडले असले तरी या सर्व विचारांना एकत्र करून एका ठिकाणी मांडण्याची जबाबदारी राज्याचे मा.उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांना पार पाडावी लागली असे दिसून येते. शुक्रवार, दिनांक १० मार्च २०२३ रोजी महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९७ अन्वये झालेल्या अल्पकालीन चर्चेला उत्तर देत असतांना त्यांनी हे विचार मांडलेले आहेत. एक म्हणजे याबाबतचे सर्वच मुद्दे त्यांच्या या प्रतिपादनात समाविष्ट आहेत व दुसरे असे की, ते वृत्तपत्रांतून मांडलेले विचार नसून खुद्द सभागृहामध्ये निश्चित शब्दात मांडण्यात आलेले मुद्दे आहेत. त्यामुळे त्यानांच उत्तर देणे हे निश्चितपणे जास्त श्रेयस्कर होय.

८०. अर्थात याबाबतीत एक गोष्ट स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक वाटते ती अशी की, श्री.देवेंद्रजी फडणवीस या व्यक्तीचे हे विचार आहेत असे मला वाटत नाही. कारण व्यक्तिशः ते समन्यायी वाटपाच्या विचारांचे कट्टे समर्थक आहेत. भारतीय संविधानाच्या कलम ३७१(२) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्राच्या तीनही भागात निधीचे समन्यायी वाटप व्हावे यासाठी अनुशेषग्रस्त भागातील आम्ही काही विधानमंडळ सदस्यांनी उच्च न्यायालयात याचिका (W.P.No. 5872/2003) दाखल केली होती. त्यामध्ये मी स्वतः त्या 'फोरम'चा अध्यक्ष या नात्याने प्रथम याचिकाकर्ता होतो व श्री.देवेंद्रजी फडणवीस हे सोबत सहयाचिकाकर्ते होते. दिनांक ६ मे २००८ रोजी या प्रकरणी "Governor is fully empowered to make necessary allocation of funds to improve the backward areas like "Marathwada and Vidharbha". The directives of the Governor are binding on the State." असा अनुकूल निर्णय मा.उच्च न्यायालयाने या प्रकरणी दिला होता.

८१. त्यामुळेच मी असे नमूद करू इच्छितो की, श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी सभागृहामध्ये जे विचार मांडलेले आहेत ते त्यांचे वैयक्तिक विचार नसून त्यांच्या पक्षाने व त्या पक्षाच्या सरकारने केंद्रस्तरावर घेतलेल्या निर्णयाचे समर्थन करणारे ते विचार आहेत. त्यांच्या पक्षाच्या मुख्यमंत्र्यांनी कर्नाटकामध्ये पराभव झाल्यानंतर "जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय आम्हाला घेऊ द्या! असे आम्ही पक्षश्रेष्ठींना सांगितले होते. त्यांनी आमचे म्हणणे ऐकून घेतले नाही व आम्हाला हा पराभव स्वीकारावा लागला" अशा अर्थाचे उद्‌गार काढल्याचे अनेक टिव्ही चॅनेलवरून आपण पाहिलेले आहे. तशाच प्रकारची भावना त्यांच्या पक्षाच्या मुख्यमंत्र्यांनी पराभव झाल्यानंतर हिमाचल प्रदेशामध्ये काढल्याचेसुद्धा आपण पाहिलेले आहे. आणि म्हणूनच श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी सभागृहामध्ये मांडलेले विचार त्यांचे व्यक्तिगत विचार नसून त्यांच्या पक्षाच्या धोरणाचे अधिकृत विचार आहेत हे स्पष्ट आहे आणि म्हणूनच या पुढील विवेचनामध्ये मा.उपमुख्यमंत्र्यांचे विचार असा त्या विचारांचा उल्लेख केलेला आहे. आता पुढे एक एका मुद्याचा विचार करू.

८२. **मा.उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस : "पूर्वी pay as you go असलेली जुनी पेन्शन योजना आता जगात कुठेही नाही. प्रगत अर्थव्यवस्थांनी सर्वत्र Contributory Pension Scheme स्वीकारल्या आहेत. Canadian Pension Fund असेल, Australian Pension Fund असेल, असे सर्व Pension Fund भारतात पैसा लावतात. अनेक वेळा ते सरकारी प्रकल्पावर पैसा lend करतात, अनेक वेळा ते co-lender होतात. याचे कारण असे आहे की, साधारणपणे अर्थव्यवस्था बॅलन्स ठेवावयाची असेल तर पेन्शन, पगार आणि व्याज प्रदान या तीन बाबींवरील खर्च मर्यादित ठेवणे अत्यंत महत्त्वाचे असते."**

**दोन देशातील निवृत्ती वेतन योजनांचा उल्लेख करून सबंध जगात पेन्शन योजनेची काय स्थिती आहे? याविषयीचा विचार मा.उपमुख्यमंत्र्यांनी उपरोक्त शब्दात मांडलेला आहे.** कोणत्याही देशामधील सेवानिवृत्ती वेतनाची व्यवस्था ही त्या देशाची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन इतिहासाच्या ओघात विकसित झालेली असते आणि त्यामुळेच कोणत्याही एका देशाच्या निवृत्तिवेतन व्यवस्थेची तुलना दुसऱ्या देशाच्या निवृत्तिवेतन व्यवस्थेशी करणे ही एक वादग्रस्त तुलना असते. **मा.उपमुख्यमंत्र्यांनी उपरोक्त**

**The entire community is aggrieved if economic offenders who ruin the economy of the state are not brought to book. A murder may be committed in the heat of the moment upon passions being aroused. An economic offence is committed with cool calculation and deliberate design with an eye on personal profit regardless of the consequences to the community."** *(परिच्छेद ११५ पहा)*

**विचार मांडतांना जुनी पेन्शन योजना आता जगात कोठेही नाही असा विचार मांडल्यामुळे याबाबतीत जगात खरोखर काय स्थिती उपलब्ध आहे हे जाणून घेण्यासाठी जागतिक निवृत्तिवेतन निर्देशांकाची माहिती करून घेणे आवश्यक आहे.**

**८३. जागतिक निवृत्तिवेतन निर्देशांक (Global Pension Index) :** जगातील ६४ टक्के लोकसंख्या ज्या देशांमध्ये निवास करते, अशा ३९ देशांच्या निवृत्तिवेतन व्यवस्थांचा अभ्यास करून जागतिक निवृत्तिवेतन निर्देशांक तयार करण्यात आला आहे. तो "Mercer CFA Institute Global Pension Index 2020" या मथळ्याने प्रकाशित करण्यात आला आहे. *(यापुढे उल्लेख 'जागतिक निवृत्तिवेतन निर्देशांक' असा)* पेन्शनच्या क्षेत्रात गेली अनेक वर्षे कार्य करीत असलेले जागतिक स्तरावरील तज्ज्ञ डॉ.डेव्हिड नॉक्स यांच्या नेतृत्त्वाखाली हा निर्देशांक तयार करण्यात आला असून या ३९ देशात उपलब्ध असलेल्या पेन्शन योजनांचा अभ्यास करून हा निर्देशांक प्रकाशित करण्यात आला आहे. एकूण १०० अंकांचा हा निर्देशांक असून हे १०० अंक तीन निरनिराळ्या उपनिर्देशांकामध्ये विभाजित करण्यात आलेले आहेत.

**८४. तीन उपनिर्देशांक (Sub-Index) :** त्या त्या देशाच्या पेन्शन योजनेचे निर्देशांकातील स्थान ठरवितांना तीन उपनिर्देशांकाचा वापर करण्यात आला आहे. (१) पर्याप्तता (२) अविरतता (३) एकात्मता असे हे तीन उपनिर्देशांक आहेत.

**(i) पर्याप्तता उपनिर्देशांक (Adequacy Sub-Index) :** सेवानिवृत्ती नंतर प्रत्येक सेवानिवृत्ताला समाधानकारक जीवन जगता यावे तसेच योग्य ते पुरेसे राहणीमान उपलब्ध व्हावे हा पेन्शन योजनेचा मुख्य हेतू असतो. हा हेतू लक्षात घेऊन त्या त्या देशाच्या पेन्शन व्यवस्थेकडून असे पुरेसे उत्पन्न सेवानिवृत्तीनंतर उपलब्ध करून दिले जाते किंवा नाही याची पाहणी हा पर्याप्तता (Adequacy) उपनिर्देशांकाचा आधार असून **त्याला ४० गुण देण्यात आलेले आहे.** निवृत्त होतांना प्राप्त होत असलेल्या सरासरी वित्तलब्धीच्या किमान ५० टक्के ते १५० टक्के इतकी राशी सेवानिवृत्तीनंतर मिळण्याचा मापदंड या उपनिर्देशांकामध्ये आधारभूत मानला आहे. "This sub-index considers the base (or safety-net) level of income provided by each system as well as the net replacement rate at income levels ranging from 50% to 150% of the average wage."

**(ii) अविरतता उपनिर्देशांक (Sustainability Sub-Index) :** अस्तित्वात असलेल्या पेन्शन योजनेला दिलेले संरक्षण लक्षात घेऊन कायम टिकून राहण्याची त्या पेन्शन योजनेची गुणवत्ता म्हणजे अविरतता (Sustainability) होय. **फार मोठ्या प्रमाणात कर्ज काढण्याकडे कल असलेल्या शासनकर्त्यांची पेन्शन योजनेला टिकवून ठेवण्याची शक्ती कमी होत जाते** व त्याचा अशा पेन्शन योजनेच्या अविरततेवर म्हणजे टिकून राहण्याच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. "Finally, given the key role that the provision of a public pension plays in most systems, **the level of government debt and public pension expenditure represent important factors affecting a system's long-term sustainability** and the future level of these pensions." **या उपनिर्देशांकाला ३५ गुण देण्यात आलेले आहे.**

**(iii) एकात्मता उपनिर्देशांक (Integrity Sub-Index) :** या ना त्या प्रकारे समाजातील सर्वच घटकांना (शासकीय व अशासकीय) कोणत्या ना कोणत्या स्वरूपामध्ये निवृत्तिवेतन उपलब्ध करून देण्याऱ्या पेन्शन योजनेची बांधणी नियम व कायद्यांवर आधारित असणे या बाबी एकात्मता (Integrity) उपनिर्देशांकामध्ये आधारभूत मानलेल्या आहेत. "This sub-index therefore considers the role of regulation and governance, the protection provided to plan members from a range of risks and the type of communication provided to individuals. In each case, we consider the requirements set out in the relevant legislation and not the best practice delivered by some pension plans." **या उपनिर्देशांकाला २५ गुण देण्यात आलेले आहेत.**

**८५.** या तीन उपनिर्देशांकाना देण्यात आलेले गुण एकत्रित करून १०० अंकांचा जागतिक निवृत्तिवेतन निर्देशांक (Global Pension Index) तयार करण्यात आलेला आहे. **निर्देशांकामध्ये प्रदान करण्यात आलेले १०० गुण लक्षात घेता नेदरलँडला ८२.६ गुण आणि डेन्मार्क या देशाला ८१.४ गुण मिळालेले आहेत. सन २०२० चे मोजमाप करतांना भारतातील नव्या पेन्शन योजनेस सुद्धा हिशेबात धरल्यामुळे भारताच्या पेन्शन योजनेला ४५.७ गुण मिळालेले आहे. या जागतिक निवृत्तिवेतन निर्देशांकामध्ये मिळालेले गुण लक्षात घेऊन या ३९ देशांची वर्गवारी A, B, C, D अशा चार वर्गांमध्ये करण्यात आलेली आहे. त्यात भारत हा "D" वर्गवारीमध्ये आहे. अशी ही जागतिक निवृत्तिवेतन निर्देशांकातील स्थिती आहे.**

**८६.** जगातील अनेक देशांच्या निवृत्तिवेतन व्यवस्थांचा आढावा घेतला तर ढोबळमानाने या व्यवस्था तीन प्रकारांमध्ये मोडतात.

**(i) DB Plan : Defined Benefit Plan :** In a DB plan, benefits are defined in advance based on the employee's final or average salary and those benefits are guaranteed by the government as the sponsor.

**(ii) DC Plan : Defined Contribution Plan :** In contrast, DC plans do not have a guarantee component. The pension benefits depend upon the market performance of the pension fund and the government's cost is limited to a prespecified rate of contribution.

**(iii) Hybrid Pension Arrangements.**

**(a)** DB plan मध्ये सेवानिवृत्त झाल्यावर निवृत्तिवेतन धारकाला किती निवृत्तिवेतन मिळेल? ही गोष्ट निश्चित ठरलेली असते. या योजनेमध्ये कर्मचाऱ्याला कोणताही सहभाग द्यावयाचा नसतो. पेन्शन योजनेसाठीची तरतूद हा शासनाच्या वार्षिक अंदाजपत्रकाचा एक भाग असतो. निवृत्त झाल्यानंतर सेवेतून बाहेर गेलेल्या व्यक्तीला मिळणारे वेतन असे या निवृत्तिवेतनाचे स्वरूप असते आणि त्यामुळेच या योजनेला अनेकदा a pay as you go असेही संबोधल्या जाते. अशा योजनेला अंदाजपत्रित निधी पुरविण्याची जबाबदारी ही शासनाने घेतलेली असते त्यामुळे या निवृत्तिवेतन योजनेला "Funded DB pension plan" असेही म्हटले जाते.

**(b)** DC plan मध्ये निवृत्त झालेल्या व्यक्तीला किती निवृत्तिवेतन मिळेल? याविषयीची कोणतीही निश्चिती नसते. त्याला मिळणारे निवृत्तिवेतनाचे लाभ हे गुंतवणुकीवर मार्केटमध्ये मिळणाऱ्या परताव्याच्या प्रमाणात मध्यस्थाकडून दिल्या जातात. नवी पेन्शन योजना लागू करण्यासाठी जो कायदा करण्यात आला त्या कायद्याच्या कलम 20 (2) (g) मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे. :-

"(g) there shall not be any implicit or explicit assurance of benefits except market based guarantee mechanism to be purchased by the subscriber;" पेन्शन फंडामध्ये अशी गुंतवणूक करतांना कर्मचाऱ्याला काही सहभाग द्यावा लागतो व शासन काही सहभाग देत असते.

**(c)** मिश्र निवृत्तिवेतन योजनेमध्ये (Hybrid Pension Arrangements) DB plan व DC plan यांचे मिश्रण करून निवृत्तिवेतन योजनेची बांधणी केली जाते. ज्या देशामध्ये कर्मचारी संघटना प्रभावीपणे आपले म्हणणे मांडू शकल्या नाहीत व निवृत्तिवेतनाच्या निश्चित रकमेची अजिबात हमी न देणे हे शासनालासुद्धा लाजिरवाणे वाटले किंवा वाटत असते अशा वेळी किमान काही तरी तुटके फुटके निवृत्तिवेतन मिळू शकेल व बाकी सारा भाग गुंतवणुकीच्या परताव्यावर अवलंबून असेल अशाप्रकारची व्यवस्था या मिश्र निवृत्तिवेतन योजनेमध्ये समाविष्ट असते.

**८७.** Reserve Bank of India Bulletin, Septemeber 2023 Volume LXXVII Number 9 च्या

**(a)** पृष्ठ ८२ वर Classification of Pension Plans या प्रकरणातून वेगवेगळ्या तीन प्रकारच्या निवृत्तिवेतन व्यवस्थेची माहिती आपल्याला उपलब्ध होते. पुर्वपरिच्छेदाच्या उपपरिच्छेद (i) (ii) (iii) मध्ये दिलेली माहिती शब्दशः त्या प्रकरणातूनच वर उधृत केलेली आहे.

**(b) पृष्ठ ८४ वर कोणत्या देशामध्ये कोणत्या प्रकारची निवृत्तिवेतन योजना उपलब्ध आहे याविषयी निरनिराळ्या तेरा देशांची माहिती नमूद केलेली आहे. या माहिती प्रमाणे केंद्रशासनाच्या कर्मचाऱ्यांना तसेच राज्यशासनाच्या कर्मचाऱ्यांना नेदरलॅन्ड मध्ये Funded DB pension plan लागू आहे. स्वित्झर्लंड मध्येसुद्धा या दोनही स्तरावरच्या कर्मचाऱ्यांना Funded DB pension plan लागू आहे.**

**(c)** पृष्ठ ८५ वर आशियातील देशांमध्ये अस्तित्वात असलेल्या पेन्शन योजनांची माहिती "Public Pension System in Asian Countries" या मथळ्याखाली पुढील शब्दात नमूद आहे.:- **"Further, the national pension provision in Asia is very diverse. While Philippines, Thailand, Vietnam and Pakistan have DB schemes, countries like China, Indonesia, Malaysia, Singapore, India and Sri Lanka have operationalised DC schemes."**

**(d)** रिझर्व्ह बँकेच्या याच बुलेटीनच्या पृष्ठ ८४ वर कॅनडामध्येसुद्धा केंद्रशासकीय कर्मचाऱ्यांना Funded DB pension plan लागू आहे असे नमूद आहे. **मुद्दाम ही अधिकृत माहिती देण्याचे कारण असे की, "जुनी पेन्शन योजना आता जगात कुठेही नाही" हे मा.उपमुख्यमंत्र्यांचे विधान वस्तुस्थितीवर आधारित नाही.**

**८८. मा.उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस : "सभापती महोदया, आपण महाराष्ट्राचा सरळ विचार केला तर आज आपला committed expenditure ५६ टक्के आहे. आपण ७५ हजार भरती करीत आहोत हे ठीक आहे. पण एकही भरती केली नाही तरी आपला बजेटशी committed expenditure ८३ टक्क्यांवर जाणार आहे. मी own tax revenue शी म्हणत नाही. Committed expenditure in the budget - it will go upto 83%. पगार, पेन्शन, व्याज रक्कम हे ८३ टक्क्यांवर जाणार आहे. माहितीमध्ये ५६ टक्के आहे. committed expenditure मध्ये घेतलेल्या कर्जावरील व्याज देखील पकडावे लागते. आपण ते सर्व पकडून पहावे. ते खरोखर ६० टक्के आहे. आपण ते ५८ टक्क्यांवर खाली आणत आहोत. आपल्याला ही परिस्थिती विचारात घ्यावी लागेल. जुनी पेन्शन योजना हा काही घाईने घेण्याचा निर्णय नाही तर विचारपूर्वक घेण्याचा निर्णय आहे."** मा.उपमुख्यमंत्र्यांनी वर नमूद केलेले जे उद्‌गार सभागृहात काढलेले आहे त्याबाबतची सुद्धा वस्तुस्थिती समजून घेणे आवश्यक आहे.

**८९.** "जुनी पेन्शन योजना हा काही घाईने घेण्याचा निर्णय नाही तर विचारपूर्वक घेण्याचा निर्णय आहे" हे मा.उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केलेले मत निश्चितच विचारात घेण्यायोग्य आहे, असेच कोणीही म्हणेल. विचार करता असे आढळून येते की, जुनी पेन्शन योजना मोडीत काढण्याचा व नवीन पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय हा विचारपूर्वक घेण्यात आलेला नव्हता तर तो घाईघाईने घेण्यात आला होता. याचा पुरावा म्हणून वारंवार आणि वेळोवेळी नवीन पेन्शन योजनेमध्ये ज्या सुधारणा करण्यात आल्या व अजुनही करण्यात येत आहेत हा होय. इतकेच नव्हे तर आता आणखी मोठं ठिगळं लावण्यासाठी समितीची नेमणूक करण्यात आलेली आहे हाच त्याचा आणखी पुढचा पुरावा होय.

**९०.** मा.उपमुख्यमंत्र्यांच्या उपरोक्त परिच्छेदामध्ये 'Committed Expenditure' विषयी त्यांनी मांडलेल्या विचारांची दखल घेणे आवश्यक आहे. त्यासाठी

**(i)** Committed Expenditure : बांधील खर्च

**(ii)** Charged Expenditure : भारित खर्च

**(iii)** Other Expenditure : इतर खर्च

या संज्ञा काळजीपूर्वक समजावून घ्याव्या लागतील.

**९१.** राज्याकडे सर्व मार्गांनी येणारे उत्पन्न राज्याच्या संचित निधीमध्येच जमा करावे लागेल अशी तरतूद घटनेच्या खंड २६६ मध्ये आहे. विधानमंडळाने कायदा करून मान्यता दिल्यावरच व दिल्या प्रमाणे शासनाला संचित निधीतून खर्च करता येईल. (खंड २६६ (३)) असा कायदा करण्याच्या प्रयोजनार्थ "वार्षिक वित्तीय विवरणपत्र" सभागृहाला सादर करावे लागेल. (खंड २०२) या विवरणपत्रामध्ये भारित खर्च (charged expenditure) अमतदेय (Non-votable) भाग म्हणून वेगळा दाखवावा लागेल. इतर खर्च (other expenditure) हा वेगळा मतदेय भाग (votable part) म्हणून दाखवावा लागेल. (खंड २०२ (३)) अमतदेय भागात समाविष्ट असलेल्या खर्चावर चर्चा होऊ शकेल, मतदान करता येणार नाही. हा भाग मतदानाशिवाय मंजूर करावयाचा भाग असेल. इतक्या स्पष्ट तरतुदी भारतीय संविधानात समाविष्ट आहेत.

**९२.** याबाबतच्या घटनात्मक तरतुदी अतिशय स्पष्ट आहेत. कर्जावरील व्याज म्हणून जो काही खर्च करावा लागेल तो खर्च हा महाराष्ट्र राज्याच्या संचित निधी वर भारित खर्च (charged expenditure) असेल. निरनिराळ्या प्रकारचे सहा खर्च हे भारतीय संविधानात राज्याच्या संचित निधीवर भारित खर्च म्हणून नमूद केलेले आहेत. त्याचे तपशील भारतीय संविधानाच्या खंड २०२ च्या उपखंड ३ मध्ये नमूद आहेत. त्या उपखंड ३ मधील आवश्यक मजकूर शब्दशः पुढीलप्रमाणे:-

**"(3) The following expenditure shall be expenditure charged on the Consolidated Fund of each State -**

(a) the emoluments and allowances of the Governor and other expenditure relating to his office;

(b) the salaries and allowances of the Speaker and the Deputy Speaker of the Legislative Assembly and, in the case of a State having a Legislative Council, also of the Chairman and the Deputy Chairman of the Legislative Council;

**(c) debt charges for which the State is liable including interest, sinking fund charges and redemption charges, and other expenditure relating to the raising of loans and the service and redemption of debt;**

(d) expenditure in respect of the salaries and allowances of Judges of any High Court;

(e) any sums required to satisfy any judgment, decree or award of any court or arbitral tribunal;

(f) any other expenditure declared by this Constitution, or by the Legislature of the State by law, to be so charged."

**९३.** उपरोक्त तरतुदी काळजीपूर्वक लक्षात घेतल्या तर घटनात्मक संज्ञा व व्यावहारिक वापरात असलेल्या संज्ञा यांची सरमिसळ करण्याने गोंधळ निर्माण होण्याशिवाय काहीही पदरी पडत नाही. व्याजाच्या रकमा हा भारित खर्च आहे की नाही? या प्रश्नाचे उत्तर "घटनात्मक तरतुदीनुसार तो भारित खर्च आहे" असे आहे व तो व्यावहारिक दृष्टीने बांधील खर्च आहे की नाही? या प्रश्नाचे उत्तरसुद्धा "होय" असेच आहे. वेतन आणि निवृत्तिवेतनावर होणारा खर्च हा घटनात्मकदृष्ट्या भारित खर्च आहे की नाही? या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे आहे. व्यावहारिक दृष्टीने तो बांधील खर्च आहे की नाही? या प्रश्नाचे उत्तर "तो बांधील खर्च आहे" असे आहे. बांधील खर्च म्हणून 'वेतन व निवृत्तिवेतन' या खर्चासोबत 'व्याजावरील भारित खर्च'सुद्धा मा.उपमुख्यमंत्र्यांनी त्यांच्या प्रतिपादनात जोडून दिलेला आहे. आता प्रश्न असा निर्माण होतो की, वेतन व निवृत्तिवेतनावरील बांधील खर्चामध्ये व्याज या मथळ्याखालील भारित खर्चसुद्धा जोडून दिला तर मग सहा प्रकारच्या भारित खर्चापैकी इतर पाच भारित खर्चसुद्धा जोडून देण्यास काय अडचण होती? म्हणजे वेतन व निवृत्तिवेतनावरचा खर्च १०० टक्केच्या वर सुद्धा दाखविता आला असता.

**९४.** फक्त 'व्याज खर्च हा एकटा भारित खर्च' ह्या वेतन व निवृत्तिवेतनाच्या खर्चात जोडून देण्यात आल्यामुळे **अधिकृत कागदपत्रांच्या आधारे वेतन व निवृत्तिवेतनावरील खर्च खरोखरच प्रत्यक्षात किती आहे? हे स्वतंत्रपणे पाहणे आवश्यक झालेले आहे.** वेतन व निवृत्तीवेतनावरील प्रत्यक्ष खर्च किती आहे? याबाबतची अधिकृत माहिती महाराष्ट्र शासनाच्या सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पीय प्रकाशनातील आलेख क्रमांक २ मधून आपणास उपलब्ध होते. या आलेखामध्ये निवृत्तीवेतनावरील खर्च ११ टक्के व वेतनावरील खर्च २४ टक्के दाखविण्यात आला आहे. हा आलेख फोटो पद्धतीने **सहपत्र : तीन** म्हणून **सोबत (पृष्ठ ७१ वर) प्रसृत केलेला आहे.**

**९५. अनेक देशांमध्ये फार मोठे कर्ज काढून व्याजाच्या रकमा वाढविल्या जातात व व्याज खूप वाढले आहे असे सांगून DB Pension Plan हे DC Pension Plan मध्ये बदलविण्यासाठी एक कारण किंवा निमित्त म्हणून व्याजाच्या रकमा पुढे केल्या जातात. इतकेच नव्हे तर फार मोठे कर्ज काढण्याच्या विद्यमान शासनाच्या कृतीमुळे DB Plan ला आधार देण्याच्या भविष्यकालीन सरकारांच्या शक्तीवर कुठाराघात केला जातो ही गोष्ट जागतिक निवृत्तिवेतन निर्देशांक प्रकाशित करतांना डॉ.डेव्हिड नॉक्स यांनी प्रस्तावनेतच पुढील शब्दात नमूद केलेली आहे.** :-

"The significant growth in government debt during 2020 which will, at some future date, affect the ability to pay benefits from pay-as-you-go systems and provide "social protection" programs."

**९६.** कर्ज आणि व्याजाचा विचार केला तर केंद्र शासनाने व राज्यशासनाने गेल्या ५-१० वर्षात व्याजाच्या रकमांचा 'भोंगा' दाखवून जुन्या पेन्शन योजनेची कत्तल करण्याचे उद्दिष्ट समोर ठेऊन भरमसाठ कर्जाची उभारणी केली असे स्पष्टपणे दिसून येते. केंद्रशासनाच्या वित्त विभागाच्या बजेट डिव्हिजनने प्रसृत केलेल्या त्या त्या वर्षाच्या अंदाजपत्रकीय दस्तऐवजांमध्ये उपलब्ध असलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, ३१ मार्च २०१३ रोजी केंद्रशासनावरील कर्जाची रक्कम ५०.३९ लक्ष कोटी रुपये होती. तर ती ३१ मार्च २०२३ रोजी १५२.६१ लक्ष कोटी रुपये झाल्याचे स्पष्टपणे दिसून येते. म्हणजे कर्ज तिप्पटीपेक्षा जास्त झालेले होते. वर्षवार योजनापूर्वक हे कर्ज कसे वाढत गेले याबाबतचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत. :-

**Debt position of the Government of India**

| As on 31st March | Rs. in Crores |
|---|---|
| 1 | 2 |
| 2013 | 50,39,131.01 |
| 2014 | 55,87,149.33 |
| 2015 | 62,78,553.97 |
| 2016 | 68,91,913.58 |
| 2017 | 74,40,574.40 |
| 2018 | 82,32,653.56 |
| 2019 | 90,56,725.48 |
| 2020 | 100,18,120.51 |
| 2021 | 121,21,959.24 |
| 2022 | 135,87,893.16 |
| 2023 | 152,61,122.12 |
| 2024 | 169,46,666.85 |

**९७.** वाढते कर्ज काढण्याच्या उत्साहाबाबत केंद्रशासनाची जी स्थिती आहे तीच स्थिती राज्यशासनाची सुद्धा आहे. "Handbook of Statistics on Indian States" या रिझर्व्ह बँकेने प्रकाशित केलेल्या सन २०२१-२२ च्या प्रकाशनामध्ये ३१ मार्च २०१३ रोजी महाराष्ट्रावर असलेले कर्ज २.८२ लक्ष कोटी रुपये होते व तेच ३१ मार्च २०२२ रोजी ६.०९ लक्ष कोटी रुपये होते असे दिसून येते. म्हणजे जवळ जवळ तिप्पट झालेले होते. इथे सुद्धा दरवर्षी कर्ज वाढविण्याचा नादच लागला होता हे स्पष्टपणे दिसून येते. सन २०१३ पासून तर २०२२ पर्यंत एकाही वर्षी कर्जाची रक्कम कमी झालेली नाही तर ती प्रत्येक वर्षी वाढतच गेलेली आहे हे या हॅन्डबुकमधील आकडेवारीवरून दिसून येते. वर्षवार हे कर्ज कसे वाढत गेले याबाबतचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत. :-

**Debt position of the Government of Maharashtra**
**(i.e. Outstanding Liabilities)**

| As at end March | Rs. in Crores |
|---|---|
| 1 | 2 |
| 2013 | 2,82,010 |
| 2014 | 3,09,327 |
| 2015 | 3,21,806 |
| 2016 | 3,51,441 |
| 2017 | 3,96,001 |
| 2018 | 4,32,479 |
| 2019 | 4,38,842 |
| 2020 | 4,80,955 |
| 2021 | 5,30,310 |
| 2022 | 6,09,000 |

**९८.** कर्जाच्या ह्या रकमा दरवर्षी व सतत वाढत असल्यामुळे देय व्याजाच्या रकमा ह्यासुद्धा सतत वाढत जाणार आणि ह्या व्याजाच्या रकमा वेतन व निवृत्तिवेतनाच्या रकमांना जोडून दिल्या जाणार व आता नवीन पेन्शन योजना लागू केल्याशिवाय गत्यंतर नाही असे हाकारे सुरू केले जाणार. विशेष आश्चर्याची गोष्ट अशी की, 'वेतन व निवृत्तिवेतन' या खर्चाशी कोणताही संबंध नसतांना त्याच्या बोडख्यावर 'व्याज' या खर्चाला चढविले जाणार व बांधील खर्च (Committed Expenditure) खूप वाढलेला आहे असा हाकारा होणार व तसे होत असतांना घटनेच्या कलम २०२ (३) ने सांगितलेल्या निरनिराळ्या सहा भारित खर्चापैकी (Charged Expenditure) एकट्या 'व्याज' ह्या एकाच भारित खर्चाची निवड का करण्यात आली? इतर पाच भारित खर्च वेतन व निवृत्तिवेतनाच्या बोडख्यावर बसवून या बांधील खर्चाच्या रकमा आणखी फुगवून सांगण्यामध्ये काय अडचण आहे? याचा खुलासा करायला कोणीही तयार नाही. कोणत्याही कारणाने कर्ज काढण्याची केंद्रशासनाची व राज्यशासनाची ही लय अशीच अबाधित राहिली तर पुढच्या ५-१० वर्षानंतर 'वेतन आणि निवृत्तिवेतन' यावरील खर्च भागविण्यासाठी ठेकेदारामार्फत (सेवापुरवठाधारक) कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचा एक वेगळा कक्ष हा शासनामध्ये स्थापन करावा लागेल आणि या कक्षातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना "दे उसका भला ! न दे उसका भी भला" असे हाकारे देत रस्तोरस्ती फिरा" असे सांगण्याची वेळ शासनावर आल्याशिवाय राहणार नाही.

**९८.१ फार मोठ्या प्रमाणात शासन ज्यावेळेला कर्ज उभे करते त्यावेळेला भविष्यकाळातील शासनाच्या DB Pension Plan ला उभारी देण्याच्या शक्तीवर विद्यमान शासन कुठाराघात करीत असते. त्यामुळेच कमी कर्ज काढणारी शासन यंत्रणा ही DB Pension Plan ला मजबूत आर्थिक पाठिंबा देण्याच्या स्थितीत असते ही गोष्ट सुद्धा जागतिक निवृत्तिवेतन निर्देशांकामध्ये पृष्ठ १६ वर पुढील शब्दात नमूद करण्यात आलेली आहे. :-**

**"Higher government debt is likely to limit the ability of future governments to support their older populations with pension payments and other services. Hence, governments with lower levels of debt are in a stronger financial position to be able to sustain their current level of pension and other payments."**

## *'पाप-पुण्य' विचार*

**९९. मा.उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस : "आज आपल्या सरकारने जुनी पेन्शन योजना लागू केली तरी काही फरक पडत नाही. कारण याची खरी liability सन २०३० नंतर येणार आहे. एक राज्यकर्ता म्हणून प्रश्न समजून घेऊन त्या प्रश्नाचा long term विचार करायचा की आपले सरकार आहे, दुसरी निवडणूक जिंकायची आहे, liability तयार केली तरी आपल्याला काय, आपण जिंकून येऊ, पुढे येणारे पाहतील असा विचार करायचा, हा प्रश्न राज्यकर्ता म्हणून माझ्यासमोर आहे."**

अशाच प्रकारचे मत मा.पंतप्रधानांचे विश्वासू सहकारी श्री.अरविंद पंगारिया यांनी दिनांक १४ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या इंडियन एक्सप्रेसमध्ये लिहिलेल्या लेखामध्ये पुढील शब्दात व्यक्त केलेले आहे. :-

"It was a "sin" to promise the OPS because the future state government will have to bear the burden when those who were appointed in 2004 retire in 2034."

**१००.** जुनी पेन्शन योजना लागू करणे म्हणजे भविष्यात येणाऱ्या सरकारांच्या विरोधात मोठे 'पाप' करणे होय, अशी भाषा श्री.अरविंद पंगारिया यांनी वापरलेली आहे. विद्यमान सरकारने फार मोठे कर्ज काढावे व DB Pension Plan ला पाठबळ देण्याच्या भविष्यकालीन सरकारांच्या शक्तीला अधु करावे हे फार मोठे 'पुण्य' आहे असे मानणाऱ्या अरविंद पंगारियांनी या मागचा शास्त्रीय विचार समजून घेतला पाहिजे. फार मोठ्या प्रमाणात विद्यमान सरकार ज्यावेळेला कर्ज उभे करते त्यावेळेला भविष्यकालीन सरकारांच्या DB Pension Plan ला बळ देण्याच्या शक्तीवर विद्यमान शासन कुठाराघात करीत असते. त्यामुळेच कमी कर्ज काढणारी शासन यंत्रणा ही DB Pension Plan ला मजबूत आर्थिक पाठिंबा देण्याच्या स्थितीत असते ही गोष्ट जागतिक निवृत्तिवेतन निर्देशांक अहवालामध्ये पृष्ठ १६ वर पुढील शब्दात नमूद करण्यात आलेली आहे. :-

**"Higher government debt is likely to limit the ability of future governments to support their older populations with pension payments and other services. Hence, governments with lower levels of debt are in a stronger financial position to be able to sustain their current level of pension and other payments."**

**१०१.** श्री.अरविंद पंगारिया यांच्यासारख्या ज्येष्ठ विचारवंताने पाप-पुण्याच्या भाषेत या विषयाची मांडणी करावी हे जेवढे आश्चर्यकारक आहे तेवढेच ते खेदजनकही आहे. अगदीच व्यावहारिक परिभाषेत मांडणी करावयाची झाली तर असे म्हणता येईल की, **शासनासमोर दोन प्रस्ताव आहेत** त्यापैकी कोणत्या प्रस्तावाची निवड करावयाची याचा शासनानेच विचार करावयाचा आहे.

***त्याचा परिणाम असा झाला की, त्यांच्या समभागांचे भाव आणखी पडायला सुरुवात झाली. त्यासोबत बाजारसुद्धा. माधवपुरा मर्कंटाईल सहकारी बँकेला ८८८ कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागले. बँक बुडीत निघाली. सगळ्या गुंतवणूकदाराचे पैसे बुडाले. श्री.केतन पारेख यांच्यावर बरेच खटले दाखल झाले आणि त्यांना दोन वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली.*** *(परिच्छेद ११८ पहा)*


**पहिला प्रस्ताव असा की,** भांडवली बाजारातील बरकत चालू राहिली पाहिजे. त्यासाठी प्रत्येक कर्मचाऱ्याने १० टक्के रक्कम दिली पाहिजे, शासन १० टक्के रक्कम देईल, ती कमी पडत असेल तर शासन १४ टक्के देईल. पण काहीही झाले तरी एवढा निधी भांडवली बाजारात दरमहा गेलाच पाहिजे व त्यामुळेच नव्या पेन्शन योजनेचा विचारच स्वीकारला गेला पाहिजे. त्याला पर्याय नाही. हा पहिला प्रस्ताव.

**दुसरा प्रस्ताव असा की,** कर्मचारी संघटनांचे प्रयत्न, त्या त्या वेळी शासनाने घेतलेले निर्णय, वेतन आयोगाचे अहवाल, न्यायालयांचे निर्णय अशी ही शे-दिडशे वर्षाची 'दमछाक' सोसून जुनी पेन्शन योजना आता कुठे स्थिरस्थावर झालेली आहे. कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तीचा अपरिहार्य भाग असलेली ही जुनी पेन्शन योजना बंद करणे म्हणजे आयुष्यभर ज्या कर्मचाऱ्याने शासनाची सेवा केली त्याला आयुष्याच्या उत्तरार्धामध्ये वयोमानपरत्वे आलेले म्हातारपण, बौद्धिक व शारीरिक क्षमतेमध्ये झालेली घसरण, शरीराचे स्नायू आणि बुद्धी यांना उचित आहाराअभावी लागलेली ओहोटी, अशा स्थितीत शासन म्हणून आम्ही त्याला वाऱ्यावर सोडणार नाही. "तू आता निवृत्त झाला आहेस तुझा आमचा शासन म्हणून यापुढे काही संबंध राहिला नाही. कायद्याने नेमलेल्या मध्यस्थाकडे (intermediary) तू जा व त्याच्याकडून तुझ्या सेवाकाळामध्ये बाजारात जी काही गुंतवणूक केली त्यावरील लाभसंचय (distribution of accumulations) वाटपात सहभागी हो" असे आम्ही आमच्या कर्मचाऱ्याला सांगणार नाही. नव्या पेन्शन योजनेच्या या विकृत स्वरूपामुळे शासनामध्ये उद्या भरती होणाऱ्या उमेदवारांच्या गुणवत्तेवर व भरती झालेल्यांच्या कार्यक्षमतेवर त्याचे काय परिणाम होतील याचा आम्ही शासन म्हणून अंदाज करू शकतो. त्यामुळे जुनी पेन्शन योजना सुरू ठेवण्याचा विचार आम्ही शासन म्हणून मान्य करीत आहोत. असा हा दुसरा प्रस्ताव.

श्री.अरविंद पंगारिया यांचा विचार मान्य करावयाचा झाल्यास विद्यमान सरकारने पहिला प्रस्ताव मान्य करावा व पुढे याच्या दुप्पट-चौपट कर्ज शासनावर करून ठेवावे म्हणजे जुनी पेन्शन योजना लागू करता येणार नाही असे सांगायला विद्यमान शासन मोकळे होईल व भविष्यकाळातील कोणत्याही शासनालासुद्धा जुनी पेन्शन योजना लागू करणे शक्य होणार नाही असाही बंदोबस्त आपोआपच होईल. **भविष्यकाळातील अनेक शासनकर्त्यांचे हात बांधून ठेवण्याचे पुण्य श्री.पंगारिया यांच्या पदरी पडेल. त्या स्थितीत कर्मचारी व शिक्षकांना तीव्र संघर्ष करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय शिल्लक उरणार नाही.**

**१०२. मा.उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस : "आज आपण बँकेत पेन्शनकरिता आपले कॉन्ट्रीब्युशन ठेवले तर बँकेचे दीर्घ मुदतीचे व्याज दर ५ टक्के, ४ टक्के, ३ टक्के इतके खाली आहेत. त्यावर आपल्याला व्याज मिळत नाही. Rate of inflation ७-८ टक्क्यांपासून ११ टक्क्यांपर्यंत आहे. त्यामुळे त्या पैश्याची किंमत वाढण्याऐवजी कमी होते. त्यामुळे ही पद्धत आली आहे. चांगले stocks, mutual funds आहेत. आपण पाहिले तर दिसेल की, साधारणपणे mutual funds चा फरफॉर्मन्स**

*( सहपत्र तीन : परिच्छेद १४ पहा )*



**"We know about these scams because they were huge and had affected the entire market. Market insiders swear that there have been many smaller scames using similar modus operandi from the time of Mundhra until Parekh and even later."**

*(परिच्छेद ११९ पहा)*

**११-१२ टक्क्यांचा राहिला आहे. Mutual funds मध्ये गुंतवायचे आणि त्यातून inflation पेक्षा जास्त returns मिळाला तर पुंजी जमा होते. आपल्याला ठेवलेल्या पुंजीतून returns मिळतात. आपल्या पुंजीची किंमत कमी होत नाही. शेवटी आपण आपली योजना जरी सुरु केली तरी आपल्याला पैसा फंड मॅनेजरद्वारे गुंतवण्याशिवाय पर्याय नाही."**

**१०३.** नवीन पेन्शन योजनेच्या समर्थनार्थ राज्याच्या मा.उपमुख्यमंत्र्यांनी उपरोक्त परिच्छेदात जे मत व्यक्त केलेले आहे त्यात त्यांनी काही बाबी ढोबळमानाने गृहीत धरलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे :-

**(i)** चांगले stocks आणि mutual funds आहेत. त्यांचा परफॉर्मन्स ११-१२ टक्क्यांचा राहिला आहे.

**(ii)** त्यामध्ये पैसे गुंतवले म्हणजे inflation पेक्षा जास्त returns मिळाले तर पुंजी जमा होते.

**(iii)** या ठेवलेल्या पुंजीतून returns मिळतात व पुंजीची किंमत कमी होत नाही.

**(iv)** शेवटी आपण आपली योजना जरी सुरू केली तरी आपल्याला पैसा **फंड मॅनेजरद्वारे** गुंतवण्याशिवाय पर्याय नाही.

मा.उपमुख्यमंत्र्यांनी "फंड मॅनेजरद्वारे पैसा गुंतवण्याशिवाय आपल्याला पर्याय नाही" हे जे उद्गार काढले ते व्यावहारिकदृष्ट्या बरोबर असले तरी त्याचा कायदेशीर अर्थ मध्यस्थ (intermediary) यांच्यामार्फतच हा पैसा गुंतविला जाईल असा आहे. ही गोष्ट कायद्यामध्येच स्पष्टपणे नमूद केलेली आहे. या कायद्याप्रमाणे मध्यस्थाचे मुख्य काम "collection, management, recordkeeping and **distribution of accumulations;"** *(Section 2 (g))* असे आहे.

**१०४.** प्रत्येक मध्यस्थाला प्राधिकरणाकडून मान्यतेचे प्रमाणपत्र मिळवावे लागेल. कायद्यामध्ये जेवढे मध्यस्थ नमूद केलेले आहेत त्यांचे ढोबळमानाने दोन प्रकार सांगता येतील.

**(i)** खाजगी भांडवलदारी कंपन्या अथवा खाजगी भांडवलदार

**(ii)** शासन नियंत्रित एलआयसी किंवा स्टेट बँकेच्या उपकंपन्या सारख्या कंपन्या अथवा उपकंपन्या.

या दोनही प्रकारात मोडणाऱ्या मध्यस्थांचा भांडवली बाजारातील वर्तनाचा आकृतिबंध ठरलेला असतो.

**१०५. खाजगी भांडवलदारांच्या वर्तनाचा आकृतिबंध : खाजगी कंपन्या किंवा खाजगी भांडवलदार हे कर्मचाऱ्यांचे भले करण्यासाठी भांडवली बाजारात उतरलेले नसतात. जास्तीत जास्त नफा (profit) मिळविणे हे त्यांचे एकमेव उद्दिष्ट असते. त्यामुळे ते आपले महत्तम नफा कमाविण्याचे काम सोडून शासनाने झटकलेली निवृत्ती वेतनाची जबाबदारी जुन्या पेन्शन योजनेच्या समतूल्य पार पाडतील असे गृहीत धरणे हे संपूर्णपणे चुकीचे आहे.**

**शासननियंत्रित कंपन्यांच्या वर्तनाचा आकृतिबंध :** राहता राहीला प्रश्न भांडवली बाजारात खेळाडू म्हणून सहभागी झालेल्या/असलेल्या शासन नियंत्रित कंपन्या किंवा उपकंपन्या. त्यांच्या इतिहासाचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, शासनातील कोणत्या पदावरील कोणती अधिकारी व्यक्ती आदेश देईल व त्यामुळे कोणाला लाभ मिळवून देण्यासाठी या कंपन्या कोणाला मदत करतील याच्या बाबतीत कोणतेही भविष्य कोणीही सांगू शकत नाही असा हा ७०-७५ वर्षांचा इतिहास आहे.

**१०६.** भरपूर नफा मिळविण्यासाठी खाजगी कंपन्या व विवक्षित व्यक्ती यांच्यामार्फत या भांडवली बाजारामध्ये शेअर्सचे भाव जोरात वर चढविणे किंवा जोरात खाली पाडणे हा खेळ सतत चालूच असतो. **भांडवली बाजारात सतत चालू असलेल्या या खेळामध्ये जेव्हा एका पक्षाला फार मोठा लाभ होतो तेव्हा दुसऱ्या कोणाला तरी तेवढाच तोटा होत असतो. हा तोटा भोगणारे कोण असतात? साधारणपणे भांडवली बाजारात चालणाऱ्या खेळाविषयी अनभिज्ञ असलेल्या सामान्य गुंतवणूकदाराला याचा फार मोठा फटका बसतो व तेवढाच जोरदार दुसरा फटका हा सामान्य लोकांची गुंतवणूक असलेल्या शासननियंत्रित कंपन्या व उपकंपन्या यातील गुंतवणुकीला बसतो. इतरत्र 'बड्या' लोकांना झालेले नुकसान भरून काढण्यासाठी शासननियंत्रित कंपन्या व उपकंपन्या यांचा हुकूमी एक्का म्हणून वापर केला गेल्याची ऐतिहासिक उदाहरणे उपलब्ध आहेत.** म्युच्युअल फंड किंवा पेन्शन फंडाची गुंतवणूक या कंपन्यांमध्ये फार मोठ्या प्रमाणात असते. अनेकदा हे काम कायद्याच्या मर्यादा सांभाळून केले जाते तर अनेकदा या क्षेत्रातील हातचलाखी करणारे कलाकार (Manipulators) अस्तित्वात असलेल्या कायद्याचा भंग करून या कार्यात यश मिळविण्याचा प्रयत्न करतात. क्वचित प्रसंगी हा प्रकार सबंध देशाला धक्का देणारा असतो. **या संदर्भात उपलब्ध असलेल्या प्रमाणभूत वाङ्मयात अशी अनेक उदाहरणे उपलब्ध आहेत त्यातील काही मोजकी उदाहरणे पुढील परिच्छेदातून नमूद केलेली आहे.**

**१०७. श्री.हरिदास मुंदडा समभाग घोटाळा :** स्वातंत्र्योत्तर भारतातील समभाग बाजारातील पहिले घोटाळेबाज म्हणून श्री.हरिदास मुंदडा यांचे नाव घेतले जाते. आपल्या कंपन्यांचे समभाग वेगवेगळ्या बँकांमध्ये गहाण ठेवून त्यावर फार मोठे कर्ज उभे करावयाचे, उभ्या केलेल्या कर्जातून आपल्याच कंपन्यांचे आणखी समभाग विकत घ्यावयाचे, कर्ज काढतांना आपल्याच कंपन्यांचे नकली समभागपत्र गहाण म्हणून ठेवायचे, मोठ्या प्रमाणात त्या समभागांचे भाव वाढले की, पुन्हा नव्याने घेतलेले समभाग गहाण टाकून कर्ज निधी उभा करावयाचा व पुन्हा खरेदी करावयाची ही त्यांची कार्यपद्धती होती. काही कंपन्यांच्या समभागांचे भाव वाढले की, इतरही कंपन्यांच्या समभागांचे भाव वाढतात व बाजारात कृत्रिम तेजी निर्माण होते. **एका बाजूला १९५७ च्या केंद्रीय अंदाजपत्रकात बसविलेल्या एक्सपेंडिचर टॅक्समुळे व दुसऱ्या बाजूला श्री.मुंदडा यांनी फार मोठ्या प्रमाणात आपल्याच कंपन्यांची नकली समभागपत्रे बँकांकडे गहाण ठेवली अशी अफवा पसरल्यामुळे श्री.मुंदडा यांच्या कंपन्यांचे भाव धडाधड पडायला लागले. त्याचबरोबर बाजारातील तेजीही कोसळली. श्री.हरिदास मुंदडा यांनी केंद्रशासनातील वित्त सचिव श्री.एच.एम.पटेल (ICS) यांची भेट घेतली व भारतीय आयुर्विमा निगमने (LIC) माझ्या कंपन्यांचे समभाग मोठ्या प्रमाणात खरेदी करावे अशी त्यांना विनंती केली. श्री.पटेल यांनी एलआयसीचे चेअरमन श्री.जी.आर.कामत (दुसरे ICS) आणि एलआयसीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री.एल.एस.वैद्यनाथन यांच्याशी चर्चा केली. मार्च-एप्रिल १९५७ मध्ये एलआयसीने तीन व्यवहारांमध्ये मुंदडा यांच्या कंपन्यांचे जवळ जवळ १.५२ कोटी रुपये किमतीचे समभाग खरेदी केले.**

**१०८.** डिसेंबर १९५७ मध्ये खासदार श्री.फिरोज गांधी यांनी हे प्रकरण लोकसभेमध्ये उपस्थित केले. एलआयसीने लोकांच्या पैशांची ही जी लूट केलेली आहे त्याबाबतची चौकशी झाली पाहिजे अशा प्रकारची मागणी त्यांनी केली. मुंबई उच्च न्यायालयाचे मा.न्यायमूर्ती श्री.एम.सी.छागला यांचा चौकशी आयोग नेमण्यात आला. वित्त सचिव श्री.एच.एम.पटेल यांनी छागला आयोगासमोर आपण याबाबतीत अर्थमंत्र्यांशी चर्चा केली होती असे नमूद केले. पुढे असेही लक्षात आले की :

**Historically, the imposition of progressive taxes on income and inheritance has greatly contributed to reducing the concentration of capital.**

*(परिच्छेद १२३ पहा)*

***कंपन्यांवरील करामध्ये ही जी कपात करण्यात आली त्याचा परिणाम शासनाचे उत्पन्न फार मोठ्या प्रमाणात कमी झाले व त्यासोबतच भांडवली बाजारातील खेळाडूंना मिळणारा नफा (Profit) फार मोठ्या प्रमाणात वाढला. दिनांक ८ ऑगस्ट २०२२ रोजी संसदेच्या अंदाज समितीने (Parliamentary Committee on Estimates) जो आपला अहवाल संसदेला सादर केला त्या अहवालामध्ये शासनाला किती नुकसान सहन करावे लागले याचे तपशील नमूद करण्यात आलेले आहे.***

*(परिच्छेद १३० पहा)*

**(i)** वित्त सचिव श्री.एच.एम.पटेल (ICS), एलआयसीचे चेअरमन श्री.जी.आर.कामत (ICS) व एलआयसीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री.एल.एस.वैद्यनाथन हे या घोटाळ्यामध्ये गुंतलेले आहेत.

**(ii)** सचिवांनी केलेल्या कृत्यांची जबाबदारी अर्थमंत्र्यांना स्वीकारावी लागेल.

**(iii)** आयुर्विमा महामंडळाच्या 'गुंतवणूक समिती'समोर न ठेवताच हा व्यवहार पार पाडण्यात आला होता, असेही पुढे लक्षात आले.

या प्रकरणातून पुढे अर्थमंत्री श्री.टी.टी.कृष्णमचारी यांना दिनांक १८ फेब्रुवारी १९५८ रोजी राजीनामा द्यावा लागला. वित्त सचिव श्री.एच.एम.पटेल, एलआयसीचे अध्यक्ष श्री.जी.आर.कामत व एम.डी. श्री.एल.एस.वैद्यनाथन यांना त्यांच्या पदांचे राजीनामे द्यावे लागले. या साऱ्या प्रकरणामध्ये श्री.हरिदास मुंदडा यांना सन १९६१ ते १९६३ असा दोन वर्षे तुरुंगवास भोगावा लागला.

**१०९.** या प्रकरणातील विशेष बाब अशी की, रिझर्व्ह बँकेच्या रामनाथ या नावाच्या डेप्युटी गव्हर्नरने श्री.मुंदडा यांच्या घोटाळेबाज कार्यपद्धतीबद्दल फेब्रुवारी १९५६ मध्ये केंद्रशासनाला पत्र लिहून कळविले होते. इतकेच नव्हे तर पुढे असेही लक्षात आले की, १९५५ मध्ये तत्कालीन वाणिज्य व व्यापार मंत्री श्री.टी.टी.कृष्णमचारी यांनी तत्कालीन वित्त मंत्री श्री.सी.डी.देशमुख यांना पत्र लिहून श्री.मुंदडा यांच्या समभाग बाजारातील घोटाळेबाज कार्यपद्धतीबद्दल कळविले होते.

**११०. श्री.हर्षद मेहता समभाग घोटाळा :** सन १९९२ मध्ये श्री.हर्षद मेहता यांनी घडवून आणलेल्या समभाग घोटाळ्यामुळे सबंध देशभर खळबळ उडाली होती. मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या कंपन्यांचे समभाग खरेदी करावयाचे, खरेदी केलेल्या समभागांवर मोठ्या प्रमाणात बँकांकडून कर्ज काढायचे, काढलेल्या कर्जातून पुन्हा मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या कंपन्यांचे समभाग खरेदी करायचे व आपण खरेदी केलेल्या समभागांचे भाव वाढवायचे व एका विशिष्ट उंचीवर भाग गेले की, धडाधड समभाग विकून टाकायचे व त्या व्यवहारातून मोठ्या प्रमाणात नफा कमवावयाचा, ही श्री.हर्षद मेहता यांची कार्यपद्धती होती. उदाहरण म्हणून द्यायचे झाल्यास १९९० च्या सुरुवातीला तीन महिन्यांमध्ये एसीसी या नामांकित सिमेंट कंपनीच्या समभागाचा २०० रुपये असलेला भाव ९००० रुपये पर्यंत जाऊन पोहचला म्हणजे त्या तीन महिन्यात तो ४५०० टक्के वाढला. तद्नंतर सारे शेअर विकून श्री.हर्षद मेहता यांनी भरमसाठ नफा कमविला. श्री.हर्षद मेहता यांच्या घोडदौडीमुळे साराच समभाग बाजार चांगलाच तेजीत आला.

**१११.** थोड्या काळात मोठ्या प्रमाणात खरेदी करणे व त्यानंतर धडाक्याने व धडाधड विक्री करणे या मार्गाचा (Pump & Dump) या कामी वापर केला गेला होता. डॉ.मनमोहन सिंग यांच्यासारख्या सचोटीच्या व्यक्तिमत्वाला त्यांच्या अर्थमंत्री पदाच्या कार्यकाळात या प्रसंगाला तोंड द्यावे लागले. शेअर मार्केटमध्ये मोठ्या प्रमाणात तेजी येत होती. भाव भरपूर प्रमाणात वाढायला लागले आणि संपूर्ण देशाला अचंबित करणारी अशी ती घटना होती. सबंध देशभरातून याबाबत टिका व्हायला लागली आणि शासनाने याबाबतची भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी व्हायला लागली. तत्कालीन अर्थमंत्री डॉ.मनमोहन सिंग यांनी "**शेअर मार्केटमध्ये किंमती कशा ठरतात किंवा वाढतात याबाबतीत निश्चित असे कोणतेही उत्तर देता येत नाही.** अर्थव्यवस्थेची मजबूती हे एक कारण असले तरी **इतरही अनेक कारणे असतात.** शेअर मार्केटमध्ये जे काही आज दिसत आहे ते माझ्या धोरणामुळे झालेले आहे असा दावा मी कधीही केलेला नाही आणि त्यामुळे **शासन म्हणून आम्ही काय केलेले आहे यासाठी शेअर मार्केटकडून प्रमाणपत्राची आम्हाला गरज नाही.** शेअर मार्केटचे काम निकोपपणे व कायद्याप्रमाणे चालविले जावे हे पाहणे एवढेच आमचे काम आहे. **शेअर मार्केट वर गेले किंवा खाली आले तर त्यामुळे मी माझी झोप खराब करण्याचे कोणतेही कारण नाही**" अशा प्रकारचे निवेदन दिनांक ३० एप्रिल १९९२ रोजी लोकसभेत डॉ.मनमोहन सिंग यांनी केले.

**११२.** डॉ.मनमोहन सिंग यांनी लोकसभेत दिनांक ३० एप्रिल १९९२ रोजी केलेले निवेदन शेअर मार्केट ही काय चिज आहे याचे यथार्थ दर्शन घडविण्यास पुरेसे आहे. त्यामुळे ते मुळातूनच वाचले पाहिजे. मूळ निवेदन हे इंग्रजीत असून त्यांच्या मुलीने त्यातील आवश्यक तो भाग त्यांचे जे चरित्र (Manmohan & Gursharan) लिहिले आहे, त्या चरित्राच्या पृष्ठ ३८४ वर उधृत केलेला आहे. तो शब्दशः पुढीलप्रमाणे :-

**"The state of the art does not permit a definite answer as to what determines the stock market prices.** As far as I am concerned, I have been saying ever since I became the finance minister, that there are real factors - the fundamentals of the economy **- and there are other factors**... and the two need not go together. Therefore, I have never claimed that what I am doing is justified by the behaviour of the stock market. **So I do not need a certificate from the stock market to justify what we are doing...**

... I would also like to say that the government is interested in a healthy functioning of the stock market. **But that does not mean that I should lose my sleep simply because the stock market goes up one day and falls the next day**... Today the sensex of the Bombay stock exchange has gone up from 3694 yesterday, to 3833. I am not going to say that this is an endorsement of our policy. **Markets do fluctuate and, therefore, I think we have to take these things in our stride."** *(Page 384)*

त्यांच्या या निवेदनानंतर काही दिवसात देशाला हादरवून टाकणारा महाघोटाळा उघडकीस आला.

**११३.** या घोटाळ्यामुळे बँकींग व्यवस्थेला ४ हजार कोटी रुपयांचा फटका बसला व शेकडो सामान्य माणसाच्या गुंतवणुकीची धुळधाण झाली. याची मोठी तपशीलवार माहिती डॉ.मनमोहन सिंग यांच्या या चरित्रामध्ये पृष्ठ ३८५ वर नमूद आहे. शब्दशः पुढीलप्रमाणे :-

**"Within weeks of this statement, the stock market scam broke. The scam was run by a group of brokers who illegally**

***कंपन्यांवरील कर (Corporate Tax) ३० टक्क्यांवरून सन २०१९ मध्ये २२ टक्क्यांवर आणण्यात आला. त्यापोटी आर्थिक वर्ष २०२० व २१ मध्ये १.८४ लक्ष कोटी रुपयांचे नुकसान शासनाला सहन करावे लागले. अशाप्रकारचे पुढे होणारे नुकसान भरुन काढण्यासाठी सन २०१७ पासून एका अप्रत्यक्ष कराला जन्मास घालण्यात आले होते. दिनांक १ जुलै २०१७ रोजी वस्तू व सेवा कर (Goods and Services Tax - GST) या नावाचा एक अप्रत्यक्ष कर मोठ्या थाटामाटात समारंभपूर्वक सुरू करण्यात आला.***

*(परिच्छेद १३७ पहा)*

**मागील पाच वर्षात बँकांकडून एकूण कर्ज निर्लेखित (Write-off) केल्याची रक्कम १०.५७ लाख कोटी रुपये इतकी होती. असे रिझर्व्ह बँकेने पुरविलेल्या या अधिकृत माहितीत नमूद आहे.** *(परिच्छेद १४३ (i) पहा)*

**accessed funds from banks - Indian as well as foreign - to finance speculation on an enormous scale. The loss to the banking system alone was estimated at over Rs. 4,000 crore. The operation allegedly involved individuals from banks, financial institutions, public sector organizations, the central bank, the finance ministry as well as other economic ministries - to varying degrees. The stock market panicked and fell, before correcting itself, but not before thousands of small investors were wiped out.** And as the press reported details of the fraud, public faith in the banking system was shaken. The government cracked down on individuals and institutions that were directly implicated and tried to repair the damage that had been done." *(P384-385)*

**११४.** स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) या शासननियंत्रणाखाली असलेल्या बँकेला एप्रिल १९९२ मध्ये असे लक्षात आले की, जवळ जवळ ५०० कोटी रुपयांचा ताळमेळ जुळत नाही. अल्पमुदती कर्ज म्हणून तेवढी रक्कम नियमाप्रमाणे १५ दिवसात परत करण्याच्या अटीवर आपण श्री.हर्षद मेहता यांना दिली असून ती परत आलेली नाही. ती त्यांनी ताबडतोब परत करावी असा स्टेट बँकेने श्री.हर्षद मेहता यांच्याकडे तगादा लावला. तेव्हा श्री.हर्षद मेहता यांनी नॅशनल हाउसिंग बँकेकडून (NHB) कर्ज काढून एसबीआयचे अल्पमुदतीचे कर्ज परत करण्याची तयारी चालविली. यावेळी श्री.फेरवाणी हे NHB चे अध्यक्ष होते. श्री.हर्षद मेहता यांची ही धावपळ सुरू असतांना शोध पत्रकारितेत नाव कमाविलेल्या श्रीमती सूचेता दलाल यांचा एक तपशीलवार अहवाल दिनांक २३ एप्रिल १९९२ च्या टाईम्स ऑफ इंडियामध्ये प्रकाशित झाला आणि समभागांचे भाव धडाधड पडायला सुरुवात झाली. साराच समभाग बाजार कोसळला. श्री.हर्षद मेहता यांच्यावर पुढे चौकशी सुरू झाली. ७६ फौजदारी गुन्हे व जवळ जवळ ६०० दिवाणी दावे त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबियांवर दाखल झाले. स्टेट बँकेच्या कर्जाचा भरणा करण्यासाठी NHB चे अध्यक्ष श्री.फेरवाणी यांनी मेहतांची मदत केली होती. श्री.फेरवाणी यांना राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर १२ दिवसांनी मे १९९२ मध्ये त्यांच्या निवासस्थानी श्री.फेरवाणी हे मृतावस्थेत आढळले. कोणी म्हणतात त्यांनी आत्महत्त्या केली तर काहींच्या मते त्यांना हृदयविकाराच झटका आला. या साऱ्या केसेसची तपासणी चालू असतांनाच श्री.हर्षद मेहता यांचे तुरुंगात निधन झाले.

**११५.** श्री.हर्षद मेहता यांच्या प्रकरणी त्यांना झालेली शिक्षा कायम करतांना मा.न्यायमूर्ती श्री.अरिजीत पसायत यांनी नोंदविलेले निरीक्षण लक्षात घेण्यासारखे आहे. ते पुढीलप्रमाणे :-

**"The entire community is aggrieved if economic offenders who ruin the economy of the state are not brought to book. A murder may be committed in the heat of the moment upon passions being aroused. An economic offence is committed with cool calculation and deliberate design with an eye on personal profit regardless of the consequences to the community."** *(P77)*

**११६. श्री.केतन पारेख समभाग घोटाळा :** सन २००१ मध्ये समभाग बाजार श्री.केतन पारेख या घोटाळेबाज व्यक्तीमुळे फार मोठ्या प्रमाणात कोसळला. श्री.केतन पारेख हे अनेक वर्षे श्री.हर्षद मेहता यांच्या कार्यालयामध्ये कार्यरत होते. त्यांनी या कामामध्ये अंमलात आणलेल्या क्लृप्त्या ह्या हर्षद मेहता यांच्या कौशल्याची सुधारित आवृत्ती होती. पहिली गोष्ट म्हणजे त्यांनी बाजारामध्ये ज्या कंपन्याचे समभाग कमी प्रमाणात उपलब्ध आहेत अशा दहा कंपन्यांच्या समभागांची निवड केली. हे दहा समभाग 'केतनचे दहा समभाग' (K10) म्हणून ओळखले जाऊ लागले. दुसरी गोष्ट अशी की, काही दलालांची साखळी त्याने बाजारात उभी केली आणि हे दलाल त्या दहा समभागांची परस्पर खरेदी-विक्री करीत असत. त्या दहा समभागांचे भाव कमी होणार नाही याची काळजी श्री.केतन पारेख घेत असे आणि त्यामुळे ह्या दलालांची साखळी मोठीच मजबूत आणि समृद्ध होत गेली. समभाग खरेदी करावयाचे, बँकांकडे ते समभाग गहाण ठेवून त्यावर कर्ज उभे करावयाचे, उभे केलेल्या कर्जातून पुन्हा नवीन समभाग खरेदी करावयाचे या हर्षद मेहता यांच्या पद्धतीमध्ये बऱ्याच सुधारणा करून श्री.केतन पारेख यांनी ती पद्धति अंमलात आणली. यूटीआय सारख्या सर्वसामान्य लोकांच्या गुंतवणुकीची जबाबदारी असलेल्या शासननियंत्रित संस्थेला त्यांनी या कामामध्ये सहभागी करून घेतले. यूटीआयने त्या दहा कंपन्यांच्या समभागांची फार मोठ्या प्रमाणात खरेदी केली त्यामुळे दहा कंपन्यांच्या समभागांचे भाव वाढू लागले. या दहाही कंपन्यांच्या प्रवर्तकांना पारेख यांनी या कार्यक्रमात सहभागी करून घेतले. आपल्या कंपन्यांच्या समभागांचे भाव अनायसे चांगलेच वाढत आहेत म्हणून प्रवर्तक मंडळीसुद्धा या कामात सुरक्षित अंतर ठेवून सहभागी झाली. काही कंपन्याचे समभाग ज्यावेळेला वाढतात त्यावेळेला एकूणच समभाग बाजारसुद्धा तेजीत येतो. काही कारणाने समभागांचा भाव कोसळू शकतो या गोष्टीचा अंदाज श्री.केतन पारेख यांना आला नाही व तेथेच त्यांचा सर्वनाश झाला.

**११७.** अमेरिकेमध्ये तंत्रज्ञान आधारित समभागांनी हवा भरून भरून निर्माण केलेला फुगा सन २००० मध्ये फुटला. (dotcom bubble in USA) अमेरिकेमध्ये इंटरनेटच्या उपलब्धतेमुळे बाजारातले व्यवहार मोठ्या प्रमाणात वाढले. तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू झाल्यामुळे समभागांचे बाजारातील व्यवहार अतिशय सुलभ झाले. त्यात अमेरिकेमध्ये व्याजाचे दर खूपच कमी असल्यामुळे भांडवल सुद्धा सहज आणि कोणालाही उपलब्ध होऊ लागले आणि त्यामुळे अशा कंपन्याच्या समभागाचे भाव फार मोठ्या प्रमाणात वाढले. विशेषतः सन १९९४ ते २००० या दरम्यान बाजार फार मोठ्या तेजीत आला. ह्या कंपन्या जाहिरातींवर आणि कंपन्यांच्या प्रसिद्धीवर फार मोठा खर्च करीत होत्या. त्यांना फारसा काही नफा होत नाही हे गुंतवणूकदारांच्या लक्षात आल्यानंतर आणि दुसऱ्या बाजूला फेब्रुवारी २००० पासून व्याजाचे दर वाढायला लागल्यामुळे हा फुगा फुटला आणि त्याचे परिणाम अमेरिकेबरोबर इतरही देशात झाले. तसे ते भारतातही झाले.

**११८.** केतन पारेख यांच्या दहा कंपन्यांमध्ये काही तंत्रज्ञान आधारित कंपन्या सुद्धा होत्या. अमेरिकेमधील घडामोडीनंतर भारतात सुद्धा समभाग बाजारात मोठी पडझड सुरू झाली. त्यात केतन पारेख यांच्या कंपन्यांचेसुद्धा हाल सुरू झाले. जे समभाग गहाण ठेवून कंपनीकडून कर्ज मिळविले होते त्या समभागांची किंमत घसरल्यामुळे आणखी जादा समभाग तारण म्हणून ठेवण्याची मागणी बँकांनी केली. ती मागणी पूर्ण न झाल्यामुळे कंपन्यांनी तारण ठेवलेले समभाग बँकांनी विकायला सुरुवात केली. त्यामुळे भाव आणखी मोठ्या प्रमाणात घसरायला लागले. ही घसरण लक्षात आल्यावर अनेक म्युच्युअल फंड कंपन्यांनी सुद्धा तोटा कमी करण्याचा हेतू डोळ्यासमोर ठेवून त्यांच्या जवळचे समभाग विकायला काढले. या संकटातून बाहेर पडण्याचा उपाय म्हणून श्री.केतन पारेख यांनी आणखी कर्ज मिळविण्यासाठी बँकांकडे प्रयत्न सुरू केला. राष्ट्रीयकृत बँका दाद देत नाहीत असे लक्षात आल्यानंतर श्री.केतन पारेख यांनी सहकारी बँकांकडे आपला मोर्चा वळविला. विशेषतः माधवपुरा मर्कंटाईल को-ऑपरेटिव्ह बँकेकडून त्यांनी फार मोठ्या प्रमाणात कर्ज घेतले. ही बातमी फुटल्यानंतर फार मोठ्या प्रमाणात दहा समभागांची विक्री बाजारात सुरू झाली. एकूणच बाजार कोसळू लागला. यामुळे धसका घेतलेल्या श्री.केतन पारेख यांनी आपले सर्व समभाग एकाच दिवशी विकून टाकले. **त्याचा परिणाम असा झाला की, त्यांच्या समभागांचे भाव आणखी पडायला सुरुवात झाली. त्यासोबत बाजारसुद्धा. माधवपुरा मर्कंटाईल सहकारी बँकेला ८८८ कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागले. बँक बुडीत निघाली. सगळ्या गुंतवणूकदाराचे पैसे बुडाले. श्री.केतन पारेख यांच्यावर बरेच खटले दाखल झाले आणि त्यांना दोन वर्षांची सक्त मजुरीची**

**या साऱ्या माहितीचा सारांश असा की, १०० कोटी रुपयांच्यावर थकबाकी असणारे स्टेट बँकेसह सार्वजनिक बँकांचे ३५९ कर्ज बुडवे असून त्यांची एकत्रित थकबाकी दीड लाख कोटी रुपये आहे.** *(परिच्छेद १४३ (viii) पहा)*

**शिक्षा झाली.**

**११९.** तीन मोठे घोटाळे वर नमूद केलेले आहेत. अशा प्रकारचे अनेक लहान-मोठे घोटाळे बाजारामध्ये सतत चालू असतात. स्मारक स्वेन यांनी हा विचार पुढील शब्दात मांडलेला आहे. :-

**"We know about these scams because they were huge and had affected the entire market. Market insiders swear that there have been many smaller schames using similar modus operandi from the time of Mundhra until Parekh and even later."** ***(P87)***

भांडवली बाजारातील समभाग घोटाळ्यांची माहिती देतांना या संदर्भात यापेक्षा जास्त माहिती देणे आवश्यक आहे असे मला वाटत नाही. बँकांचे कोट्यावधी रुपये बुडवून परदेशात स्थायिक होणारे उद्योगपती, रोज समभागांच्या उलाढालित गुंतलेले दलाल यांनी सामान्य गुंतवणूकदारांचे किती नुकसान केलेले आहे याची माहिती देणारी अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. उपरोक्त समभाग घोटाळ्यांची माहिती देत असतांना मी "The Great Indian Fraud" या श्री.स्मारक स्वेन यांच्या पुस्तकाचा संदर्भ म्हणून उपयोग केलेला आहे. श्री.स्मारक स्वेन हे आयआयटी खरगपूरचे पदवीधर असून सन २००६ मध्ये Indian Revenue Service - IRS मध्ये त्यांची निवड झाली. Taxation आणि Business Law मध्ये त्यांनी पदव्युत्तर पदवी मिळविलेली आहे. नमूद केलेले पृष्ठ क्रमांक स्मारक स्वेन यांच्या पुस्तकातून उधृत केलेली माहिती दर्शविणारे पृष्ठ क्रमांक आहेत.

**१२०.** शेवटी सारांश म्हणून असे सांगता येईल की, स्वातंत्र्यपूर्व काळापासून वर्षानुवर्षे चालत आलेली जुनी पेन्शन योजना एका बाजूला व भांडवली बाजारातील चढउतारावर आधारित भांडवली बाजारातील खेळाडूंच्या सोईची नवीन पेन्शन योजना दुसऱ्या बाजूला, या दोन पैकी कोणाची निवड करावी याबाबतीत **त्या त्या क्षेत्रातील कर्त्या मंडळींनी घेतलेले निर्णय स्पष्टपणे जुन्या पेन्शन योजनेच्या बाजूने आहेत. खुद्द केंद्रशासनाने नवीन पेन्शन योजना अंमलात आणतांना संरक्षण दलातील कर्मचारी व अधिकारी यांना ती योजना लागू केली नाही, त्यांना जुनीच पेन्शन योजना लागू राहील असा निर्णय घेतला.** या निर्णयाच्या गुणवत्तेबद्दल कोणालाही कोणतीही शंका असण्याचे कारण नाही. **घटनेने निर्माण केलेल्या विविध पदधारकांना म्हणजे राष्ट्रपती, उपराष्ट्रपतीपासून तर संसद व विधानमंडळ सदस्यांपर्यंत सर्वच पदधारकांना लागू असलेली जुनी व्यवस्थाच लागू राहील ही स्थिती कायम आहे. कर्त्या मंडळींनी त्यांना नवीन पेन्शन योजना लागू करण्यात येईल असा निर्णय घेतलेला नाही. मग प्रश्न असा उपस्थित होतो की, या दोन पैकी काय उत्तम आहे याचा निर्णय अशा रीतीने झालेला असतांना इतर लक्षावधी कर्मचाऱ्यांना नवीन पेन्शन योजनेत ढकलण्याचे कारण काय?** न्यायिक अधिकाऱ्यांचे वेतनमान मा.सर्वोच्च न्यायालयाच्या संमतीने निश्चित झालेले असल्यामुळे त्यांना **नवीन पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय न्यायव्यवस्थेने रद्दबातल ठरविला व न्यायिक अधिकाऱ्यांना जुनीच पेन्शन योजना लागू राहील असा निर्णय दिला. याचा अर्थ या दोन पैकी कोणती व्यवस्था कर्मचाऱ्यांच्या हिताची आहे याबाबतचा न्यायव्यवस्थेने दिलेला निर्णयसुद्धा अधोरेखित झालेला आहे. तो पूर्णपणे जुन्या पेन्शन योजनेच्या बाजूचा आहे.**

**१२१.** यातून आणखी एक नवीन प्रश्न निर्माण होतो, तो असा की भांडवली बाजारातील चढउतारावर आधारित नवीन पेन्शन योजना जर एवढ्या फायद्याची आहे तर मग विकास कामांसाठी कर्ज काढत बसण्यापेक्षा शासनातर्फे फार मोठा निधी भांडवली बाजारात गुंतवून तेथून मिळणाऱ्या परताव्यावर विकास कामांची बांधणी करण्याचे धैर्य शासन का दाखवित नाही? भांडवली बाजारातील परताव्याची एवढी जर शासनाला खात्री आहे तर जुनी पेन्शन योजना जशी आहे तशी चालू ठेवावी व स्वतंत्रपणे शासनहिस्याची रक्कम शासनाने भांडवली बाजारात गुंतवावी व त्यातून फार मोठा परतावा मिळत असल्यामुळे जास्तीची रक्कम स्वतःकडे ठेवून घ्यावी, यामध्ये शासनाला काय अडचण आहे हे कोणालाही समजत नाही. भांडवली बाजारातील चढउताराच्या नखऱ्यात गुंतवणुकीवरील परताव्याचे काही खरे नाही याची शासनाला पक्की जाणीव आहे. असे असूनही भांडवली बाजारातील खेळाडूंचे घर भरण्यासाठी नवीन पेन्शन योजनेचा आग्रह चालूच ठेवला जात आहे, असे स्पष्टपणे दिसून येते.

**१२२. मा.उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस : "सन्माननीय सदस्यांनी मघाशी Thomas Piketty च्या संदर्भात उल्लेख केला होता. परंतु त्यांची मूळ theory अशी आहे की, taxes वाढवा आणि equitable distribution करावे. ही बाब आपल्याकडे शक्य नाही. आपण एक रुपया tax वाढविल्यास आपली कशी परिस्थिती होईल?"**

**१२३.** मा.उपमुख्यमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात थॉमस पिकेटीच्या सिद्धांताचा उल्लेख केला. उत्तर देतांना "taxes वाढवा आणि equitable distribution करा हा पिकेटीचा सिद्धांत असून ही बाब आपल्याकडे शक्य नाही. आपण एक रुपया tax वाढविल्यास आपली कशी परिस्थिती होईल?" असे प्रतिपादन मा.उपमुख्यमंत्र्यांनी केल्याचे दिसून येते. खरे म्हणजे कोणीतरी सदस्यांनी उल्लेख केल्यामुळे थॉमस पिकेटीची वैचारिक मांडणी लक्षात घेण्याची एक संधी शासनाला प्राप्त झालेली होती. परंतु तसे न करता एका वाक्यात मा.उपमुख्यमंत्र्यांनी थॉमस पिकेटीचा निकाल लावला. सर्व लोकांवर टॅक्स बसवा असे थॉमस पिकेटीचे प्रतिपादन नाही. संपत्तीचे केंद्रीकरण होण्याच्या विरोधात प्रतिपादन करतांना आयकर (income tax) तसेच वारसा कर (inheritance tax) या दोन करांचा वापर हा विषमता कमी करण्यासाठी क्रमवर्धी पद्धतीने (progressive tax) संपत्तीच्या सर्वात वरच्या थरात असलेल्या काही टक्के धनवंतावर बसविल्या जाऊ शकतो असे त्यांचे मूळ प्रतिपादन आहे. Paris School of Economics मध्ये अनेक वर्षे प्रोफेसर म्हणून काम केलेल्या थॉमस पिकेटी यांनी The Economics of Inequality या त्यांच्या ग्रंथामध्ये सर्व स्तरावरच्या आर्थिक विषमता कमी करण्याच्या विचारांचे प्रतिपादन केलेले आहे. या पुस्तकाच्या पृष्ठ ६४ वर त्यांनी पुढीलप्रमाणे विचार मांडलेले आहेत.:-

**"Historically, the imposition of progressive taxes on income and inheritance has greatly contributed to reducing the concentration of capital."** *(Page 64)*

**१२४.** समाजातील विषमता कमी करण्यात स्वारस्य असलेल्या अनेक अर्थतज्ज्ञांनी पिकेटीच्या पूर्वी आणि पिकेटीच्या नंतर अशाप्रकारचे विचार मांडल्याचे आपल्याला दिसून येते. डॉ.प्रभात पटनाईक यांचे प्रतिपादन लक्षात घेण्यासारखे आहे. 'We the People' या Penguin Random House ने प्रकाशित केलेल्या ग्रंथात पहिल्याच क्रमांकावर दिल्ली विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागात अनेक वर्षे Professor Emeritus म्हणून कार्य केलेले डॉ.प्रभात पटनाईक (सहलेखक जयती घोष) यांचा For a set of Universal Economic Rights या मथळ्याचा प्रबंध प्रकाशित झाला. पेन्शनसह इतर आर्थिक हक्काची कायदेशीर हक्क म्हणून पूर्तता करण्यासाठी **शासनाच्या स्वामित्वाधिकारित धनामध्ये वृद्धी कशी करता येईल?** याबाबतचा त्यांच्या प्रबंधातील उल्लेख नोंद घेण्यासारखा आहे. तो पुढीलप्रमाणेः-

"According to the Global Wealth Migration Review 2019, the total net worth of private individuals in India in 2018 amounted to Rs 570 lakh crore. Of this amount, the top 1 per cent owns 58 per cent or around Rs 330 lakh crore." *(P11)*

"A 2 per cent tax on the wealth of just this stratum will fetch Rs 6.6 lakh crore per annum..... Wealth taxation has to be supplemented by inheritance taxation...... If we assume that every year 5 per cent of the total wealth of this top stratum gets transferred to their children, or other legatees, as inheritance, then even a modest taxation of one- third on such inheritance would fetch Rs 5.5 lakh crore. **Just these two taxes, in short, and that too levied only on the top 1 per cent, would be quite enough to fetch more than Rs 12 lakh crore."** *(P11,12)*

**१२५.** भारतात सन २०१८ मध्ये खाजगी व्यक्तीकडे असलेली एकूण संपत्ती ५७० लाख कोटी रुपये असून त्यापैकी ३३० लाख कोटी रुपयाची

**Just these two taxes, in short, and that too levied only on the top 1 per cent, would be quite enough to fetch more than Rs 12 lakh crore.**

*(परिच्छेद १२४ पहा)*

***त्या त्या क्षेत्रातील कर्त्या मंडळींनी घेतलेले निर्णय स्पष्टपणे जुन्या पेन्शन योजनेच्या बाजूने आहेत. खुद्द केंद्रशासनाने नवीन पेन्शन योजना अंमलात आणतांना संरक्षण दलातील कर्मचारी व अधिकारी यांना ती योजना लागू केली नाही, त्यांना जुनीच पेन्शन योजना लागू राहील असा निर्णय घेतला.***

*(परिच्छेद १२० पहा)*

संपत्ती, म्हणजे ५८ टक्के संपत्ती, ही एक टक्का धनवंताकडे आहे. असे हे डॉ.प्रभात पटनाईक यांचे प्रतिपादन आहे. कर बसविण्याच्या संदर्भात महत्तम संपत्ती असलेल्या १ टक्के लोकांच्या कडून या दोन करांच्या माध्यमातून टॅक्स बसविल्यास फार मोठा निधी उपलब्ध होऊ शकतो. ज्या केंद्रशासनाने नवीन पेन्शन योजना लागू केलेली आहे त्या केंद्रशासनाने याबाबतीत नेमके उलट धोरण स्वीकारलेले आहे असे दिसून येते.

**१२६.** डॉ.प्रभात पटनाईक यांनी नमूद केलेली आकडेवारी ही सन २०१८ मधील आहे. यासंदर्भात आता सन २०२२ मधील आकडेवारी उपलब्ध झालेली असून अतिश्रीमंतांना करामध्ये सवलत देणे व सामान्य लोकांवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर मोठ्या प्रमाणात बसविणे हा प्रकार या अहवालातून पुढे आलेला आहे. “Survival of the Richest : The India story” : “Oxfam India report” या मथळ्याने हा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला असून दिनांक १६ जानेवारी २०२३ रोजीच्या इंडियन एक्सप्रेस मध्ये तो तपशीलवारपणे प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. *(यापुढे उल्लेख ‘**अहवाल**’ असा)* या अहवालातील काही प्रमुख निष्कर्ष व आकडेवारी ही पुढीलप्रमाणे आहे.:-

**(i)** देशाच्या एकूण संपत्तीपैकी ६० टक्के संपत्ती ही केवळ ५ टक्के लोकांकडे आहे. तळातील ५० टक्के लोकांकडे या संपत्तीपैकी फक्त ३ टक्के संपत्ती आहे.

**(ii)** सन २०१२ ते २०२१ या काळात निर्माण झालेल्या संपत्तीपैकी ४० टक्के संपत्ती ही १ टक्के लोकांकडे गेली व फक्त ३ टक्के संपत्ती ही ५० टक्के लोकांच्या वाट्याला आली. त्याचा परिणाम असा झाला की, सन २०२० मध्ये अतिश्रीमंतांची (billionaires) संख्या १०२ वरून २०२२ मध्ये १६६ वर गेली.

**(iii)** १०० अतिश्रीमंत व्यक्तीकडे एकत्रितरीत्या ५४.१२ लक्ष कोटी रुपये एवढी संपत्ती असून ही रक्कम केंद्रशासनाच्या १८ महिन्यांच्या अंदाजपत्रकीय खर्चाएवढी आहे.

**(iv)** अतिश्रीमंत १० व्यक्तींकडे २७.५२ लक्ष कोटी रुपये संपत्ती असून ती एका वर्षात ३२.८ टक्क्यांनी वाढलेली दिसून येते.

**(v)** कोविडची साथ येण्यापूर्वी कंपन्यांवर बसविण्यात आलेला कर हा ३० टक्के होता तो नंतर २२ टक्के करण्यात आला.

**१२७.** कंपन्यांना फार मोठ्या प्रमाणात सूट दिल्यामुळे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी अनेक वस्तु व सेवाच्या GST दरात वाढ करण्यात आली व काही बाबतीत सूट रद्द करण्याचे निर्णय घेण्यात आले ही गोष्ट या अहवालात पुढील शब्दात नमूद आहे. :-

**“To increase revenue, the Union Government adopted a policy of hiking the Goods and Services Tax (GST) and excise duties on diesel and petrol while simultaneously cutting down on exemptions.** The indirect nature of both the GST and fuel taxes make them regressive, which invariably burdens the most marginalized,”

**१२८.** अतिश्रीमंतांवर कर बसविण्यात कच खाणे व सामान्यांवर कराचा बोजा वाढविण्याच्या या प्रकारामुळे असमानता वाढत गेली ही गोष्ट या अहवालामध्ये पुढील शब्दात नमूद आहे. :-

**“The failure to tax rich people and corporations fairly exacerbates inequality as governments then resort to taxing the rest of society more.** Heavy reliance on consumption taxes like VAT increases inequality and is regressive in nature because poor people pay a larger share of their incomes”.

### *कंपन्यांवरील करामधे मोठ्या प्रमाणात कपात*

**१२९.** केंद्रसरकारने २०१९ मध्ये कंपन्यांवर बसवावयाच्या करामध्ये फार मोठ्या प्रमाणात कपात केली. कर कायदा १९६१ अन्वये कंपन्यांवरील करामध्ये ३० टक्क्यांवरून कपात करून तो २२ टक्के करण्यात आला. किमान पर्यायी कर (Minimum Alternate Tax) १५ टक्के करण्यात आला. भारतीय किंवा परकीय कंपन्यांनी भारतामध्ये केलेल्या उद्योगांतून मिळविलेल्या नफ्यावर बसविला जाणारा कर म्हणजे कंपनी कर (Corporate Tax) असे म्हणता येईल. The Taxation Laws (Amendment) Bill, 2019 या विधेयकाने कंपन्यांवरील कर ३० टक्क्यांवरून २२ टक्के करण्याची तरतूद करण्यात आली. पुढे या विधेयकाचे विधिनियमामध्ये रुपांतर झाले. १ ऑक्टोबर २०१९ नंतर व ३१ मार्च २०२३ पूर्वी स्थापन झालेल्या नवीन उत्पादक कंपन्यांवरील कर १५ टक्के करण्यात आला.

**१३०. कंपन्यांवरील करामधे ही जी कपात करण्यात आली त्याचा परिणाम शासनाचे उत्पन्न फार मोठ्या प्रमाणात कमी झाले व त्यासोबतच भांडवली बाजारातील खेळाडूंना मिळणारा नफा (Profit) फार मोठ्या प्रमाणात वाढला. दिनांक ८ ऑगस्ट २०२२ रोजी संसदेच्या अंदाज समितीने (Parliamentary Committee on Estimates) जो आपला अहवाल संसदेला सादर केला त्या अहवालामध्ये शासनाला किती नुकसान सहन करावे लागले याचे तपशील नमूद करण्यात आलेले आहेत.**

“The corporate tax cut of 2019 had resulted in a negative “revenue impact” of Rs. 1.84 lakh crore in FY20 and FY21, alone – Rs. 87,835.75 crore in FY20 and Rs. 96,399.74 crore in FY21.”

**कंपनी करावरील जे उत्पन्न आर्थिक वर्ष २०२० मध्ये ५,५६,८७६ कोटी रूपये होते ते २०२१ मध्ये ४,५७,७१९ कोटी रुपयांवर आले.** लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी की, कंपन्यांवरील करामध्ये सप्टेंबर २०१९ मध्ये जी फार मोठी कपात करण्यात आली तशा प्रकारची कोणतीही थोडीसुद्धा कपात व्यक्तीच्या किंवा वेतनधारकांवरील आयकरामध्ये करण्यात आली नाही.

**१३१.** “Fortune India: Business News, Strategy, Finance and Corporate Insight” यामध्ये श्री.प्रसन्न मोहंती यांचा “Did corporate tax cut of 2019 lead to tax, GDP boom?” या मथळ्याचा एक निबंध प्रकाशित झाला असून त्यामध्ये कंपन्यांच्या नफ्यामध्ये यामुळे कशी भरमसाठ वाढ झालेली आहे याचे तपशील नमूद करण्यात आलेले आहेत. या निबंधातील पुढील उत्तरे विचार करायला लावणारे आहेत.

“It is by now well known that corporates made historic high net profits (after paying tax) in FY21 and FY22 – amidst the pandemic-induced economic ruins all around. CMIE’s Mahesh

***घटनेने निर्माण केलेल्या विविध पदधारकांना म्हणजे राष्ट्रपती, उपराष्ट्रपतीपासून तर संसद व विधानमंडळ सदस्यांपर्यंत सर्वच पदधारकांना लागू असलेली जुनी व्यवस्थाच लागू राहील ही स्थिती कायम आहे. कर्त्या मंडळींनी त्यांना नवीन पेन्शन योजना लागू करण्यात येईल असा निर्णय घेतलेला नाही. मग प्रश्न असा उपस्थित होतो की, या दोन पैकी काय उत्तम आहे याचा निर्णय अशा रीतीने झालेला असतांना इतर लक्षावधी कर्मचाऱ्यांना नवीन पेन्शन योजनेत ढकलण्याचे कारण काय?***

*(परिच्छेद १२० पहा)*

***नवीन पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय न्यायव्यवस्थेने रद्दबातल ठरविला व न्यायिक अधिकाऱ्यांना जुनीच पेन्शन योजना लागू राहील असा निर्णय दिला. याचा अर्थ या दोन पैकी कोणती व्यवस्था कर्मचाऱ्यांच्या हिताची आहे याबाबतचा न्यायव्यवस्थेने दिलेला निर्णयसुद्धा अधोरेखित झालेला आहे. तो पूर्णपणे जुन्या पेन्शन योजनेच्या बाजूचा आहे.***

*(परिच्छेद १२० पहा)*

Vyas says that 30,000 companies (5,000 listed and 25,000 unlisted) made **"a massive 138% increase in net profits" in FY21 over FY20. In FY22, listed companies alone (excluding unlisted ones) made "extraordinary profits" which grew by 66.2% over FY21.** When net profits of listed companies started soaring in Q2 of FY21 (July-September 2020), he had described it as "their highest ever profits in the midst of a severe lockdown" – which kept rising in subsequent quarters."

"An SBI research paper of July 2021 explains it for FY21. It quantified the impact of various policy measures that helped. It said (i) corporate tax cut "contributed 19% to the top line" (ii) "extended period of low-interest rate" contributed "on an average 5% to the overall top line" (iii) expenditure reduction (through various ways) contributed "as much as 31%" on top line and (iv) "employee costs have been cut" on an average by 3% in FY21."

"It is, therefore, clear that the 2019 corporate tax cut contributed to the soaring corporate profits but didn't raise corporate tax collections. **Budget documents show, in FY21 corporate tax collections fell – from Rs. 5,56,876 crore in FY20 (actual) to Rs. 4,57,719 crore in FY21 (actual). A dubious history was also made when corporate tax collection in FY21 (Rs. 4,57,719) fell below income tax (Rs. 4,87,144 crore) paid by lesser mortals."**

**१३२. गोरगरिबांना दिलेल्या सवलतींचा रेवडी वाटप अशी संभावना करणाऱ्या व मध्यमवर्गीयांवर मोठ्या प्रमाणात करवाढ करणाऱ्या शासनाने कंपन्यांना करामध्ये फार मोठ्या सवलती दिल्या व आपला कल भांडवली बाजारातील खेळाडूंच्याच बाजूने असल्याचे दाखवून दिले.** यावर सर्वच बाजूने टिका झाली आहे व होत आहे.

### *करोडपतींच्या संख्येत वाढ होणे*

**१३३.** दिनांक २० ऑगस्ट २०२३ रोजीच्या "The Economic Times"च्या अंकामध्ये टाईम्स ग्रुपचे शंतनू नंदन शर्मा यांचा "Rise of Crorepatis" या मथळ्याचा एक लेख प्रसिद्ध झालेला आहे. या लेखाचा पहिला परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे :-

"Despite the devastating fallout of the pandemic on the economy, wealthy Indians have become wealthier, shows tax data. **There has been a phenomenal growth in the number of individuals entering the Rs .1 croreplus income-tax bracket** even during the bleak phase of the economy. This defies conventional wisdom and bolsters the narrative of a K-shaped recovery that says the rich were getting richer." या लेखाचा शेवटचा परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे :- "My bet is on the share market," says former tax sleuth Prasad. "If the market continues to rise, the number of crorepati taxpayers is bound to rise too."

**१३४.** या लेखामध्ये १ कोटी रुपयांपेक्षा जास्त उत्पन्नावर आयकर भरणाऱ्यांच्या संख्येमध्ये झालेल्या तुलनात्मक वाढीची आकडेवारी नमूद केलेली आहे. सन २०१९-२० या आर्थिक वर्षात अशा उत्पन्नावर आयकर भरणाऱ्यांची संख्या १,११,९३९ एवढी होती. तर हीच संख्या सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात १,६९,८९० इतकी झाली. याचा अर्थ असा की, १ कोटी रुपयांपेक्षा जास्त उत्पन्नावर आयकर भरणाऱ्यांच्या संख्येमध्ये जवळ जवळ ५७९५१ इतक्या व्यक्तींची भर पडली. ही वाढ ५१ टक्के दिसून येते.

**१३५.** CBDT चे माजी चेअरमन आर.प्रसाद यांचे एक प्रतिपादन या लेखामध्ये उधृत करण्यात आलेले असून "कोरोनाच्या काळामध्ये सुद्धा अनेक कंपन्या नफा कमवित होत्या व असा नफा ज्या वेळेला त्या कमवितात त्यावेळेला या कंपन्यातील वरिष्ठ नोकरदार वर्गाला त्यातून खुप मोठा लाभ दिल्या जातो. मधल्या स्तरावरच्या व कनिष्ठ स्तरावरच्या नोकरदार वर्गाला वार्षिक वेतनवाढी तेवढ्या मिळतात." असेही त्यांनी नमूद केलेले आहे. त्यांचे लेखातील मूळ शब्द जसेच्या तसे :

"I am not surprised by this phenomenal growth," says R. Prasad, former CBDT chairman. "When so many companies turned highly profitable during the pandemic, their CEOs and those in senior management positions must have benefitted the most. The middle management and those at the bottom of the pyramid usually receive only routine increments."

**१३६.** सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये १ कोटी रुपयांवरील उत्पन्नावर आयकर भरणाऱ्यांच्या २,६९,१८४ या संख्येमध्ये ६६,३९७ कंपन्या, २५,२६२ फर्म्स आणि ३,०५९ ट्रस्ट समाविष्ट आहेत असे या लेखामध्ये नमूद केलेले आहे. सन २०१९-२० या आर्थिक वर्षात १ कोटीच्या वरील उत्पन्नावर आयकर भरणाऱ्या कंपन्यांची संख्या ५३,६७९ एवढी होती. याचा अर्थ असा की, एवढा कर भरणाऱ्या कंपन्यांच्या संख्येमध्ये २३ टक्क्यांनी वाढ झाली आणि याच काळामध्ये १ कोटीच्या वरील उत्पन्नावर आयकर भरणाऱ्यांच्या संख्येमध्ये ५१ टक्क्यांनी वाढ झाली. आपल्या जेष्ठ नोकरदारांचे वेतन जाहीर करण्याचे बंधन हे सूचीबद्ध कंपन्यांवर असते. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये आपल्या नोकरदारांचे वेतन जाहीर करणाऱ्या अशा कंपन्यांची संख्या ७५४ होती व त्यामध्ये ११६१ वरिष्ठ नोकरदारांचे वेतन १ कोटी रुपयांपेक्षा जास्त होते.

**१३७. कंपन्यांवरील कर (Corporate Tax) ३० टक्क्यांवरून सन २०१९ मध्ये २२ टक्क्यांवर आणण्यात आला. त्यापोटी आर्थिक वर्ष २०२० व २१ मध्ये १.८४ लक्ष कोटी रुपयांचे नुकसान शासनाला सहन करावे लागले. अशाप्रकारचे पुढे होणारे नुकसान भरुन काढण्यासाठी सन २०१७ पासून एका अप्रत्यक्ष कराला जन्मास घालण्यात आले होते. दिनांक १ जुलै २०१७ रोजी वस्तू व सेवा कर (Goods and Services Tax - GST) या नावाचा एक अप्रत्यक्ष कर मोठ्या थाटामाटात समारंभपूर्वक सुरू करण्यात आला.** आयकरदात्या बरोबरच आयकर या प्रत्यक्ष कराच्या कक्षेत येण्याइतके उत्पन्न नसलेल्या लक्षावधी मध्यमवर्गीयांना, गोरगरिबांना व सामान्य जनांना GST या कराच्या कक्षेत आणण्यात आले. लहान मुलांना द्यावयाचे दुध रस्त्यावरून खुले विकणाऱ्या विक्रेत्याकडून घेणाऱ्या सामान्य व्यक्तीला एखादे वेळी डबाबंद दूध लहान मुलाला द्यावेसे वाटले तर त्यांना त्यावर GST भरावा लागेल. या थाटाच्या कितीतरी जीवनोपयोगी वस्तु या कराने कवेत घेतल्या. दिलेले उपरोक्त हे एक लहानसे उदाहरण झाले. अशी उदाहरणे विपूल प्रमाणात संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**१३८.** केंद्र शासनाच्या वित्त विभागाने स्थापित केलेल्या GST च्या

***गोरगरिबांना दिलेल्या सवलतींचा रेवडी वाटप अशी संभावना करणाऱ्या व मध्यमवर्गीयांवर मोठ्या प्रमाणात करवाढ करणाऱ्या शासनाने कंपन्यांना करामध्ये फार मोठ्या सवलती दिल्या व आपला कल भांडवली बाजारातील खेळाडूंच्याच बाजूने असल्याचे दाखवून दिले.***

*(परिच्छेद १३२ पहा)*

***'भांडवल' आणि 'प्रभाव' हे नेहमी हातात हात घालून चालतात. निवडणूक प्रक्रियेमध्ये प्रत्येकाला समान संधी मिळाली पाहिजे. मुक्त निवडणूक हा आपल्या घटनेचा पाया आहे व निवडणूक रोखे हे त्याला घातक आहेत. एखाद्या उमेदवाराच्या प्रचारासाठी जमाव गोळा करणे, एखाद्या सदस्याला त्याच्या पक्षातून फोडणे, एखाद्या उमेदवाराला तू निवडणूक लढवू नकोस यासाठी बाध्य करणे, एखाद्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी दुसऱ्या उमेदवाराला मतविभाजनार्थ उभे करणे या सर्व कामांसाठी पैशाचा मोठा वापर केल्या जातो.*** *(परिच्छेद १४१ पहा)*

अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, GST हा कर बसविण्यात आल्याच्या पहिल्या वर्षातील म्हणजे सन २०१७-१८ च्या आठ महिन्यात शासनाला या करातून ७.१९ लक्ष कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले. दिनांक १ ऑक्टोबर २०२३ रोजी या अधिकृत संकेतस्थळावर चढविण्यात आलेली पुढील माहिती लक्षात घेण्यासारखी आहे. :-

**(i)** "1,62,712 crore gross GST revenue collected during September 2023; records 10% Year-on-Year growth"

**(ii)** GST collection crosses 1.60 lakh crore mark for the fourth time in FY 2023-24"

**(iii)** 9,92,508 crore gross GST collection for the first half of FY 2023-24 marks 11% Y-o-Y growth"

**(iv)** Average monthly gross GST collection in FY 2023-24 at Rs. 1.65 lakh crore with 11% Y-o-Y growth"

**१३९.** जुनी पेन्शन योजना बंद करून कर्मचाऱ्यांच्या वेतनातील १० टक्के व शासनातर्फे १४ टक्के निधी शासनाने भांडवली बाजारात वळता करणे यामुळे लोक अगोदरच कातावून गेलेले असतांना जानेवारी २०१८ मध्ये केंद्रशासनाने निवडणूक रोख्यांची योजना आणली. मागोमाग भांडवली बाजारातील प्रमुख खेळाडू असलेल्या सर्वच कंपन्यांना फार मोठी कर सवलत देण्यात आली. निवडणूक रोख्यांची योजना ही अपारदर्शी असून त्यामुळे भ्रष्टाचाराला वाव मिळतो. सत्ताधारी व विरोधकांना समान संधी मिळत नाही म्हणून ही योजना लोकशाहीसाठी धोकादायक आहे असा दावा करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयामध्ये Association for demorcratic reforms (ADR) या स्वयंसेवी संघटनेने दाखल केली. त्याबरोबरच इतर संघटनांनीही याचिका दाखल केलेल्या आहेत. या याचिकांवर मा.सर्वोच्च न्यायालयात शासनाविरुद्ध निर्णय झाला आहे.

**१४०.** मुख्य याचिकाकर्त्यांचे वकील श्री.प्रशांत भूषण यांनी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात निवडणूक रोख्यातून मिळालेल्या देणग्यांची आकडेवारी न्यायालयात सादर केलेली असून त्या नुसार त्या एका वर्षात भारतीय जनता पक्षाला ५२७१ कोटी रुपये, काँग्रेस पक्षाला ९५२ कोटी रुपये, तृणमुल काँग्रेस पक्षाला ७६७ कोटी रुपये, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला ६३ कोटी आणि आम आदमी पार्टीला ४८ कोटी रुपये मिळालेले आहेत. केंद्रात किंवा राज्यात सत्तेत असल्याशिवाय अशा देणग्या मिळत नाहीत आणि त्यामुळे सत्ताधारी व विरोधकांना समान संधी मिळत नाही असा याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद आहे.

**१४१.** दुसऱ्या याचिकाकर्त्याची बाजू मांडतांना श्री.कपिल सिब्बल यांनी असे प्रतिपादन केलेले आहे की, **'भांडवल' आणि 'प्रभाव' हे नेहमी हातात हात घालून चालतात. निवडणूक प्रक्रियेमध्ये प्रत्येकाला समान संधी मिळाली पाहिजे. मुक्त निवडणूक हा आपल्या घटनेचा पाया आहे व निवडणूक रोखे हे त्याला घातक आहेत. एखाद्या उमेदवाराच्या प्रचारासाठी जमाव गोळा करणे, एखाद्या सदस्याला त्याच्या पक्षातून फोडणे, एखाद्या उमेदवाराला तू निवडणूक लढवू नकोस यासाठी बाध्य करणे, एखाद्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी दुसऱ्या उमेदवाराला मतविभाजनार्थ उभे करणे या सर्व कामांसाठी पैशाचा मोठा वापर केल्या जातो.**

**१४२.** केंद्रसरकारच्या वतीने ॲटर्नी जनरल श्री.आर.वेंकटरमणि यांनी मा.सर्वोच्च न्यायालयासमोर केंद्रशासनाची भूमिका मांडली ती अशी की, "राजकीय पक्षांना निधी कोठून मिळतो याचे तपशील जाणून घेण्याचा नागरिकांना कोणताही अधिकार घटनेने दिलेला नाही." ("Attorney general R. Venkataramani, in a statement filed in the Supreme Court, had submitted that citizens do not have the right to information under Article 19(1) (a) of the Constitution regarding the funding of a political party.")

निवडणूक रोख्यांच्या या व्यवस्थेमध्ये कोणत्या कंपनीने किंवा कोणत्या व्यक्तीने कोणत्या पक्षाला किती निधी दिला? हे कोणालाही समजू नये अशी एकंदर व्यवस्था आहे. विद्यमान कायद्यातील तरतुदीनुसार प्रत्येक उमेदवाराला आपली संपत्ती व संपत्तीच्या अर्जनाचे स्रोत जाहीर करणे बंधनकारक करण्यात आले असून निवडणुकीच्या वेळी केलेल्या खर्चाचे तपशील सादर करणे सुद्धा बंधनकारक आहे. अशा परिस्थितीमध्ये निवडणूक रोख्यांचा हिशेब कोणीही विचारू नये अशी भूमिका ॲटर्नी जनरल यांनी घ्यावी हे निश्चितच आश्चर्यकारक आहे.

**१४३.** एका बाजूला नवीन पेन्शन योजने अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या वेतनातून १० टक्के व शासनातर्फे १४ टक्के रक्कम भांडवली बाजारातील खेळाडूंच्या खेळासाठी उपलब्ध करून दिली जात आहे तर त्याच वेळेला त्यातील काही खेळाडू हे बँकांकडून मोठ्या प्रमाणात कर्ज उभे करतात व ते कर्ज बुडवितात असा प्रकार वर्षानुवर्षे सुरू आहे. **इंडियन एक्सप्रेस** या वृत्तपत्रसमूहाने माहितीच्या अधिकारात रिझर्व्ह बँकेकडून मिळविलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, मार्च २०२३ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात बँकांनी एकंदर २.०९ लाख कोटी रुपयांचे कर्ज निर्लेखित केलेले आहे. इंडियन एक्सप्रेसने याबाबतचा तपशीलवार वृत्तांत प्रकाशित केला असून त्याचा मराठी तर्जुमा लोकसत्ताच्या दिनांक २५ जुलै २०२३ रोजीच्या अंकामध्ये "**बँकांकडून वर्षभरात २.०९ लाख कोटींच्या थकीत कर्जाचे निर्लेखन**" या मथळ्याखाली प्रकाशित झालेला आहे. हा मजकूर काळजीपूर्वक पाहिला तर असे दिसून येते की,

**(i) मागील पाच वर्षात बँकांकडून एकूण कर्ज निर्लेखित (Write-off) केल्याची रक्कम १०.५७ लाख कोटी रुपये इतकी आहे. असे रिझर्व्ह बँकेने पुरविलेल्या या अधिकृत माहितीत नमूद आहे.**

**(ii)** रिझर्व्ह बँकेने दिलेल्या या आकडेवारीनुसार आर्थिक वर्ष २०१२-१३ पासून बँकांनी तब्बल १५,३१,४५३ कोटी रुपयांचे कर्ज निर्लेखित केलेली आहेत.

**(iii)** रिझर्व्ह बँकेच्या अधिकृत आकडेवारीनुसार असे दिसून येते की, मार्च २०२३ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात बँकांकडून २,०९,१४४ कोटी रुपयांचे कर्ज निर्लेखित केल्या गेले. मार्च २०२२ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात १,७४,९६६ कोटी रुपयांचे कर्ज निलेखित केल्या गेले. निर्लेखित केलेले कर्ज वसूल करणे हे शक्य असले तरी जवळ जवळ हे कर्ज बुडित गेलेलेच असते.

***कंपन्यांवरील कर (Corporate Tax) ३० टक्क्यांवरून सन २०१९ मध्ये २२ टक्क्यांवर आणण्यात आला. त्यापोटी आर्थिक वर्ष २०२० व २१ मध्ये १.८४ लक्ष कोटी रुपयांचे नुकसान शासनाला सहन करावे लागले. अशाप्रकारचे पुढे होणारे नुकसान भरुन काढण्यासाठी सन २०१७ पासून एका अप्रत्यक्ष कराला जन्मास घालण्यात आले होते. दिनांक १ जुलै २०१७ रोजी वस्तू व सेवा कर (Goods and Services Tax - GST) या नावाचा एक अप्रत्यक्ष कर मोठ्या थाटामाटात समारंभपूर्वक सुरू करण्यात आला.*** *(परिच्छेद १३७ पहा)*

***घटनेतील या तरतुदींचा भंग करण्यामध्ये उच्च शिक्षण विभागातील अधिकारी व उच्च शिक्षण विभागाचे संचालक व सहसंचालक यांच्या यंत्रणा उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने कायम केले असले तरी उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अवहेलना करण्यात आघाडीवर असल्याचे दिसून येते. ही आघाडी इतकी जोरदार आहे की, त्यामुळे उच्च शिक्षण विभागात सर्वत्र अराजकाची परिस्थिती निर्माण झालेली आहे.***

*(परिच्छेद १७५ पहा)*

**१४४.** 'सजग नागरिक मंच' या पुणे येथील स्वयंसेवी संघटनेचे श्री.विवेक वेलणकर यांनी माहिती अधिकारामध्ये रिझर्व्ह बँकेकडून माहिती मागविली असून त्या माहितीचे सर्व तपशील दिनांक १० ऑगस्ट २०२३ रोजीच्या लोकसत्तामध्ये "३५९ 'बड्यां'कडून बँकांचे दीड लाख कोटी फस्त" या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेले आहे. त्या माहितीतून असे स्पष्ट झालेले आहे की,

**(i)** ३५० व्यक्तींनी प्रत्येकी १०० कोटी रुपयांहून जास्त कर्ज हेतुपुरस्सर थकविलेले आहे. या थकविलेल्या कर्जाची रक्कम १.५० लाख कोटी रुपयांच्या घरात जाणारी आहे.

**(ii)** रिझर्व्ह बँकेने ३१ मार्च २०२३ अखेर पर्यंतच्या अशा २४९१ कर्जथकबाकीदारांची यादी दिली असून त्या सर्वांची एकूण थकबाकी २ लाख ५ हजार ४५९ कोटी रुपये आहे.

**(iii)** सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची १ हजार कोटी रुपये अथवा त्याहून अधिक थकबाकी असणारे २८ जण असून त्यांनी एकत्रितपणे बँकांचे ६४ हजार १०३ कोटी रुपये थकविलेले आहेत.

**(iv)** ५०० ते १००० कोटी रुपयांच्या दरम्यान कर्ज थकविणारे स्टेट बँकेचे सहा थकबाकीदार असून त्यांची एकत्रित थकबाकी ३९४८ कोटी रुपये आहे.

**(v)** अन्य सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे ५०० ते १००० कोटी रूपयांच्या दरम्यान थकबाकी असणारे ३३ जण असून त्यांची एकूण थकबाकी २२,५४५ कोटी रुपये आहे.

**(vi)** स्टेट बँकेचे १०० ते ५०० कोटी रुपये थकविणारे ४८ थकबाकीदार असून त्यांची थकबाकी ११,३४७ कोटी रुपये आहे.

**(vii)** अन्य सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे १०० ते ५०० कोटी रुपये थकविणारे २४४ थकबाकीदार असून त्यांची एकत्रित थकबाकी ५३,२८४ कोटी रुपये आहे.

**(viii) या साऱ्या माहितीचा सारांश असा की, १०० कोटी रुपयांच्यावर थकबाकी असणारे स्टेट बँकेसह सार्वजनिक बँकांचे ३५९ कर्ज बुडवे असून त्यांची एकत्रित थकबाकी दीड लाख कोटी रुपये आहे.**

**१४५.** बँकांनी दिलेले कर्ज हे बँकेची मालमत्ता असते तर लोकांकडून जमा होणाऱ्या ठेवी ह्या बँकांचे दायित्व असते. कर्जदाराने कर्ज परतफेडीस निरंतर कसूर केल्यास आणि वसुलीची फार कमी शक्यता असणारी कर्जे बँकांकडून निर्लेखित केल्या जातात. निर्लेखित केलेली कर्जे ही बँकेची मालमत्ता म्हणून राहत नाही तर ही रक्कम तोटा म्हणून नोंदविल्या जाते. कर्ज परतफेडीच्या प्रकरणामध्ये टोकाची पावले उचलू नयेत आणि अशी प्रकरणे संवेदनशीलतेने हाताळली जावी असे केंद्रसरकारचे सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रातील बँकांना स्पष्ट निर्देश आहेत. खुद्द अर्थमंत्री श्रीमती निर्मला सितारामन यांनी सोमवार, दिनांक २४ जुलै २०२३ रोजी लोकसभेत तसे स्पष्ट केले. लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासा दरम्यान कर्ज वसुलीच्या प्रश्नांच्या संदर्भात चालू असलेल्या चर्चेत हस्तक्षेप करतांना श्रीमती निर्मला सीतारामन यांनी "बँकांकडून निर्दयीपणे कर्जवुसली होत असल्याच्या तक्रारी मी ऐकल्या आहेत. सरकारने सार्वजनिक आणि खाजगी अशा सर्व बँकांना निर्देश दिले आहेत की कर्ज वसुलीची प्रक्रिया करताना कठोर पावले उचलली जाऊ नयेत आणि मानवी दृष्टिकोन, संवदेनशीलतेचा प्रत्यय या प्रकरणी बँकांनी द्यावा."

**१४६.** केंद्रशासनात आणि केंद्रस्तरावरील काही संस्थांमध्ये अलिकडे एक प्रकार मोठ्या प्रमाणात दिसून येतो. कोणीतरी एखादा उच्चपदस्थ अधिकारी एखादा विषारी विचार जाहीरपणे सोडून देतो व हा काही शासनाचा विचार नाही असाही खुलासा मागोमागच केल्या जातो. मांडण्यात आलेल्या विचाराचा विषारीपणा इतका प्रखर असतो की त्याकडे दुर्लक्ष करणे समाजाला शक्य नसते. या संदर्भातील दोन मोठे अपप्रकार लक्षात घेणे आवश्यक आहे.

**१४७.** पहिला प्रकार असा की, रिझर्व्ह बँकेच्या संशोधन विभागात काम करणाऱ्या चार अधिकाऱ्यांनी जुन्या पेन्शन योजनेच्या संदर्भात डेप्युटी गव्हर्नर दर्जाच्या अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली एक तपशीलवार टिपण तयार केले व ते सप्टेंबर २०२३ च्या रिझर्व्ह बँकेच्या बुलेटीनमध्ये प्रकाशित करण्यात आले. या टिपणाचा मथळाच मुळात "Old Pension Scheme could put severe strain on states' finances" असा आहे. मथळ्याला शोभेसे विचार हे त्या लेखामध्ये तपशीलवारपणे मांडण्यात आलेले आहे. हे त्या अधिकाऱ्यांचे वैयक्तिक विचार आहेत असा खुलासा करण्यात आलेला आहे. परंतु केंद्रशासनाचा एकंदर व्यवहार त्या टिपणाला शोभा आणणारा आहे असे दिसून येते. ज्या राज्यांनी जुनी पेन्शन योजना लागू केलेली आहे ती राज्ये फार मोठ्या आर्थिक अडचणीत आहेत अशाप्रकारच्या बातम्या चारही बाजूंनी प्रकाशित करण्यात येत आहेत. केंद्रशासनातील उच्चपदस्थ जाहीरपणे "विकासासाठी आमच्या जवळ निधी शिल्लक नाही असे खुद्द कर्नाटक शासनातर्फे सांगितल्या जात आहे" असा प्रचार करतांना आढळून येतात. याबाबतीत वस्तुस्थिती अशी आहे की, जुनी पेन्शन योजना लागू केलेल्या राज्यांची जाणीवपूर्वक कोंडी करण्याचे काम सुरू झालेले आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री श्री.सिद्धारामैया यांनी अधिकृतपणे व जाहीरपणे पत्रकार परिषद घेऊन असे घोषित केलेले आहे की, "निरनिराळ्या केंद्र प्रायोजित ६१ योजना कर्नाटकात अंमलात आणलेल्या असतांना गेल्या सहा महिन्यांपासून केंद्रशासनाने याबाबतचा केंद्राचा निधी दिलेला नाही. केंद्रशासनाला महत्तम कर प्रदान करणारे कर्नाटक हे दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असून कर्नाटकाला केंद्रशासनाकडून मिळणारा हिस्सा उशीराने व कमी मिळण्याचा प्रकार सातत्याने चालू आहे. कर्नाटकच्या वाट्याचे ४५ हजार कोटी रुपये केंद्रशासनाने थकविले आहेत."

**१४८.** पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष विवेक देबरॉय यांनी दिनांक १४ ऑगस्ट २०२३ रोजीच्या **"MINT"** या इंग्रजी दैनिकात एक तपशीलवार लेख लिहून भारतीय संविधानाबद्दल अत्यंत आक्षेपार्ह विधाने केलेली आहेत. आजचे भारतीय संविधान हे १९३५ च्या कायद्यावर आधारित असल्यामुळे ते वसाहतवादाचे पिल्लू आहे असे त्यांचे विधान आहे. त्यामुळेच त्यांनी पुढे असेही प्रतिपादन केलेले आहे की, आता "नवीन घटना निर्माण केली पाहिजे." यासाठीची जी कारणे त्यांनी या लेखामध्ये सांगितलेली आहेत ती मोठीच मजेशीर आहेत. ते असे म्हणतात जगातील लिखित घटनांचा अभ्यास केला तर या घटनांचे सरासरी आयुष्य हे १७ वर्षांचे आहे व त्यामुळे आता आपण नवीन घटनेचा विचार केला पाहिजे. घटनेच्या आयुर्मानाकडे पाहण्याचा त्यांचा हा अतिशय विकृत असा विचार म्हटला पाहिजे. प्रगल्भ रुढी, लोकशाहीच्या मजबूत परंपरा यावर आधारित ब्रिटनच्या घटनेचे आयुष्य हे जवळ जवळ ८०० वर्षांचे आहे. अमेरिकेच्या लिखित राज्यघटनेला २३४ वर्षे पूर्ण झालेली आहेत. तर ऑस्ट्रेलियाच्या राज्यघटनेला ७३ वर्षे पूर्ण झालेली आहेत. अशातच आमची घटना ७०-७५ वर्षांपासून मजबूतपणे टिकून आहे व उत्तमरीतीने काम करीत आहे, याचा अभिमान बाळगण्याऐवजी इतर घटनांचे सरासरी आयुष्य १७ वर्षांचे आहे म्हणून आपण आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घ्यावी हे निकोप विचारांचे लक्षण नाही.

**१४९.** एखादी गोष्ट आवश्यक असेल तर घटनादुरुस्ती करून घटनेमध्ये तसा बदल करता येतो व तसे बदल यापूर्वी अनेक वेळेला करण्यात आलेले आहेत. केशवानंद भारती खटल्यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या घटनेच्या मूळ संरचनेच्या (Basic Structure) विरोधात जाईल असा बदल करता येत नाही. श्री.विवेक देबरॉय या लेखात असे मत मांडतात की, घटनेत दुरुस्ती केली आणि ती मूळ घटनेच्या विरोधात असेल तर सर्वोच्च न्यायालय ती घटनादुरुस्ती रद्दबातल करू शकते म्हणून आपण नवीन घटना तयार करणेच

जास्त योग्य होईल. त्यांच्या लेखाचा मथळाच मुळात "There is a case for 'we the people' to embrace a new Constitution" असा आहे आणि या लेखात पुढे त्यांनी "We the People have to give ourselves a new Constitution" असे प्रतिपादन केलेले आहे.

**१५०.** राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्त्वांविषयीचे त्यांच्या लेखातील प्रतिपादन हे तर अत्यंत आक्षेपार्ह आहे. "If reforms are about markets and a refocused and reduced role for government, what sense do we make of the Directive Principles of State Policy?" असे विचार त्यांनी मांडलेले आहेत. भारतीय संविधानातील राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे प्रकरण हे गोरगरिबांचे तीर्थक्षेत्र आहे असे म्हणता येईल. कारण या प्रकरणाने अनेक आर्थिक अधिकार प्रदान केलेले आहेत. त्याला कायदेशीर स्वरूप नाही व न्यायालयातून त्यांची अंमलबजावणी करता येत नाही हे खरे असले तरी राज्यकारभार करतांना कार्यकारी मंडळाने व विधानमंडळाने त्यांचे पालन केले पाहिजे अशी घटनाकारांची अपेक्षा होती. राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या प्रकरणाच्या घटनेत असण्यामुळे कोट्यावधी गोरगरिबांना जगणे सुसह्य झाल्याची लक्षावधी उदाहरणे दाखवून देता येतील. प्राथमिक-माध्यमिक शिक्षणाच्या स्तरावर एकदा व महाविद्यालयीन शिक्षणाच्या स्तरावर आणखी एकदा शिक्षण घेणेच शक्य झाले नसते. ते केवळ राज्यनितीच्या मार्गदर्शक तत्त्वांमुळे शक्य झाले असा प्रस्तुत लेखकाचा स्वतःचा अनुभव आहे.

**१५१.** प्राथमिक शाळेच्या पहिल्या वर्गात मी दाखल झालो तो एका भाग्यवान शाळेचा भाग्यवान विद्यार्थी म्हणून. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ताबडतोबच प्राथमिक शाळेच्या स्तरावर बुनियादी शिक्षणाची निदान तोंडओळख व्हावी म्हणून प्रायोगिक तत्त्वावर त्यावेळच्या मध्यप्रांत वऱ्हाड सरकारने प्रत्येक तालुक्यात एक "**सरकारी सिनिअर बेसिक शाळा**" काढली होती. अमरावती तालुक्यात यावली, चांदूर तालुक्यात अंजनसिंगी, दर्यापूर तालुक्यात येवदा, अचलपूर तालुक्यात माधान व मोर्शी तालुक्यात, माझे गाव म्हणजे बेलोरा, येथे या शाळा सुरू करण्यात आल्या होत्या. मेळघाट तालुक्यात एखाद्या ठिकाणी अशी शाळा होती किंवा नाही व असल्यास ती कोठे होती? हे आज आठवत नाही. जिल्ह्यामध्ये त्यावेळी एवढे सहाच तालुके होते. तालुक्यातील इतर सर्व शाळांचे नियंत्रण जनपद (पुढे जिल्हापरिषद) या स्थानिक स्वराज्य संस्थेकडे होते, तर या सरकारी सिनिअर बेसिक शाळेचे नियंत्रण थेट "डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स" कडे रहात असे. '**स्थानिक स्वराज्य**'चा हस्तक्षेप अजिबात नसे. मुख्याध्यापक थेट 'डी.आय.' किंवा 'ए.डी.आय.' ला जबाबदार रहात असे. शिस्त कडक असे. टकळी, चरखा, सुतकताई, गीताई हे श्रद्धेचे व मन ओतून स्वीकारलेले विषय होते. त्यावेळी बालसभा, हस्तलिखीते, अक्षरवळण, सफाई, खेळ व कवायत यासाठी शिक्षक अभ्यासविषयाइतकाच जीव ओतत असत. वर्धेच्या नॉर्मल स्कूलमधून प्रशिक्षित होऊन बाहेर पडलेला विशेष शिक्षक वर्ग या शाळांना पुरविला जात असे. मुख्याध्यापकाच्या नावासमोर "सातवा वर्ग-थर्ड इअर ट्रेन्ड" अशी पात्रता बोर्डावर लिहिलेली पाहिली म्हणजे आजच्या पी.एच.डी पेक्षा भारी वजन मनावर पडत असे. अशा या "सरकारी सिनिअर बेसिक शाळा बेलोरा" या शाळेचा मी त्यावेळी विद्यार्थी होतो. याचा आम्हा विद्यार्थ्यांना त्या बालवयात खूपच फायदा झाला. पुढे महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर एकसारखेपणा आणण्यात ज्या चांगल्या गोष्टी मोडून पडल्या, त्यामध्ये या सरकारी सिनिअर बेसिक शाळा सुद्धा मोडीत निघाल्या व त्या जिल्हापरिषदांच्या सुपूर्त करण्यात आल्या. एक अतिशय उत्तम, चांगली व यशस्वी सिद्ध झालेली व्यवस्था मोडून टाकण्यात आली.

**१५२.** संपूर्णपणे कोरडवाहूच्या शेतीवर अर्थव्यवस्था अवलंबून असलेले खारपाण पट्ट्यातील ४ ते ५ हजार लोकसंख्येचे आमचे गाव. चुलते व वडील मिळून आमचे संयुक्त कुटुंब. दोघांमिळून सहा एकर कोरडवाहू जमीन. दोघेही दिवसभर राबत तेव्हा कसातरी कुटुंबाचा चरितार्थ चालत असे. मी चौथा वर्ग चांगल्या रीतीने पास झाल्यावर पाचव्या वर्गाच्या प्रवेशाच्या वेळी एक समस्या निर्माण झाली. त्याकाळी कशी काय ती व्यवस्था होती? हे आज काही मला सांगता येणार नाही, पण ती व्यवस्था होती, हे मात्र खरे. ५ व्या वर्गात प्रवेश घेतांना इंग्रजी विषय सोडून बाकी शिक्षण घेणाऱ्याला ४ आणे महिना फी होती व इंग्रजीसह शिक्षण घेणाऱ्याला सव्वादोन रुपये महिना फी असायची. इंग्रजी शिकविण्यासाठी वेगळा 'इंग्लिश टीचर' असे व तो ५ ते ७ या वर्गांना फक्त इंग्रजी हा विषय शिकवत असे. संयुक्त कुटुंब पद्धतीमध्ये नेतृत्त्व चुलत्यांचे होते. त्यांनी स्वतःच्या एकुलत्या एक मुलाला म्हणजे माझ्या मोठ्या चुलत भावाला- दादाला- सुद्धा चार आण्याच्या वर्गातच टाकले होते. आपल्या लहान भावाच्या मोठ्या मुलाला इंग्रजीत टाकू नये हा निर्णयामागे हेतू नव्हता, तर एवढा खर्च आपल्याला झेपणार नाही आणि इंग्रजी शिकून तरी पुढे काय उजेड पाडणार आहेत? ही भावना त्यामागे होती. इंग्रजी विषय नसेल तर सातवीनंतर शिकता येत नाही. एवढेच ना? मग आपल्याला तरी सातवीनंतर कुठे शिकवायचे आहे? अशी पालकांची भावना असे. गावात सातवी पर्यंत शाळा आहे, तेवढे झाल्यावर पुढे बाहेर ठिकाणी मुलांना पाठवून येणाऱ्या संभाव्य खर्चाचा विचार डोळ्यापुढे आल्यामुळे आज सव्वादोन रुपये महिना कशासाठी खर्च करा? हा एक पदरसुद्धा त्या विचारामागे होता.

**१५३.** शाळेतल्या चटपट्या मुलात माझा वरचा नंबर होता. रिद्धपूरच्या मंदिरावर व दाभेरीच्या तलावावर सोबत्यांच्या सहलीचे नेतृत्त्व करीत होतो, स्काऊटच्या शिक्षकांचा फारच आवडता विद्यार्थी होतो, बालसभेत भाग घेत होतो, चांगली भाषणे देत होतो, हस्तलिखित वार्षिकांकात लिहीत होतो, वर्गात कॅप्टन होतो. पाचवा वर्ग पास झालो, सहावा वर्ग पास झालो व सातव्या वर्गात प्रवेश घेतला तेव्हा माझ्या सर्व शिक्षकांमध्ये सातव्या वर्गानंतर याचे शिक्षण बंद होईल (कारण इंग्रजी असल्याशिवाय आठव्या वर्गात प्रवेशच होत नसे) याबाबतची हळहळ व्यक्त होऊ लागली. भारतीय संविधानाचा प्रत्यक्ष अंमल सुरू झाल्याला चार-पाच वर्षांचा काळसुद्धा झालेला नव्हता. राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आमच्या संविधानकर्त्यांनी गोरगरिबांच्या शिक्षणाला संरक्षण देणारे ४५ वे कलम समाविष्ट केले होते. ते शब्दशः पुढीलप्रमाणे :-

**"४५. राज्य हे या संविधानाच्या प्रारंभापासून दहा वर्षांच्या कालावधीच्या आत सर्व बालकांना त्यांच्या वयाच्या चौदा वर्षे पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद करण्यासाठी प्रयत्नशील राहील."**

भारतीय संविधानातील राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्त्वातील या कलमाच्या प्रभावामुळेच त्यावेळच्या मध्यप्रांत वऱ्हाड सरकारने सक्तीच्या मोफत शिक्षणाची तरतूद करणारे एक परिपत्रक काढले होते. सातव्या वर्गानंतर पुढे मला शिकताच येणार नाही अशी हळहळ वाटणाऱ्या माझ्या शिक्षकांनी या परिपत्रकाचा चांगलाच उपयोग करून घेतला. स्कूल कमेटीच्या कानावर ही गोष्ट घालण्यात आली. स्कूल कमेटीची बैठक झाली. इंग्रजीची फी माफ करण्याचा कमेटीने निर्णय घेतला व मला सातव्या वर्गातून पुन्हा पाचव्या वर्गात बसविण्यात आले. इंग्रजीसह ५ व्या व ६ व्या वर्गाचा माझा प्रवास पुन्हा सुरू झाला. **१९५४ साली सातव्या वर्गाची परीक्षा उत्तीर्ण झालो. त्यानंतर मी गाव सोडले.** पुढे मी विधानपरिषद सदस्य झाल्यानंतर या शाळेच्या शताब्दी महोत्सवाला मुख्य पाहूणा म्हणून गेलो, तेंव्हा शं.दु.राउत व गो.चि. वानरे या माझ्या शिक्षकांनी शाळेच्या "निर्णय नोंद व अभिप्राय" रजिस्टरामध्ये "भोवराव तुळसीराम देशमुख" या विद्यार्थ्याला इंग्रजीची फी माफ केल्याच्या निर्णयाची नोंद मला दाखविली. माझे करिता ती काही नविन गोष्ट नव्हती पण १०० वर्षाच्या त्या शाळेच्या इतिहासांत भारताचे थोर सुपुत्र व माजी अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख यांनी एलिचपूर येथे ई.ए.सी (Extra Assistant Commissioner) म्हणून कार्यरत असतांना या शाळेला स्वतः भेट देऊन पहाणी केली व स्वदस्तुरात त्या रजिस्टरामध्ये अभिप्राय नोंदविला होता. हे वाचून खूपच मौज वाटली व अशा शाळेचे आपण विद्यार्थी होतो याचा आनंदही वाटला.

**१५४.** गावातून बाहेर पडण्याचे मुख्य कारण म्हणजे त्यावेळी आठवा वर्ग व त्या पुढील शिक्षणाची सोय आमच्या गावात नव्हती. हायस्कूल असलेल्या एखाद्या ठिकाणी प्रवेश घेऊन राहणे ही आर्थिकदृष्ट्या अशक्य गोष्ट होती. माझे एक मामा त्यावेळी वर्धेला जनपदमध्ये सेवेत होते. आई वर्धेला जावून आली व त्या वशिल्यावर मी वर्धेला मॉडेल हायस्कुलमध्ये आठव्या वर्गात दाखल झालो. ४-५ हजार लोकसंख्येच्या गावातील चटपट्या मुलाचे रुपांतर वर्धेसारख्या जिल्ह्याच्या ठिकाणी चळवळ्या मुलात झाले. परिणामी वर्धेतील मुक्काम १-२ वर्षातच हलवावा लागला. तिथेसुद्धा माझ्या शिक्षकांचा अपार लोभ मला लाभला. "प्रथम मी शिक्षण पूर्ण करावे, निदान मॅट्रिक पास झाल्याशिवाय इतर चळवळीत पडू नये" असे त्यांना मनापासून वाटत असे. माझे वर्धेत काही खरे नाही अशी भावना झालेले वर्धेचे आमचे मुख्याध्यापक 'टाकोडे (व्यंकटराव) गुरुजी' यांची वर्धेवरुन अमरावतीच्या श्री. शिवाजी मेन ब्रँचवर बदली झाली. ते अमरावतीला रुजू झाल्यानंतरच्या उन्हाळ्यात त्यांनी माझा वर्धेवरुन दाखला मागविला व श्री. शिवाजी हायस्कूल मेन ब्रँचमध्ये १० व्या वर्गात माझा प्रवेश करवून घेतला. "श्रद्धानंद बोर्डिंगमध्ये तुझा प्रवेश झाला असून येतांना सोबत ताट, वाटी व सतरंजी घेऊन येण्याची सूचना" देणारे त्यांचे पत्र उन्हाळ्याच्या सुटीत मला गावला मिळाले. पुढची वर्ष दोन वर्षे मी श्रद्धानंदमध्ये काढली. १९५८ च्या एप्रिल महिन्यात श्री. शिवाजी हायस्कूल मधून मी त्यावेळची अकरावी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झालो. मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्याच वर्षी (१९५८) मी विदर्भ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. पुढच्या सहा वर्षानंतर राज्यशास्त्र या विषयात एम.ए.करुन १९६४ मध्ये मी विदर्भ महाविद्यालय सोडले. १९६०-६१ या वर्षी मी विदर्भ महाविद्यालयाच्या छात्रसंघाचा अध्यक्ष म्हणून निवडून आलो होतो. विदर्भ महाविद्यालयातील माझे विद्यार्थी जीवन हे खूपच समृद्ध अशा अनुभवाची शिदोरी सोबत देणारे ठरले. ज्या कारणांमुळे

मला वर्धा सोडून अमरावतीला यावे लागले त्याच कारणामुळे मी वर्धेला असतांनाच अमरावती येथे दैनिक 'हिंदुस्थान'शी माझा संबंध आला होता. ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी व दैनिक 'हिंदुस्थान'चे संस्थापक - संपादक स्व. श्री. बाळासाहेब मराठे यांचे विपूल मार्गदर्शन पुढील काळात मला लाभले. अमरावतीला आल्याबरोबर दैनिक 'हिंदुस्थान'मध्ये मी कामाला सुरुवात केली. अमरावती येथे विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना 'कंपोझीटर कम प्रिंटर कम प्रुफरीडर कम रिपोर्टर कम सबएडिटर कम (वेळ प्रसंगी) एडीटर' अशा सर्व पदावरून काम करण्यामुळे माझे अनुभव विश्व खूपच विस्तृत होण्यास मदत झाली. माझ्या शिक्षणाला या कामामुळे हातभार लागला.

**१५५.** अमरावतीचे विदर्भ महाविद्यालय हे या विभागातील पहिले शासकीय महाविद्यालय आणि त्यामुळे या विभागाच्या सर्व जिल्ह्यातून प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांची फार मोठी गर्दी या महाविद्यालयामध्ये होत असे. महाविद्यालयामध्ये वर्षाकाठी फी ही त्यावेळी जवळ जवळ १३०० ते १७०० रूपये असायची व एवढी मोठी फी भरणे या भागातील अनेक विद्यार्थ्यांना मोठेच अडचणीचे होते. कारण या विभागातील सर्व जिल्हे हे कोरडवाहू शेतीवर अवलंबून होते व अनेक तालुके खारपाणपट्ट्यात होते. त्यावेळी वर्षाकाठी एवढी मोठी फी भरणे हे एक मोठ्या संकटाचा सामना करण्यासारखे होते. केवळ विदर्भ महाविद्यालयामध्ये मला प्रवेश मिळालेला आहे यामुळे आमच्या लहानशा गावात झालेल्या आनंदाच्या पोटी माझ्या वडिलांनी गावात असलेली आपली सारी 'पत' खर्ची घालून एका वर्षाच्या शिक्षण शुल्काइतकी रक्कम 'उभी' केली. पुढच्या दोन-चार-पाच वर्षाच्या शिक्षण शुल्काची रक्कम कशी उभी करणार? हा काळजीचा प्रश्न 'आ'वासून समोर उभा होता.

**१५६.** शासकीय महाविद्यालयामध्ये एवढी मोठी फी भरण्याचे हे संकट पुढच्या एक-दोन वर्षामध्ये दूर होण्याची शक्यता समोर दिसायला लागली. **याचे पहिले कारण म्हणजे** भारतीय संविधानाच्या चौथ्या भागातील राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये याबाबतीत असलेली अनेक मार्गदर्शक तत्त्वे हेच सांगता येईल. सन १९६० मध्ये द्विभाषिक मुंबई राज्य संपुष्टात येऊन महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली व महाराष्ट्राचे तत्कालीन शिक्षणमंत्री श्री.बाळासाहेब देसाई यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये एक क्रांतिकारक निर्णय घेण्याचा कृतिपर विचार सुरू केला होता. **हे दुसरे कारण.**

**१५७.** सुरुवातीला राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्त्वात नमूद असलेल्या याबाबतच्या महत्त्वाच्या तरतुदी नमूद करतो.

**(A)** संविधानातील कलम ४६ पुढीलप्रमाणे:- **"46. Promotion of educational and economic interests of Scheduled Castes, Scheduled Tribes and other weaker sections.— The State shall promote with special care the educational and economic interests of the weaker sections of the people,** and, in particular, of the Scheduled Castes and the Scheduled Tribes, and shall protect them from social injustice and all forms of exploitation."

**(B)** भारतीय संविधानातील राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्त्वांमधील कलम 39 (b) शब्दशः पुढीलप्रमाणे :- "39. (b) that the ownership and control of the material resources of the community are so distributed as best to subserve the common good;"

**(C)** संविधानातील खंड 39 (c) पुढीलप्रमाणे :- "39. (c) that the operation of the economic system does not result in the concentration of wealth and means of production to the common detriment;"

**१५८.** राज्यनीतीच्या या अनेक मार्गदर्शक तत्त्वांचा अभ्यास करून अनेक राज्यांमध्ये शिक्षण विषयक तरतुदी करण्याचा विचार सुरू झालेला होता. नव्याने निर्माण झालेल्या "महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री श्री.बाळासाहेब देसाई यांनी सबंध महाराष्ट्रभर ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न १२०० रुपयांच्या आत आहे अशा सर्व विद्यार्थ्यांना सर्व स्तरावर फी माफी करण्याचा निर्णय घेतला" व तो निर्णय जाहीर केल्यामुळे विदर्भ महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला. पदव्युत्तर शिक्षणापर्यंत ही फी माफी लागू होती. महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री श्री.बाळासाहेब देसाई यांनी हा जो निर्णय जाहीर केला त्याचे सर्व बाजूंनी स्वागत झाले. खुद्द विदर्भ महाविद्यालयामध्ये उत्स्फूर्तपणे महाविद्यालयाच्या सभागृहासमोर विद्यार्थ्यांची सभा झाली. निदान तीनशे ते चारशे विद्यार्थी या सभेला उपस्थित असतील. महाराष्ट्र शासनाचे व शिक्षणमंत्र्यांचे आभार मानणारा ठराव या सभेत संमत करण्यात आला. एवढ्यावर न थांबता एका खुर्चीमध्ये श्री.बाळासाहेब देसाई यांचा फोटो ठेवून त्या फोटोची मिरवणूक विदर्भ महाविद्यालयापासून तर त्यावेळच्या डोळे गार्डनपर्यंत (आजचा पंचवटी चौक) काढण्यात आली.

**१५९.** गोरगरिब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा विचार करून त्याप्रमाणे निर्णय घेण्याची क्षमता असल्याचे जे उदाहरण श्री.बाळासाहेब देसाई यांनी दाखवून दिले तशाच प्रकारचे एक उदाहरण स्वातंत्र्यपूर्व काळात मध्य प्रांत वऱ्हाडच्या मंत्रीमंडळात शिक्षणमंत्री असलेले श्री.संभाजीराव गोखले यांचे नमूद करता येईल. ते शिक्षणमंत्री असतांना ए.व्ही.स्कूल पर्यंतच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून अतिशय उत्तम अशाप्रकारची भव्य इमारत त्यावेळच्या नेहरू मैदानात श्री.संभाजीराव गोखले यांच्या कार्यकाळात बांधल्या गेल्याचे त्यावेळी सांगितले जात होते. अतिशय उत्तम प्रकारचे बांधकाम असलेली ही इमारत लाल विटांची बांधलेली असल्यामुळे अनेक वर्षेपर्यंत ती 'लाल शाळा' म्हणून ओळखली जात असे. या मूळ इमारतीमध्ये तळ मजल्यावर एक भव्य सभागृह असून या सभागृहामध्ये शहरातील अनेक शिक्षक संघटनांच्या बैठका होत असत. अशीच एक बैठक १९८४ मध्ये या सभागृहात सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांची भरली होती. हे सारे शिक्षक मध्य प्रांत वऱ्हाडमधील 'जनपद' या तालुकानिहाय स्थानिक स्वराज्य संस्थेत कार्यरत होते. पुढे महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर त्यांच्या सेवा जिल्हा परिषदांच्या अखत्यारित गेल्या.

**१६०.** या सभेमध्ये अनेक शिक्षकांची मुख्य तक्रार अशी होती की, मध्य प्रांत वऱ्हाडमधील काही जनपदसभांनी शिक्षकांचा प्रशिक्षणापूर्वीचा खंडित सेवाकाळ क्षमापित (Condone) केला. मात्र अनेक जनपदसभांनी तसा निर्णय घेतला नाही. त्यामुळे तेथे सेवानिवृत्तीवेतनामध्ये फार मोठी कपात होत आहे. मी या सभेमध्ये असे सांगितले की, याबाबतच्या तक्रारीचे निवेदन शासनाकडे दाखल करा व त्याची प्रत आमच्याकडे द्या म्हणजे या प्रश्नाचा सभागृहामध्ये पाठपुरावा करता येईल. तक्रार योग्यरितीने मांडली जाईल, दाखल केली जाईल व ती दाखल केल्याचा पुरावा आपल्या हाती राहील याबाबतची विशेष काळजी घेण्यात आली होती. अनेक शिक्षकांनी उपरोक्त तक्रार केली ती ऐकून व्यक्तिशः मला मनापासून दुःख वाटले. याचे कारण असे की, प्राचार्य श्री.अण्णासाहेब वैद्य, श्री.बबनराव मेटकर, श्री.बाबासाहेब सोमवंशी, प्रा.श्रीधर चिंचमलातपूरे, श्री.बाळासाहेब कुळकर्णी यांच्यासारख्या महाविद्यालयीन व विद्यालयीन विद्यार्थ्यांचा आमचा एक गट संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये मनापासून अग्रभागी होता. ही तक्रार ऐकल्यानंतर मध्य प्रांत वऱ्हाड मधून महाराष्ट्रात गेलेल्या शिक्षकांना लहान-सहान प्रकरणी यापुढे असेच 'भोग' भोगावे लागतील काय? अशी भावना मनामध्ये चाटून गेली व ती भावना निश्चितच क्लेशदायक होती. श्री.बाबासाहेब सोमवंशी हे या सभेच्या वेळी विधानपरिषद सदस्य होते व माझ्यासोबत या सभेला उपस्थित होते.

**१६१.** "**जनपद कालिन शिक्षकांचा प्रशिक्षणापूर्वीचा खंडित सेवाकाल कंडोन करण्याबाबत**" या मथळ्याचा आमचा तारांकित प्रश्न क्रमांक ५१४ हा स्वीकृत झाला व तो सोमवार, दिनांक २४ जून १९८५ रोजी सभागृहामध्ये उत्तरासाठी होता. "(१) मोर्शी या जनपदसभेने शिक्षकांचा प्रशिक्षणापूर्वीचा खंडित सेवाकाल इतर जनपदाप्रमाणे कंडोन केलेला नसल्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी प्रशिक्षणापूर्वीचा खंडित सेवाकाल शासनाने कंडोन करावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक महासंघ या संघटनेच्या मोर्शी पंचायत समिती शाखेच्या अध्यक्षांनी मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे दिनांक ९ ऑगष्ट, १९८४ रोजी किंवा त्या दरम्यान एक निवेदन पाठवून केलेली आहे, हे खरे आहे काय" या आमच्या प्रश्न भाग एक ला मा.शिक्षणमंत्र्यांनी "दिनांक ९ ऑगष्ट १९८४ रोजी किंवा त्या दरम्यान मोर्शी जनपदसभेतील शिक्षकांचा प्रशिक्षणापूर्वीचा खंडित सेवाकाल शासनाने कंडोन करावा अशा आशयाची मागणी करणारी निवेदने त्या वेळच्या ग्रामविकास मंत्र्याकडे आल्याचे दिसत नाही." असे उत्तर दिले होते. सभागृहामध्ये हे निवेदन रजिस्टर्ड पोस्टाने पाठविले असून त्याची पोचपावती माझ्याकडे आहे असे सांगायला मी सुरुवात केली. जयंतराव टिळक हे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील ज्येष्ठ नेते. त्यामुळेच विदर्भ व मराठवाड्यातून विषम वागणुकीची कोणतीही तक्रार आली तर सभापती या नात्याने अशी विषम वागणूक दूर करण्यासाठी ते मदत करीत असत. त्याच भावनेतून मा.सभापतींनी त्यावर "**पावती आहे की नाही हा भाग बाजूला ठेवा. मुख्य प्रश्न खंडित सेवाकाळ क्षमापित करण्याबाबतचा आहे. त्याबाबत मा.सदस्यांनी प्रश्न विचारावा**" असे सभागृहातच सूचित केले. महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही, अधिकृत प्रतिवेदन, सोमवार, दिनांक २४ जून १९८५, खंड ७४, क्रमांक १ च्या पृष्ठ ३३ ते ३५ वरील या चर्चेचे अधिकृत प्रतिवेदन शब्दशः पुढीलप्रमाणे:-

"**श्री.बी.टी.देशमुख :** या ठिकाणी निवेदने आलेली नाहीत असे म्हटले आहे. परंतु ही निवेदने रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली असून माझ्याकडे त्यांची पावती आहे. तेव्हा आपण निवेदने आली नाहीत या आधारावर उत्तर देणार असल्यामुळे या प्रश्नाला योग्य उत्तर मिळणार नाही. माझ्याकडे पोस्टाच्या

पावतीचे नंबर आहेत ते मी आपणास देतो. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक महामंडळाने ही निवेदने पाठविली आहे. एक निवेदन शिक्षण मंत्र्यांना पावती क्रमांक २०३४ या पावतीने रजिस्टर्ड केले आहे व दुसरे २०३१ या क्रमांकाच्या पावतीने ग्रामविकास मंत्र्यांना निवेदन पाठविले आहे. पोस्टाच्या पावतीचे नंबर मी आपल्या सोबत आणले आहेत. तेव्हा निवेदने नाहीत याच्या आधारावर उत्तर देण्याऐवजी हा प्रश्न तुर्त राखून ठेवावा. कारण रजिस्टर पोस्टाच्या पावत्या माझ्याकडे आहेत.

**प्रा. जावेद खान :** डिपार्टमेंट को मिला नही है.

**श्री.बी.टी.देशमुख :** निवेदने रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली आहेत. शिक्षण मंत्र्यांना व ग्रामविकास मंत्र्यांना ही निवेदने पाठविली असून दोघांच्याही पावत्यांचे नंबर माझ्याकडे आहेत. मी आपल्याला ते नंबर देतो.

**The Chairman :** The Hon'ble Minister received it and perhaps it may have been misplaced.

**सभापती :** पावती आहे की नाही हा भाग बाजूला ठेवा. मुख्य प्रश्न कंडोन करण्याचा असून त्याबाबत मा.सदस्यांनी प्रश्न विचारावे आणि त्याचे उत्तर 'नाही' असे आले तर काय करावयाचे हे नंतर ठरविता येईल.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, काही जनपद सभांबाबत कंडोन केलेले आहे, परंतु काहींच्या मते त्यामुळे पेन्शनमध्ये फरक पडतो. तेव्हा शिक्षकांच्या पन्शनबाबत जो भेदाभेद आहे तो नष्ट करण्याच्या दृष्टीने शासन आदेश देईल काय!

**श्री.पु.ब.सोमवंशी :** यासंबंधीची माहिती शासकीय स्तरावर संकलित केली आहे. अमरावती जिल्ह्यातील २९४ प्रकरणामध्ये शिक्षकांची सेवा क्षमापित करावयाची आहे. ही प्रकरणे अनेक वर्षापासून पडली आहेत. विशेषतः जिल्हा परिषदा ज्यावेळी आल्या त्यावेळी प्रशिक्षणाकरीता पाठविलेल्या शिक्षकांच्या सेवा खंडित धरीत असत. तेव्हा हा जो काळ आहे तो क्षमापित करावयाचा आहे. हा क्षमापित काळ खाजगी प्राथमिक शिक्षक संस्थातील शिक्षकांबाबत नगरपरिषदांच्या प्राथमिक शिक्षकांबाबत क्षमापित झाला असून त्या शिक्षकांना लाभ झालेला आहे. परंतु जून्या जनपद कालीन काही शिक्षकांचा प्रश्न गेली २५ वर्षे शासनाकडे पडून आहे. त्याचा निर्णय व्हावयाचा आहे.

**प्रा. जावेद खान :** जल्दी से जल्दी सरकार इसके उपर फैसला करेगी. पूरी इन्फरमेशन नहीं आई है, इसके लिए रूका हुआ है."

**१६२.** "**जनपद कालीन शिक्षकांना प्रशिक्षणापूर्वीचा खंडीत सेवाकाळ कंडोन करण्याबाबत**" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २५५६ हा मंगळवार, दिनांक १४ जानेवारी १९८६ रोजी सभागृहामध्ये पुन्हा उत्तरासाठी आला व त्याला देण्यात आलेली उत्तरे ही सकारात्मक होती. शब्दशः पुढीलप्रमाणेः-

"* २५५६. **सर्वश्री प्र.य.दातार,बी.टी.देशमुख व पु.ब.सोमवंशीः** ता.प्र.क्र.५१४ ला दिनांक २४ जून १९८५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय -

(१) जनपद सभेमधील शिक्षकांच्या प्रशिक्षणापूर्वीच्या सेवाकाळामध्ये पडलेला खंड कंडोन करण्याबाबतच्या विचाराधीन प्रश्नावर शासनाचा निर्णय झालेला आहे काय;

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय;

(३) अद्यापि निर्णय झालेला नसल्यास,विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री.रामचंद्र पाटील, प्रा.राम मेघे :** यांच्याकरिता : (१) होय.

(२) याबाबत शासनाने असा निर्णय घेतला आहे की, जनपदकालीन प्राथमिक शिक्षकांच्या सेवेमध्ये जे खंड पडलेले आहेत ते सेवानिवृत्ती वेतनासाठी क्षमापित करण्यात यावेत व त्यानुसार सेवानिवृत्ती वेतन तसेच उपदान सुधारीत करण्यात यावेत. मात्र यामुळे सेवानिवृत्ती वेतनात जो फरक पडेल तो पुर्वलक्षी प्रभावाने दि.१-४-१९८४ पासून देण्यात यावा.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : पहिले अधिवेशन १९८६ : मंगळवार, दिनांक १४ जानेवारी १९८६ : अधिकृत प्रतिवेदन, खंड ७५, क्रमांक ७, पृष्ठ ३ - ४)*

**१६३.** "**जनपदकालीन शिक्षकांना प्रशिक्षणापूर्वीचा खंडित सेवाकाळ क्षमापित (कंडोन) करण्याबाबत**" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ५३०१ हा शुक्रवार, दिनांक २० जून १९८६ रोजी पुन्हा सभागृहामध्ये उत्तरासाठी आला. हा प्रश्न सभागृहात चर्चेला येण्यापूर्वी शिक्षणमंत्री प्रा.राम मेघे यांनी मला सभागृहाच्या लॉबीमध्ये बाहेर बोलाविले. प्रा.राम मेघे आणि मी एकाच संस्थेत काम करीत होतो. ते मंत्री होण्याच्या अगोदर आम्ही एकत्र बसून सभागृहामध्ये प्रश्न लावत होतो. त्यांनी बाहेर बोलावून मला असे सांगितले की, "बी.टी.!, तुम्ही हा प्रश्न लावून धरला ही चांगली गोष्ट झालेली आहे. काही जनपदांनी खंडित सेवाकाळ क्षमापित करण्याचा निर्णय घेतला व काही जनपदांनी असा निर्णय घेतला नाही. त्यामुळे या शिक्षकांना सेवानिवृत्तीवेतनामध्ये फार मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. वस्तुतः यामध्ये त्या शिक्षकांचा काहीही दोष नसतांना त्यांना हे नुकसान सहन करावे लागत आहे. आता आम्ही याबाबतीत सकारात्मक निर्णय घेतला असून यापुढे तक्रार करायला जागा राहणार नाही." योग्य निर्णय घेतल्याबद्दल मी शिक्षणमंत्र्यांचे आभार मानले. त्यादिवशी प्रश्नाला शासनातर्फे देण्यात आलेली उत्तरे सकारात्मक होती. शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"* **५३०१. सर्वश्री पु.ब. सोमवंशी, बी.टी. देशमुख, प्र.य. दातार, दे.मा. कराळे, दत्ता मेघे व भाई बंदरकर :** तारांकित प्रश्न क्रमांक २५५६ ला दिनांक १४ जानेवारी १९८६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील कायः-

(१) जनपद सभाकालीन शिक्षकांच्या प्रशिक्षणापूर्वीच्या सेवाकाळामध्ये पडलेला खंड क्षमापित (कंडोन) करण्याबाबतच्या विचाराधीन प्रश्नावर शासनाचे आदेश निर्गमित झाले, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे;

(३) अद्यापि निर्णय झाला नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्रीमती चंद्रिका केनिया, प्रा. राम मेघे** यांच्याकरिता :

(१) होय.

(२) जनपदकालीन प्राथमिक शिक्षकांच्या सेवेमध्ये जे खंड पडलेले आहेत ते सेवानिवृत्ती वेतनासाठी क्षमापित करण्यात यावेत व त्यानुसार सेवानिवृत्ती वेतन तसेच उपदान सुधारित करण्यात यावे. मात्र यामुळे सेवानिवृत्ती वेतनात जो फरक पडेल तो पूर्वलक्षी प्रभावाने दिनांक १ एप्रिल १९८४ पासून देण्यात यावा असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : तिसरे अधिवेशन १९८६ शुक्रवार, दिनांक २० जून १९८६ : अधिकृत प्रतिवेदन, खंड ७७, क्रमांक ५, पृष्ठ ९)*

**१६४.** विधानमंडळाच्या दोनही सभागृहांच्या समित्या ह्या वर्षभर कार्यरत असतात. त्यापैकी काही समित्या ह्या फक्त विधानपरिषद सदस्यांच्या असतात तर काही समित्या ह्या फक्त विधानसभा सदस्यांच्या असतात. दोनही सभागृहांची संयुक्त समिती ही दोन सभागृहांच्या सदस्यांची मिळून बनलेली असते. माझ्या विधानपरिषदेतील पाचव्या कार्यकाळामध्ये मी अशा एका संयुक्त समितीवर विधापरिषदेतर्फे सदस्य म्हणून नामित झालो होतो व त्या समितीवर पाटण विधानसभा मतदार संघाचे सदस्य श्री.शंभुराज देसाई हे विधानसभा सदस्य म्हणून विधानसभेतर्फे नामित झालेले होते. या संयुक्त समितीच्या एका बैठकीमध्ये समितीच्या दौऱ्याचा कार्यक्रम ठरवित असतांना पाटण येथे समितीची बैठक ठेवावी असा विचार पुढे आला. व्यक्तिशः मला पाटण विषयी वेगवेगळ्या कारणांनी उत्सुकता होती. **पहिले कारण असे की,** संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या रेट्याखाली त्यावेळेला पश्चिम महाराष्ट्रात १९५७ च्या निवडणुकीमध्ये सत्ताधारी पक्ष हा प्रचंड तणावात असतांना श्री.बाळासाहेब देसाई हे त्या मतदार संघातून अविरोध निवडून आले होते. **दुसरे कारण असे की,** १२०० रूपयांच्या आत वार्षिक उत्पन्न ज्या पालकांचे आहे त्या पालकांच्या पाल्यांना सर्व स्तरावरील शिक्षण शुल्क माफ करणारे श्री.बाळासाहेब देसाई हे नेते होते. **तिसरे कारण असे की,** मी विदर्भ महाविद्यालयाच्या छात्रसंघाचा अध्यक्ष असतांना इतर विषयांसोबत आणखी चार विषयांमध्ये पदव्युत्तर शिक्षणाचे वर्ग सुरू करावे म्हणून आम्ही मागणी केली होती. त्यावेळी शिक्षणमंत्री या नात्याने फक्त या एकाच कामासाठी विदर्भ महाविद्यालयाला त्यांनी भेट दिली होती व या कामी खूपच मदत केली होती.

**१६५.** आमच्या या संयुक्त समितीची बैठक सातारा जिल्ह्यातील पाटण मतदारसंघामध्ये असलेल्या मरळी येथील श्री.बाळासाहेब देसाई फाऊंडेशनच्या परिसरामध्ये झाली. स्वाभाविकपणे संयुक्त समितीच्या वैधानिक कामकाजाबरोबर श्री.बाळासाहेब देसाई यांच्या आठवणी हाही एक अनौपचारिक कार्यक्रम त्यावेळेला पार पडला. श्री.बाळासाहेब देसाई फाऊंडेशनच्या त्या सभागृहात अनेक नवे-जुने लोक, काही बाळासाहेबांच्या पिढीतील व काही नंतरच्या पिढीचे, बाळासाहेबांच्या आठवणी सांगत होते. शेवटी या चर्चेत मलाही एक आठवण सांगावयाची आहे असे मी शंभूराज देसाईंना सांगितले. मी जी आठवण सांगितली ती अशी की, "महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री या नात्याने १२०० रुपयांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या पालकांच्या पाल्यांना फी माफी करण्याचा निर्णय श्री.बाळासाहेब देसाई यांनी घेतला म्हणून आम्ही त्यावेळेला विदर्भ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी श्री.बाळासाहेब देसाई यांचा फोटो खुर्चीमध्ये ठेवून विदर्भ महाविद्यालयापासून

तर त्यावेळेच्या डोळे गार्डनपर्यंत (आजचा पंचवटी चौक) त्यांच्या फोटोची मिरवणूक काढली होती." माझे भाषण चालू असतांना श्री.शंभूराज देसाई यांनी त्यांच्या स्वीय सहायकाला बोलावून कार्यालयातून एका ग्रंथाची प्रत आणण्यास सांगितले व माझे भाषण संपल्याबरोबर त्यांनी मला ती प्रत त्या सभागृहातच भेट म्हणून देत असल्याचे जाहीर केले. त्यांनी भेट दिलेला हा ग्रंथ म्हणजे "**लोकनायक बाळासाहेब देसाई**" या मथळ्याचे श्री.वसंत बहुलेकर यांनी लिहिलेले जवळ जवळ ४०० पृष्ठांचे श्री.बाळासाहेब देसाई यांचे चरित्र होय. या ग्रंथाला श्री.रणजित देसाई यांची प्रस्तावना असून श्री.शंभूराज देसाई हे त्याचे प्रकाशक आहेत. ग्रंथाच्या पहिल्याच पानावर पुढीलप्रमाणे मजकूर नमूद होता.:-"मा.आमदार श्री.शंभूराज शिवाजीराव देसाई, अध्यक्ष, लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी उद्योग समूह, दौलतनगर (मरळी) ता.पाटण जि.सातारा-४१५२११ यांचेकडून सप्रेम भेट - दिनांक ३ फेब्रुवारी २००६"

**१६६.** राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्त्वांत नमूद असलेली मार्गदर्शक तत्त्वे लक्षात घेऊन शिक्षणमंत्री या नात्याने श्री.बाळासाहेब देसाई यांनी जो फी माफीचा क्रांतिकारक निर्णय घेतला होता, तो निर्णय घेतानांचे व तो निर्णय घेतल्यानंतरचे बरेच आणखी तपशील या ग्रंथामध्ये नमूद आहेत. त्यातील काही महत्त्वाचे तपशील पुढीलप्रमाणे :-

(१) त्यावेळेला जीवराज मेहता हे मंत्रीमंडळामध्ये अर्थमंत्री होते व त्यांचा त्या निर्णयाला विरोध होता. मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये "त्यावेळी महाराष्ट्राचे अर्थमंत्री जीवराज मेहता होते : ते म्हणाले, "बाळासाहेब इट इज नॉट ओन्ली इंपॉसिबल बट नॉट अल्सो फीझिबल." "ते अशक्य आहे एवढेच नव्हे तर अव्यवहारी आहे. व्यवहाराला (आर्थिक) धरून नाही." "ते सर्व सभागृह बाळासाहेबांच्या धोरणाशी सहमत होत नव्हते आणि त्यांना मात्र अर्जुनाला दिसत असणाऱ्या झाडावरील पक्षाचा फक्त डोळा दिसत होता तसे एकाग्रतेने गरीब शेतकऱ्यांच्या लाखो मुलांचे भवितव्य डोळ्यासमोर दिसत होते. याचे कारण बाळासाहेब स्वतः कष्टकरी कुटुंबात जन्मले होते." *(पृष्ठ १५२)*

(२) "बाळासाहेबांच्या या निर्णयानंतर पुढे पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंनी त्यांची पाठ थोपटली. त्यावेळचा संवाद अत्यंत भारावून टाकणारा आहे. नेहरू म्हणाले, "तुम्ही घेतलेला निर्णय क्रांतिकारी आहे. आजपर्यंत कोणत्याही राज्याच्या शिक्षणमंत्र्यांनी एवढा धाडसी निर्णय घेतला नाही. परंतु तुम्ही मला हे सांगा की याची आर्थिक बाजू कशी सोडवली?" *(पृष्ठ १५३)*

(३) "बाळासाहेबांनी नम्रपणाने उत्तर दिले, "आजपर्यंत ग्रामीण शिक्षणावर महाराष्ट्राच्या वाट्याला असलेली लाखो रुपयांची रक्कम खर्च झालेली नाही हे मी अगोदर तपासून पाहिले आणि ही रक्कम गरीब शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणावर खर्च करण्यास काहीही हरकत नाही असा दावा केला. आपण (पीजंट) उन्हातान्हात काबाडकष्ट करणाऱ्या गरीब शेतकऱ्यांच्या मुलांना वर उचलून घेतले पाहिजे, त्यांना शिक्षण दिले पाहिजे आणि नवसमाजनिर्मितीमध्येही त्यांचा उपयोग करून घेतला पाहिजे. मी स्वतःच याचे एक उत्तम उदाहरण आहे. मी एक गरीब शेतकऱ्याचाच मुलगा आहे." हे उत्तर ऐकून नेहरूंनी त्यांना शाबासकी म्हणून आलिंगन दिले होते." *(पृष्ठ १५३)*

**१६७.** भारतीय संविधान अंमलात आल्यानंतरच्या ५-१५ वर्षात राज्यनितीच्या मार्गदर्शक तत्त्वांत जे मार्गदर्शन करण्यात आले होते त्यानुसार राज्यकर्ते कारवाई करीत असत याची काही उदाहरणे वर नमूद केलेली आहेत. आज आता संविधान अंमलात येऊन त्याचा अमृत महोत्सव साजरा करण्याची स्थिती आलेली असतांना १२०० रुपयांच्या आत उत्पन्न असलेल्या पालकांच्या पाल्यांना सर्व स्तरावर फी माफी जाहीर करणारे श्री.बाळासाहेब देसाईंसारखे नेते दिसणेसुद्धा दुर्मिळ झालेले आहे. मध्यप्रदेशातून महाराष्ट्रात सामील झालेल्या काही जनपदसभांनी शिक्षकांचा खंडित सेवाकाळ क्षमापित केला व काहींनी तो केला नाही त्यामुळे सेवानिवृत्ती वेतनात शिक्षकांना खूप मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. हे लक्षात घेऊन "निवेदने मिळाल्याच्या पावत्यांचे नंबर सांगणे बाजूला ठेवा व सेवेतील खंड क्षमापित करणार की नाही? हा थेट प्रश्न विचारण्याला सुरुवात करा" असे सांगणारे जयंतराव टिळकांसारखे सभापती दिसणे दुर्मिळ झालेले आहे. "या शिक्षकांचा काहीही दोष नसतांना त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनात फार मोठी कपात केली जात आहे हे लक्षात घेऊन त्यांच्या सेवेतील खंड क्षमापित करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे" असे सभागृहात जाहीर करणारे प्रा.राम मेघे यांच्यासारखे शिक्षणमंत्री आजच्या काळात दिसणे दुर्मिळ झालेले आहे. आज १० टक्के कर्मचारी व शिक्षकांच्या वेतनातून कापून व १४ टक्के शासनातर्फे भांडवली बाजारात वळते करणारे राज्यकर्ते फार मोठ्या प्रमाणात उभे ठाकलेले आहेत. राज्यनितीच्या मार्गदर्शक तत्त्वांविषयीची परिस्थिती ही तर आणखीच उलट झालेली आहे.

**१६८.** पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष बिबेक देबरॉय यांनी दिनांक १४ ऑगस्ट २०२३ रोजीच्या **"MINT"** या इंग्रजी दैनिकात एक तपशीलवार लेख लिहून भारतीय संविधानाबद्दल अत्यंत आक्षेपार्ह विधाने केलेली आहेत. राज्यनितीच्या मार्गदर्शक तत्त्वांविषयीचे त्यांच्या लेखातील प्रतिपादन हे तर अत्यंत भयसूचक आहे. "If reforms are about markets and a refocused and reduced role for government, what sense do we make of the Directive Principles of State Policy?" असे विचार त्यांनी मांडलेले आहेत. प्रगती किंवा सुधारणा (reforms) म्हणजे शेअर बाजाराची प्रगती हे जर आपले ठरलेले आहे. त्याबाबतीत शासनाला नगण्य भूमिका पार पाडायची असेल तर मग राज्यनितीच्या मार्गदर्शक तत्त्वांना कार्य अर्थ आहे अशी ही विचारसरणी आहे. केशवानंद भारती खटल्यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिल्याप्रमाणे घटनेच्या मूळ संरचनेच्या (Basic Structure) विरोधात जाईल असा बदल करता येत नाही. श्री.बिबेक देबरॉय या लेखात असे मत मांडतात की, घटनेत दुरुस्ती केली आणि ती मूळ घटनेच्या विरोधात असेल तर सर्वोच्च न्यायालय ती घटनादुरुस्ती रद्दबातल करू शकते म्हणून आपण नवीन घटना तयार करणेच जास्त योग्य होईल. त्यांच्या लेखाचा मथळाच मुळात "There is a case for 'we the people' to embrace a new Constitution" असा आहे आणि या लेखात पुढे त्यांनी "We the People have to give ourselves a new Constitution" असे प्रतिपादन केलेले आहे.

**१६९.** एका बाजूला थोर 'विचारवंत' भारतीय संविधान बदलवून टाकण्याची भाषा करीत आहेत. त्याच वेळेला महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण विभागातील काही अधिकारी, उच्च शिक्षण संचालक व अनेक ठिकाणचे सहसंचालक अशा अनेक 'अविचारवंतां'ची टोळधाड कोणताही संविधान बदल न करता संविधानाला सुरुंग लावण्याचा अनिर्बंध प्रयत्न करीत आहेत व त्यासाठी त्यांनी मा.उच्च न्यायालयाच्या व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांची अवहेलना करण्याचा अघोरी मार्ग निवडला आहे. या अघोरी मार्गाच्या वापरामुळे महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्रात एक फार मोठी अराजकाची स्थिती निर्माण झाली. ही परिस्थिती गेल्या दोन-चार वर्षात निर्माण झाली असून या अघोरी मार्गाचा वापर करण्यात आल्याची अनेक कुप्रसिद्ध प्रकरणे प्रख्यात झालेली आहेत. त्यातील नमुन्या दाखल काही प्रकरणे पुढीलप्रमाणे सांगता येतील. :-

**(१)** मा.उच्च न्यायालयाने २७१९/२०२० या प्रकरणात दिनांक ९ फेब्रुवारी २०२१ रोजी दिलेल्या एका निर्णयाला एका सहसंचालकांनी दिनांक १२ मे २०२१ रोजी एक आदेश काढून स्थगिती *(188/21)* देण्याचा अभूतपूर्व अपप्रकार महाराष्ट्राने पाहिला. सारांश काय तर संविधानात कोणताही बदल न करता जळगावच्या सहसंचालकांनी मा.सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार वापरले होते. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला पत्रकार परिषद घेऊन त्या सहसंचालकाच्या हकालपट्टीची मागणी करावी लागली. हकालपट्टी झाली व अवमान याचिकेनंतर मूळ निर्णयाची अंमलबजावणी झाली.

**(२)** मा.सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेले विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनचे श्रेष्ठत्व महाराष्ट्राच्या मा.राज्यपालांनी व मंत्रीमंडळाने मान्य केले असतांना तसे करण्यास आढ्यताखोरपणे उच्च शिक्षण विभागातील अधिकारी नकार देतात हा शिरजोरपणाचा प्रकार आहे. "९० टक्के जागा भरल्याच पाहिजेत" तसेच "निवड समित्या ह्या रेग्युलेशनप्रमाणेच असल्या पाहिजेत" या मा.सर्वोच्च न्यायालयाने निश्चित करून दिलेल्या कायद्याच्या अंतिम अर्थाचे पालन न करणे हे असंवैधानिक व घटनाबाह्य कृत्य होय. असत्य माहिती दाखल करून १३२० कोटी रुपये केंद्राकडून मिळवून भारताच्या मा.राष्ट्रपतींची, केंद्रीय मंत्रीमंडळाची व राज्य मंत्रीमंडळाची या अधिकाऱ्यांनी उघडउघड फसवणूक करणे हे अत्यंत लज्जास्पद कृत्य होय.

**(३) "जुलै २००९ पूर्वी ज्यांनी एम.फील. पदवी धारण केली आहे, अशा शिक्षकाला नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून सेवा धरून आश्वासित प्रगती योजनेसह इतर सर्व लाभ द्यावे लागतील"** सन २०१० मधील पहिल्या व दुसऱ्या मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयांनी हा कायद्याचा अंतिम अर्थ निश्चित करून दिला. त्यावर मा.सर्वोच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब झाले. त्याला धरून दिनांक २४ फेब्रुवारी २०१७ रोजी मा.नागपूर खंडपीठाने तत्सम निर्णय दिला. त्यापूर्वी अनेक खंडपीठांनी तसेच निर्णय दिलेले असल्यामुळे सरकारी वकिल निर्णयाशी सहमत झाले. तरीही उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्याच्या सूचना दिल्या. सर्वोच्च न्यायालयातील दिल्लीस्थित सरकारी वकिलांनी हे प्रकरण विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्याच्या लायकीचे नाही तेव्हा विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्याच्या सूचना मागे घ्याव्यात अशी विभागाला विनंती केली पण उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपला राजहट्ट कायम ठेवला.

**(४)** विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल झाली व फेटाळल्या गेली. सर्वोच्च न्यायालयाने अशी आगंतुक (uncalled for) प्रकरणे इथे आणत जाऊ

नका असे ताशेरे ओढले. राज्यशासनाकडून आगंतुक प्रकरणे दाखल होण्याची संख्या फार वाढली आहे. राज्याच्या मुख्य सचिवांनी याबाबत कारवाई करावी, असे मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले. राज्याच्या मुख्य सचिवांनी तसे परिपत्रक काढले पण उच्च शिक्षण विभागातील अधिकारी दुरुस्त व्हायला तयार नाहीत. मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाने धोरणात्मक आदेश दिल्यानंतर २०२३ पर्यंत त्याबाबतचा धोरणात्मक निर्णय अजूनही निर्गमित होऊ नये ही अत्यंत लाजीरवाणी गोष्ट आहे.

**(५)** "**जुलै २००९ पूर्वी ज्यांनी एम.फील. पदवी धारण केली आहे, अशा शिक्षकाला नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून सेवा धरून आश्वासित प्रगती योजनेसह इतर सर्व लाभ द्यावे लागतील**" असा मा.उच्च न्यायालयाचा आदेश आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयावर शिक्कामोर्तब केले आहे असे असतांना महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाशी दिनांक २० ऑक्टोबर २०२३ रोजी उच्च शिक्षण संचालकांनी चर्चा केली. सारा विषय समजून घेतला व दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ रोजी "(२) **ज्यांनी सेवेत असताना एम.फील. अर्हता धारण केली असेल, त्यांना सदर अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ देय राहतील.**" असे आदेश काढले.

**(६)** त्यांची ही घोडचूक दुरुस्त करण्यासाठी मंत्रालयातील उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याने दिनांक ३० नोव्हेंबर २०२३ रोजी एक वेगळा आदेश काढला त्यात "**(ब) अध्यापकांनी सेवेत असताना एम.फील. अर्हता धारण केली असेल तर, विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेली मान्यता विचारात घेऊन, विद्यापीठाने संबंधित उमेदवाराला ज्या दिनांकापासून परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिली असेल अशा दिनांकापासून त्याला कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होतील.**" असे नमूद करून आणखी महाघोडचूक करून ठेवली.

**(७)** उच्च शिक्षण संचालकांचे आदेश वेगळे, उपसचिवांचे आदेश त्याहून वेगळे आणि दोघांनीही मा.उच्च न्यायालयाचा व मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय वाचलाच नाही. वाचला असल्यास त्यांना तो समजलाच नाही. साधारणपणे लिहिता वाचता येणाऱ्या व्यक्तिनांच उच्च शिक्षण संचालक व उपसचिव, उच्च शिक्षण या पदांवर नेमले जाते ना? मग एवढ्या मोठ्या पदावर काम करणाऱ्या या अधिकाऱ्यांना न्यायालयाच्या निर्णयातील दोन ओळी वाचता येत नसतील तर त्यांचा उपयोग काय?

**(८)** मा.सर्वोच्च न्यायालयाने कन्फर्म केलेल्या मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयात "**(i) या सर्व शिक्षकांचे बेकायदेशीररीत्या कापलेले ७१ दिवसांचे वेतन त्यांना परत करा (ii) ते विलंबाने परत केल्याबद्दल देय दिनांकापासून अदायगीच्या दिनांकापर्यंत त्यावर आठ टक्के व्याज अदा करा**" असे आदेशित केले. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे या दोनही रकमा त्यांना परत करा असा शासननिर्णय दिनांक ७ डिसेंबर २०२० रोजी निघाला. तर मा.सर्वोच्च न्यायालयाचे पूनर्विलोकनाचे अधिकार वापरून उच्च न्यायालयाचा निर्णय व राज्यशासनाचा शासननिर्णय आपल्या अधिकारात उच्च शिक्षण संचालकांनी दुरुस्त केला. दिनांक ९ डिसेंबर २०२० रोजी "विलंबाबद्दल ८ टक्के रक्कम देण्याची बाब वगळून, फक्त ७१ दिवसांचे कापलेले वेतन परत करा" असे आदेश उच्च शिक्षण संचालकांनी आपल्या सहसंचालकांना दिले. **मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयात व शासननिर्णयात दुरुस्ती करण्याचा आपल्याला अधिकार नाही एवढीही अक्कल संचालक पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला नसेल तर त्यांना ते पद भूषविण्याचा अधिकार कसा काय प्राप्त होतो?** देय दिनांकापासून अदायगीच्या दिनांकापर्यंत मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे आठ टक्क्याची रक्कम उच्च शिक्षण संचालकांकडून आजही अदा करण्यात आलेली नाही.

**(९)** दिनांक १२ ऑगस्ट २०२२ रोजी उच्च शिक्षण संचालकांनी जो आदेश काढला त्यामध्ये त्यांनी अध्यापकनिहाय **देय दिनांकापासून प्रत्यक्ष वेतन अदायगी झालेल्या दिनांकापर्यंत 8% p.a. व्याजाच्या रकमेची मागणी आजच संचालनालयाला सादर करा** असे आपल्या आदेशात नमूद केले. पण या रकमा या शिक्षकांना पूर्णांशाने अदा करावयाच्या नाहीत. त्यात फार मोठ्या प्रमाणात कपात करावयाची असे त्यांनी मनाशी ठरवून टाकले होते. त्यासाठी अत्यंत अभद्र मार्गाचा त्यांनी वापर केला. **आपल्या आदेशात मा.उच्च न्यायालयाचा निर्णय उद्धृत करतांना त्यांनी त्यातील एक शब्द गाळून टाकला. त्यामुळे मनमानी कपात करण्याचे समाधान त्यांनी मिळविले. उच्च शिक्षण संचालक या नात्याने आपल्या आदेशात मा.उच्च न्यायालयाचा निर्णय उद्धृत करतांना न्यायालयाच्या निर्णयातील शब्द वगळून टाकण्याचे कृत्य हे गुन्हेगारी स्वरूपाचे कृत्य आहे ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली नाही.**

**(१०)** मारुती दत्तात्रय पाटील प्रकरणात शासनाने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका (SLP) दिनांक १ जुलै २०१९ रोजी 'डिसमिस' झाली. त्यानंतर विजयकुमार रणपीसे प्रकरणात SLP दाखल करतांना "यापूर्वी तत्सम प्रकरण या न्यायालयात निकाली निघाले आहे काय?" या रकान्यापुढे "No similar matter is disposed of" अशी धडधडीत खोटी माहिती उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी शपथपत्रावर मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. एवढ्यावर हा खोटेपणा थांबला नाही तर "तत्सम प्रकरण या न्यायालयात प्रलंबित आहे काय?" हा रकाना भरतांना राजेश वसंतराव पांडे यांचे प्रकरण आपल्याच अधिकाऱ्यांच्या गैरवर्तनामुळे येथे 'पेंडींग' पडलेले आहे याची माहिती असतांना **"No similar matter is pending" अशी धडधडीत खोटी माहिती शपथपत्रासह सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. असा खोटारडेपणा एकापेक्षा जास्त प्रकरणात या अधिकाऱ्यांनी केल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. खोटेपणा उघडा पडल्याने त्या सर्व प्रकरणी 'डिसमिस' त्यांच्या नशिबी आले.**

**(११) सन २०२० ची याचिका क्रमांक LD-VC-CW No. 1045 of 2020** या प्रकरणात "**हा वादविषय संपुष्टात आला आहे असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. तुम्ही दोघेही तुमचे डोके चालवा (apply your mind) व त्याबाबत आठ दिवसात शपथपत्र दाखल करा" असे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक ३० ऑगस्ट २०२० रोजी पारित केले. "न्यायालयाच्या पूर्व निर्णयाच्या विरोधात तुम्ही काही निर्णय घेतल्यास त्याची भारी किंमत तुम्हाला मोजावी लागेल**" असेही या आदेशात नमूद आहे. न्यायालयाने निर्णय घेण्यासाठी दिलेली मुदत संपत आलेली होती. **न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे "वादविषय संपुष्टात आलेला आहे किंवा नाही" याबाबत प्रधान सचिव, उच्च शिक्षण व संचालक उच्च शिक्षण यांनी निर्णय न घेता पळ काढला. आपले डोके चालवून नामी उपाय शोधून काढला. एकट्या याचिकाकर्त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणारे शासनपत्र त्यांनी दिनांक १५ डिसेंबर २०२० रोजी निर्गमित केले व जुनी पेन्शन योजना लागू केली.**

**(१२) सन २०२० ची याचिका क्रमांक ST. No.9649** दिनांक १२ ऑक्टोबर २०२० रोजी सुनावणीला आली तेव्हा त्याच त्या विषयावर लोकांना पुन्हा पुन्हा याचिका दाखल करायला उच्च शिक्षण विभाग भाग पाडत आहे, ही गोष्ट मा.उच्च न्यायालयाच्या लक्षात आल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने असे आदेश पारित केले की, "**प्रधान सचिव, उच्च शिक्षण व संचालक, उच्च शिक्षण यांनी दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी W.P. 13166 of 2017 या प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय विचारात घ्यावा. त्याचबरोबर विशेष अनुमती याचिका क्रमांक (सी.ए.) १३०९/२०२० या प्रकरणामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णयसुद्धा विचारात घ्यावा.** हे दोनही निर्णय विचारात घेऊन उच्च शिक्षण विभागाने घेतलेला अंतिम निर्णय **नमूद असलेले शपथपत्र मा.उच्च न्यायालयात सादर करावे." प्रधान सचिव उच्च शिक्षण व संचालक उच्च शिक्षण हे क्रमांक एक व दोनचे प्रतिवादी होते. उच्च न्यायालयाने धोरणात्मक निर्णय लक्षात आणून दिला व अंतिम निर्णय घेण्याचे आदेश दिले असतांना विभागाने एकट्या याचिकाकर्त्या पुरतेच प्रकरण मंजूर केले, याचिकाकर्त्याला जुनी पेन्शन योजना लागू केली व धोरणात्मक निर्णय न घेता पळ काढला.**

**(१३) तत्सम विषयावरील तीन विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या असतांना ही बाब सर्वोच्च न्यायालयात 'पेंडींग' आहे अशी सरळ सरळ असत्य माहिती मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर W.P.No. 4289 of 2019 च्या सुनावणीच्या वेळी सहसंचालकांनी ठेवणे, त्या आधारावर तेथे प्रकरण 'पेंडींग' पाडण्यात तात्पुरते यश मिळविणे, हा अव्वल दर्जाचा लुच्चेपणा तर आहेच पण मिळालेल्या या तात्पुरत्या यशाचा झेंडा हाती घेऊन इतर खंडपीठासमोर प्रकरण तात्पुरते 'पेंडींग' पाडण्यात यश मिळविणे, हा उच्च शिक्षण विभागाचे नेतृत्त्व करणाऱ्या या अधिकाऱ्यांच्या लुच्चेपणाचा कडेलोट म्हणून सांगता येईल. अर्थात हे यश तात्पुरतेच होते.**

**१७०.** महाराष्ट्र राज्याच्या उच्च शिक्षण विभागामध्ये चालू असलेले हे अराजक दिनांक २१ जानेवारी २०२४ रोजीच्या बैठकीत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने संमत केलेल्या, ११८ परिच्छेदांच्या एका तपशीलवार ठरावात व्यवस्थितपणे शब्दबद्ध करण्यात आलेले आहे. मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाचा अवमान करणारी या अधिकाऱ्यांची अपकृत्ये या ठरावातूनच मी पूर्वपरिच्छेदात नमूद केलेली आहेत. मा.उच्च शिक्षणमंत्री, मा.उच्च शिक्षण सचिव व उच्च शिक्षण संचालक यांना या ठरावाच्या प्रती सादर करून एक महिन्याचा काळ होऊन गेलेला आहे पण त्याबाबत शासनाकडून काहीच कृती होत नाही यावरून काय ते समजून घ्यायचे व जे आपल्याला समजले ते लोकांना समजावून सांगायचे एवढाच उपाय उच्च शिक्षण क्षेत्राच्या हाती शिल्लक उरतो.

**१७१.** महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्रावर आलेले हे अभूतपूर्व संकट आहे. भारतीय संविधानात मा.उच्च व मा.सर्वोच्च न्यायालयाचे स्थान काय आहे हे या क्षेत्रातील अधिकाऱ्यांना ठाऊक नाही असे मानण्याचे कारण नाही. भारतीय

संविधानाच्या खंड १२४ अन्वये भारतामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली आहे.

**(A)** संविधानाच्या खंड १२९ अन्वये "Supreme Court to be a court of record" असे या न्यायालयाचे वर्णन केलेले आहे ते शब्दशः पुढीलप्रमाणे :- **"129. Supreme Court to be a court of record. -** The Supreme Court shall be a court of record and shall have all the powers of such a court including the power to punish for contempt of itself."

**(B)** भारतीय संविधानाच्या खंड २१४ अन्वये प्रत्येक राज्यामध्ये उच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली असून संविधानाच्या खंड २१५ अन्वये "Every High Court shall be a court of record" असे त्याचे वर्णन करण्यात आलेले आहे. भारतीय संविधानातील खंड २१५ शब्दशः पुढीलप्रमाणेः- **"215. High Courts to be courts of record. -** Every High Court shall be a court of record and shall have all the powers of such a court including the power to punish for contempt of itself."

**(C)** महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालनालयातर्फे भारतीय संविधानाचे अधिकृत मराठी भाषांतर प्रकाशित करण्यात आले असून सन १९९६ मध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या मराठी आवृत्तीमध्ये कलम १२९ शब्दशः पुढीलप्रमाणे आहेः-

"१२९. **सर्वोच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय असेल** आणि त्यास आपल्या अवमानाबद्दल शिक्षा करण्याच्या शक्तीसह अशा न्यायालयाच्या सर्व शक्ती असतील." याच मराठी आवृत्तीमध्ये उच्च न्यायालयाविषयी खंड २१५ शब्दशः पुढीलप्रमाणे आहे.:-

"२१५. **प्रत्येक उच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय असेल** आणि त्यास आपल्या अवमानाबद्दल शिक्षा करण्याच्या शक्तीसह अशा न्यायालयाच्या सर्व शक्ती असतील."

**१७२.** मा.उच्च न्यायालयाला अभिलेख न्यायालयाचा (Courts of Record) दर्जा असतो याचा निश्चित अर्थ काय आहे? हे यापूर्वी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायमूर्तींच्या पूर्ण खंडपीठाने "श्री.नरेश मिरजकर विरुद्ध महाराष्ट्र शासन" या प्रकरणात निश्चित करून दिले आहे. ते पुढील शब्दात :-

**"Court of Record"**

"Constitution of India, article 215."

**(1)** A court of record envelops all such powers whose acts and proceedings are to be enrolled in a **perpetual memorial and testimony.**

**(2) A court of record is undoubtedly a superior court** which is itself competent to determine the scope of its jurisdiction. The High Court as a court of record, as envisaged in article 215 of the Constitution, must have inherent powers to correct the records.

**(3) The High Court, as a court of record, has a duty to itself to keep all its records correctly** and in accordance with law. Hence,

**(4)** if any apparent error is noticed by the High Court in respect of any orders passed by it the **High Court has not only power, but a duty to correct it.**

**(5) The High Court's power in that regard is plenary.** (In *Naresh Shridhar Mirajkar v. State of Maharashtra,* AIR 1967 SC 1 : 1966 (2) SCA 363: (1966) 3 SCR 744 a nine-Judge Bench of the Supreme Court has recognised the aforesaid superior status of the High Court **as a court of plenary jurisdiction being a court of record.)**

**१७३.** दुसऱ्या एका प्रकरणात (M.M.Thomas Vs. State of Kerala) मा.सर्वोच्च न्यायालयाने याबाबत आणखी तपशीलवारपणे ही बाब पुढील शब्दात मांडली आहे. :-

"In Halsbury's Laws of England (4th Edn., Vol. 10, para 713) it is stated thus :

**(1) "The chief distinctions between superior and inferior courts are found in connection with jurisdiction. *Prima facie,*** no matter is deemed to be beyond the jurisdiction of a superior court unless it is expressly shown to be so, while nothing is within the jurisdiction of an inferior court unless it is expressly shown on the face of the proceedings that the particular matter is within the cognizance of the particular court.

**(2)** An objection to the jurisdiction of one of the **superior courts of general jurisdiction** must show what other court has jurisdiction, so as to make it clear that the exercise by the superior court of its general jurisdiction is unnecessary.

**(3) The High Court, for example, is a court of universal jurisdiction and superintendency in certain classes of actions,** and cannot be deprived of its ascendancy by showing that some other court could have entertained the particular action." *(M.M.Thomas v. State of Kerala,* (2000) 1 SCC 666 (672, 673) : 2000 (1) Supreme 1 :AIR 2000 SC 540 : JT 2000 (1) SC 26 : 2000 (1) SCALE 14 : 2000 (1) SLT 180: 2000 (2) SRJ 86.")

**१७४.** दिल्ली विद्यापीठाच्या विधी विभागाचे माजी अधिष्ठाता व विधी विभागातील सेवानिवृत्त 'प्रोफेसर' श्री.व्ही.एन.शुक्ला लिखित "Constitution of India" हे पुस्तक या क्षेत्रातील प्रमाणभूत वाङ्मय मानल्या जाते. सदरहू पुस्तकाच्या सातव्या आवृत्तीमध्ये पृष्ठ ३९२ वर भारतीय संविधानातील उच्च न्यायालया विषयीचे कलम २१५ त्यांनी जसेच्या तसे उद्धृत केलेले असून त्यानंतर "Court of Record" या शब्दांचा अर्थ काय होतो? हे पुढील शब्दात नमूद केलेले आहे. :-

**"215. High Courts to be courts of record. -** Every High Court shall be a court of record and shall have all the powers of such a court including the power to punish for contempt of itself."

"Every High Court is declared to be a court of record. **There are two characteristics of a court of record** : (i) the records of such a court are admitted **to be of evidentiary value and they cannot be questioned when produced in a court,** and (ii) it has the power to punish for contempt of itself. The power to punish for contempt of court is a special power derived from Article 215 and not from any Contempt of Courts Act. No Act of Legislature could take away that power and confer it afresh on the High Court by virtue of its own authority. The High Courts' jurisdiction to try and punish for contempt of court includes all necessary and incidental powers to effectuate that jurisdiction."

**१७५.** उच्च न्यायालयाला 'अभिलेख न्यायालय' असा दर्जा असल्यामुळे या न्यायालयाचा प्रत्येक निर्णय समाविष्ट असलेला प्रत्येक अभिलेख अखंडीत व निरंतरपणे शाश्वत अभिलेख (perpetual memorial) समजल्या जातो व त्याला मजबूत पुरावा (evidentiary value) असे मूल्य असते व न्यायालयात त्या निर्णयाला नाकारले जाऊ शकत नाही. **घटनेतील या तरतुदींचा भंग करण्यामध्ये उच्च शिक्षण विभागातील अधिकारी व उच्च शिक्षण विभागाचे संचालक व सहसंचालक यांच्या यंत्रणा उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने कायम केले असले तरी उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अवहेलना करण्यात आघाडीवर असल्याचे दिसून येते. ही आघाडी इतकी जोरदार आहे की, त्यामुळे उच्च शिक्षण विभागात सर्वत्र अराजकाची परिस्थिती निर्माण झालेली आहे.** मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली नसेल तर त्या निर्णयाची अंमलबजावणी करणे विभागाला भाग असते असे स्थायी आदेश राज्याच्या मुख्य सचिवांनी, वित्त सचिवांनी व विधी सचिवांनी वारंवार काढले असले तरी उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अवहेलना करण्याचा निरंतर उद्योग उच्च शिक्षण विभागात व उच्च शिक्षण संचालनालयात सतत चालू आहे असे स्पष्टपणे दिसून येते. "उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करा" असा शासननिर्णय निघाला तरी उच्च शिक्षण संचालक आपल्या सहसंचालकांना आदेश देऊन त्यातील त्यांना सोयीचा असेल तेवढ्याच भागाची अंमलबजावणी करा, इतर भागाची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता नाही असे सांगतात. एका सहसंचालकांनी तर मा.उच्च न्यायालयाच्या एका निर्णयाला स्थगिती देण्याचा पराक्रम करून दाखविला. याचे पुरावे मा.उच्च शिक्षणमंत्र्यांना महाराष्ट्र प्राध्यापक महासंघातर्फे सादर करण्यात आलेले आहेत.

**१७६.** विधी व न्याय विभाग, वित्त विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग

या सर्व विभागांचे सचिव हे उच्च विद्याविभूषित असे भारतीय प्रशासन सेवेतील वरिष्ठ अधिकारी आहेत. या सान्या अधिकाऱ्यांना घटनेतील या सर्व तरतुदी ठाऊक आहेत.

### *विधी व न्याय विभागाचे आदेश*

**(A)** उपरोक्त सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना घटनेतील या सर्व तरतुदी ठाऊक होत्या व आहेत, हे नमूद करणारे पुरावे आता मी सादर करू इच्छितो. मा. सर्वोच्च न्यायालय तर सोडाच पण मा.उच्च न्यायालयाने आदेश पारित केल्यानंतर त्यासाठी कोणताही वेगळा शासननिर्णय वगैरे निघण्याची वाट न पाहता किंवा कोणाचाही सल्ला वगैरे न घेता त्याची अंमलबजावणी तावडतोबीने करावी असे आदेश वारंवार शासनातर्फे देण्यात आलेले आहेत. दिनांक २ एप्रिल २०१४ रोजी विधी व न्याय विभागाने "Action to be taken when the decision of High Court is adverse to the State and is not stayed by Hon'ble the Supreme Court of India" या विषयावर काढलेल्या स्थायी परिपत्रकामध्ये (No.: 820-2014/Misc./E Branch) असे नमूद केले आहे की, :-

"2. If the appeal/SLP is filed by the State against the order of the Hon'ble the High Court, but no stay is granted to the implementation and enforcement of the order of the Hon'ble the High Court, **such orders would have to be implemented failing which the concerned officer/department may face the action for contempt of Court.** The order against which no stay has been granted will have to be complied with/implemented subject to the final decision of the Hon'ble the Supreme Court." *(101/14)* या सर्व प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाचा स्थगनादेश तर नाहीच उलट मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाचे आदेश कायम केलेले आहेत.

### *वित्त विभागाचे आदेश*

**(B)** विधी व न्याय विभागाच्या परिपत्रकानंतर २० ऑक्टोबर २०१४ रोजी वित्त विभागाने "**न्यायालयीन प्रकरणे त्वरित निकाली काढणे व अवमान याचिकेसंदर्भात**" या मथळ्याचे एक स्थायी परिपत्रक (क्रमांक न्यायप्र २०१४/ प्र.क्र. ८९६/प्रशा १) निर्गमित केले असून त्या परिपत्रकामध्ये स्पष्टपणे असे नमूद केले आहे की, :-

"या संदर्भात सर्व विभागांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, अशा न्यायालयीन प्रकरणात वित्त विभागाने मांडलेली भूमिका / निर्णय संबधित विभागाने तातडीने याचिकाकर्त्यांना न्यायालयाने ठरवून दिलेल्या वेळेत कळवावा. **तसेच न्यायालयाने विशिष्ट मुदत घालून दिलेल्या प्रकरणांमध्ये मुदतीपूर्वीच यथोचित कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी, जेणेकरून अकारण अवमान याचिका दाखल होणार नाहीत.**" *(12/2015)*

### *मा. मुख्य सचिवांचे आदेश*

**(C)** "**न्यायालयीन प्रकरणे त्वरित निकाली काढण्याबाबत**" या विषयावर राज्याच्या मुख्य सचिवांच्या स्वाक्षरीने पुन्हा २८ ऑक्टोबर २०१४ रोजी वित्त विभागाने आणखी एक स्थायी परिपत्रक काढले असून त्या परिपत्रकात पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे. :-

"**परिपत्रक :** उपरोक्त दिनांक २० ऑक्टोंबर,२०१४ च्या परिपत्रकान्वये न्यायालयीन प्रकरणात वित्त विभागाने मांडलेली भूमिका/निर्णय संबधित विभागाने तातडीने याचिकाकर्त्यांना न्यायालयाने ठरवून दिलेल्या वेळेत कळविण्याबाबत तसेच अवमान याचिकेसंदर्भात न्यायालयाने विशिष्ट मुदत घालून दिलेल्या प्रकरणांमध्ये मुदतीपूर्वीच यथोचित कार्यवाही करण्याची दक्षता घेण्याबाबतच्या सूचना सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरुन सर्व प्रशासकीय विभागांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, विभागांनी आपल्या अधिनस्त सर्व न्यायालयीन प्रकरणांचा वेळोवेळी आढावा घेऊन **न्यायालयीन प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. एखादे न्यायालयीन प्रकरण कार्यवाहीविना प्रलंबित राहिल्यास संबंधित कार्यासनाच्या कक्ष अधिकारी यांना त्याबाबत व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल.**" *(13/2015)*

### *उच्च शिक्षण विभागाचे आदेश*

**(D)** विधी व न्याय विभागाने २ एप्रिल २०१४ रोजी परिपत्रक काढले, वित्त विभागाने याबाबतीत प्रथम २० ऑक्टोबर २०१४ रोजी परिपत्रक काढले. त्यानंतर वित्त विभागाने दिनांक २८ ऑक्टोबर २०१४ रोजी मुख्य सचिवांच्या सहीने आणखी पुन्हा एक परिपत्रक काढले. त्यानंतर ११ नोव्हेंबर २०१४ रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सुद्धा याबाबतीत एक परिपत्रक (क्र.न्यायप्र २०१४/प्र.क्र.४७४/१४/वि.शि.-१) काढले. त्या परिपत्रकाच्या परिच्छेद 1 (vi) मध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, :-

"(vi) मा. उच्च न्यायालयाच्या अथवा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास **स्थगिती देण्यात आलेली नसेल तर त्यांची विहीत मुदतीत अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे.**" *(2/2015)* **याच परिपत्रकामध्ये न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पूर्णपणे सहसंचालकांवर टाकण्यात आलेली असून त्यांनी उगाच संचालकांकडे मार्गदर्शन मागू नये कारण संचालकांकडे तुम्ही मार्गदर्शन मागितले की, संचालक सुद्धा त्यावर योग्य निर्णय न घेता प्रकरण शासनाकडे पाठवितात. तेव्हा याबाबतची कार्यवाही ही सहसंचालकांनी करावी व याबाबतची माहिती शासनाकडे दाखल करण्यात यावी असेही या आदेशात नमूद आहे. ते पुढील शब्दात :-**

"**४. प्रस्तुत प्रकरणांमधील मा. उच्च न्यायालयाचे आदेश स्वयंस्पष्ट आहेत.** त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून **वरील आदेशाची अंमलबजावणी संबंधित विभागीय सहसंचालक यांच्या स्तरावरुन करणे आवश्यक होते.** तथापि, विभागीय सहसंचालक, उ.शि. औरंगाबाद यांनी तशी कार्यवाही न करता संचालक, उच्च शिक्षण यांच्याकडे मार्गदर्शन मागितल्याचे दिसते. तसेच संचालकांनी सुद्धा त्यावर योग्य निर्णय न घेता प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. त्यामुळे **विभागीय सहसंचालक, उ.शि., औरंगाबाद विभाग, औरंगाबाद व संचालक, उच्च शिक्षण यांनी खुलासा शासनास सादर करावा.**" *(2/2015)*

**१७७.** मुख्य सचिव, विधी व न्याय विभागाचे सचिव, वित्त विभागाचे सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सचिव यांनी निर्गमित केलेले उपरोक्त आदेश काळजीपूर्वक पाहिले तर असे दिसून येते की, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय तर दूरच राहिला पण उच्च न्यायालयाच्या निर्णयावरसुद्धा स्थगनादेश मिळाला नसेल तर त्याची अंमलबजावणी करणे हे बंधनकारक आहे व ते घटनात्मक बंधन आहे. याची या ज्येष्ठ अधिकाऱ्यांना पूर्ण कल्पना आहे, हे स्पष्ट दिसून येते. **त्यात त्यांनी कुठेही यांचा सल्ला घ्या किंवा त्यांचा सल्ला घ्या, यांच्या मान्यतेसाठी पाठवा किंवा त्यांच्या मान्यतेसाठी पाठवा अशी भाषा या परिपत्रकात वापरलेली नाही, तर थेट कक्ष अधिकाऱ्यांच्या स्तरावरील किंवा इकडे उच्च शिक्षण विभागात सहसंचालकांच्या स्तरावरील अधिकाऱ्यांना परस्पर थेट न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा अधिकार देऊन ठेवलेला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे घटनेतील तरतुदीच होय.**

**१७८.** घटनेने ज्या गोष्ट बंधनकारक केलेल्या आहेत त्यांची अंमलबजावणी त्या पद्धतीने न होणे हे घटनाबाह्य कृत्य होय. अशा परिस्थितीत घटनाबाह्य कृत्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना चाप लावणे, त्यांच्यावर कारवाई करणे, त्यांचा बंदोबस्त करणे ही त्या विभागाचे नेतृत्त्व करणाऱ्या मंत्र्यांची जबाबदारी असते. तेसुद्धा घटनेप्रमाणेच. प्रत्येक मंत्र्यांनी आपले पद धारण करण्यापूर्वी घटनेचे पालन करण्याबाबतची शपथ घेतली पाहिजे असे बंधन भारतीय संविधानाने घालून दिलेले आहे. ही शपथ कोणत्या शब्दात घेतली पाहिजे हेही संविधानानेच निश्चित करून दिलेले आहे. भारतीय संविधानाच्या तिसऱ्या परिशिष्टामध्ये राज्याच्या मंत्रीमंडळामध्ये मंत्री म्हणून समाविष्ट होत असतांना घ्यावयाच्या शपथेची शब्दरचना पाचव्या क्रमांकावर समाविष्ट असून ती शब्दशः पुढीलप्रमाणे आहे.:-

"I, A.B., do swear in the name of God that I will bear true faith and allegiance to the Constitution of India as by law established, that I will uphold the sovereignty and integrity of India, that I will faithfully and conscientiously discharge my duties as a Minister for the State of..........and **that I will do right to all manner of people in accordance with the Constitution** and the law without fear or favour, affection or ill-will."

या शपथेमधील "**भारतीय संविधानाबद्दल मी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगीन**" ही शब्दरचना तर महत्त्वाची आहेच पण त्याच बरोबर "राज्याचा मंत्री म्हणून माझी कामे निष्ठापूर्वक व शुद्धबुद्धीने पार पाडीन आणि **संविधान व कायदा यानुसार सर्व तऱ्हेच्या लोकांना मी निर्भयपणे व निःस्पृहपणे, तसेच कोणाच्याही विषय ममत्वभाव किंवा आकस न बाळगता न्याय्य वागणूक देईन.**" हीही शब्दरचना महत्त्वाची आहे. उपरोक्त प्रमाणे शपथ घेऊनच मा.चंद्रकांतदादा पाटील हे उच्च शिक्षणमंत्री पदावर आरुढ झालेले आहेत. "आपल्या विभागातील अधिकाऱ्यांनी हा जो घटनाबाह्य धुडगूस घातला आहे तो आपण आठ दिवसात दुरुस्त करू" अशी कृती त्यांनी करणे एवढेच कायदेशीर कृत्य ते करू शकतात. याशिवाय कोणतीही कृती किंवा अकृती ही घटनाबाह्य व बेकायदेशीरपणाची असेल हे त्यांनी लक्षात घेणे आवश्यक आहे.

**- प्रा.बी.टी.देशमुख**

**१० मार्च २०२४**

*माजी विधान परिषद सदस्य व*
*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

*Revision of Pay Scales of Teachers in NonAgricultural Universities, National Law universities Affiliated Colleges, Government Colleges/ Institutions as per 7th Central Pay Commission and UGC Regulations on minimum qualifications for appointment of teachers and other academic staff in universities and colleges and measures for the maintenance of standards in Higher Education 2018.*

# GOVERNMENT OF MAHARASHRTRA

**Higher & Technical Education Department**

Government Resolution No: Misc-2309/C.R.128/UNI-1 : Mantralaya Annex, Mumbai- 400 032.

**Dated- 05 March, 2024.**

**Read:**

**(1)** Government Resolution, Higher and Technical Education Department No. NGC2009/ (243/09)-Uni. 1, dated 12th August, 2009.

**(2)** Government of India MHRD letter No. 1-7/2015-U.II (1), dated 2nd November, 2017

**(3)** Government of India MHRD letter No. Corrigendum F.No.1-7/2015-U.II (1), dated 8th November, 2017.

**(4)** Government of India MHRD letter No. Corrigendum F.No.1 7/2015-U.II (1), dated 8th November, 2017.

**(5)** UGC letter No. F.No.23-4/2017 (PS), dated 31st January, 2018

**(6)** The Gazette of India: Extraordinary, Part III-Section 4, dated 18th July, 2018

**(7)** The Maharashtra Public University Act, 2016

**(8)** Government Resolution, Higher and Technical Education Department No. MISC2018/C.R.56/18/UNI-1 dated 08th March, 2019

**(9)** Government Corrigendum, Higher and Technical Education Department No. MISC- 2018/C.R.56/18/UNI-1 dated 10th May, 2019.

**(10)** The Gazette of India: Extraordinary, Part III-Section 4, dated 30th June, 2023.

**(11)** The Gazette of India: Extraordinary, Part III-Section 4, dated 31st July, 2023.

**Preamble:-** Government has implemented recommendations of University Grants Commission of 7th pay commission as well as minimum qualifications for appointment in respect of teachers in Non Agricultural Universities and affiliated colleges vide Government Resolution dated 8th March,2019. University Grants Commission vide its notifications dated 30.06.2023 and 31.07.2023 has made amendments in minimum qualifications for appointments of teachers in Universities and affiliated colleges. It was under consideration of the Government to implement these amendments in respect of teachers in non agricultural Universities and affiliated colleges.Accordingly following amendments and additions are being issued.

**RESOLUTION:-**

1. "NET/SET/SLET shall be the minimum criteria for the direct recruitment to the post of Assistant Professor for all Higher Education Institutions"

**Sr N. : 1. Para : 4.12**

**Particulars in G.R.dated 8.3.2019 :** No person shall be appointed to the post of University and College teacher, Librarian,Director Knowledge Resource Centre, Director of Physical Education and Sports or Director of Sports and Physical Education, in any university or in any of institutions including constituent or affiliated colleges recognized under clause (f) of Section 2 of the University Grants Commission Act, 1956 or in an institution deemed to be a University under Section 3 of the said Act if such person does not fulfill the requirements as to the qualifications for the appropriate post as provided in the Schedule 1 of UGC Regulations 2018.

**Amendment :** No person shall be appointed to the post of University and College teacher, Librarian or Director of Physical Education and Sports, in any university or in any of the institutions including constituent or affiliated colleges recognized under clause (f) of Section 2 of the University Grants Commission Act, 1956 or in an institution deemed to be a University under Section 3 of the said Act if such person does not fulfill the requirements as to the qualifications for the appropriate post as provided in these Regulations.

**Sr N. : 2. Para : 7.3 VI (iii)**

**Particulars in G.R.dated 8.3.2019 :** The candidate who does not succeed in the first assessment, he/she shall have to be reassessed only after one year. When such a candidate succeeds in the eventual assessment, his/her promotion shall be deemed to be one year from the date of rejection.

**Amendment :** The candidate who does not succeed in the first assessment, he/she shall have to be re-assessed only after one year. When such a candidate succeeds in the eventual assessment, his/her promotion shall be effected either from 1st January or 1st July depending on the date of eventual assessment, as detailed below:

If the eventual assessment is between 1st January and 30th June of a year, the promotion shall be granted from 1st July of the year.

If the eventual assessment is between 1st July and 31st December of a year, the promotion shall be granted from 1st January of next year.

**Sr N. : 3. Para : 7.3 VIII**

**Particulars in G.R.dated 8.3.2019 :** The requirement for Orientation Course and Refresher Course for promotion due under the CAS shall not be mandatory up to 31 st December 2018.

**Amendment :** Wherever the requirement of the Orientation Course (OC)/Refresher Course (RC) has remained incomplete, the promotions would not be held up, but these requirements should be fulfilled by 31st December 2023 or as notified by the Commission from time to time.

Precautions should be taken to not to give promotions with retrospective effect any case.

**Sr N. : 4. Para : Sr.No.3 Under Table 3A**

**Particulars in G.R.dated 8.3.2019 :** M.Phil.

**Amendment :** M.Phil/ LLM /M.Tech/ M.Arch/ M.E./ M.V.Sc./M.D etc.

**Sr N. : 5. Para : Sr.No. D under the category of Note below Table 3 A**

**Particulars in G.R.dated 8.3.2019 :** -

**Amendment :** SLET/ SET score shall be valid for appointment in respective State university/ Colleges/ Institutions only.

**Sr N. : 6. Para : Sr.No.3 under Table 3B**

**Particulars in G.R.dated 8.3.2019 :** M.Phil

**Amendment :** M.Phil/ LLM /M.Tech/ M.Arch/ M.E./ M.V.Sc./M.D etc.

2. This Government Resolution is being issued in accordance with the approval of Finance Department by its unofficial reference no.1137/Exp-5,dated 03.01.2024

This Government Resolution of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 202403051829241608 This resolution has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**(S.R.Utekar)**
Section Officer to Government

*सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारीतील समाजकार्य महाविद्यालय (बीएसडब्ल्यू/एमएसडब्ल्यू अभ्यासक्रम) हा विषय उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्याबाबत.*

## *महाराष्ट्र शासन : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग*

**शासन निर्णय क्र. सकाम-२०२३/प्र.क्र.९९/सामासु : मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२**

**दिनांक : २९ फेब्रुवारी, २०२४ : *शासननिर्णय***

"**समाजकार्य महाविद्यालय (बी.एस.डब्ल्यू./एम.एस.डब्ल्यू. अभ्यासक्रम)**" हा विषय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील सामासु कार्यासन हाताळीत आहे. परंतु उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत महाविद्यालयीन शैक्षणिक पद्धतीची अंमलबजावणी तसेच शैक्षणिक विषयक कामकाज करण्यात येत असल्याने मा.मंत्रीमंडळाच्या दि. १४ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयान्वये, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील "**समाजकार्य महाविद्यालय (बी.एस.डब्ल्यू./एम.एस.डब्ल्यू. अभ्यासक्रम)**" हा विषय उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्यास दिलेल्या मान्यतेस अनुसरून सदर विषय या विभागाकडून उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्यास याद्वारे शासन मंजुरी देण्यात येत आहे.

२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील "सामासु" कार्यासनाने सदर विषयासंबंधीच्या सर्व नस्त्या व कागदपत्रे उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे तात्काळ हस्तांतरीत करावेत.

३. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०२२९१९२७५८१३२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

**(र.शि.गोरवे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

***Increase in pension / family pension topensioner / family pensioner of 80 years of age and above with effect from 1st January 2024.***

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
Finance Department
Government Resolution No. : PEN- 2021/C.R.64/ SER-4
Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg, Mantralaya, Mumbai- 400032.
**Date : 16 January 2024.**

**Reference :** Government Resolution, Finance Department No.PEN-2019/C.R.59/SER-4, dated 24/01/2019.

**Government Resolution**

The pension / family pension of the pensioners / family pensioners of 80 years of age and above as per Seventh Pay Commission has been revised from 01.01.2019. Government is pleased to revise the said rate from 01.01.2024 as below:

| | |
|---|---|
| 1 Age 80 to 85 years | Increase in basic pension 20% |
| 2 Age above 85 to 90 years | Increase in basic pension 30% |
| 3 Age above 90 to 95 years | Increase in basic pension 40% |
| 4 Age above 95 to 100 years | Increase in basic pension 50% |
| 5 Age above 100 years | Increase in basic pension 100% |

2. The revised increased rate will be applicable only from 01.01.2024. No difference of revised increased rate will be payable for previous period to existing Pensioners / Family Pensioners.

3. It will be the responsibility of the Pension Disbursing Authority i.e. Pay and Accounts Officer, Mumbai / Treasury Officers as the case may be, to calculate the quantum of increase in the pension / family pension payable in each individual case.

4. Government is also pleased to direct that the above decision should mutatis mutandis apply with necessary changes to those pensioners / family pensioners of 80 years of age and above of Recognized and Aided Educational Institutions, Non Agriculture Universities and affiliated Non-Governmental Colleges and Agricultural Universities, etc. to whom pension scheme is made applicable.

5. In exercise of the powers conferred by the proviso under Section 248 of Maharashtra Zilla Parishad and Panchayat Samitis Act 1961 (Maharashtra Act number Five of 1962) and of all other powers enabling it on that behalf, the Government is further pleased to decide that above decision shall apply to the pensioners / family pensioners of 80 years of age and above of Zilla Parishads.

6. The expenditure on this account should be debited to the Budget Heads to which the pensions of the pensioners mentioned in the above paras are debited and should be met from the grants sanctioned thereunder.

7. This Government Resolution is available on the website of Government of Maharashtra i.e. www.maharashtra.gov.in and its computer code number is 202401161616207505. This order has been signed digitally.

By order and in the name of Governor of Maharashtra.

**(Manisha Y.Kamte)**
Deputy Secretary to Government.

*PR : (1) P22NB2019 (2) P00NB2024 PR : (1) P 20 NB 2019 (2) P 137 NB 2019 (3) P12 NB 2020 (4) P 281 NB 2021 (5) P 101 NB 2022 (6) P 165 NB 2022 (7) P 27 NB 2023 (8) P 127 NB 2023 (9) P 000 NB 2023*

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 10.03.2024) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.03.2024**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---------------------------------------------------

To,.......................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................